Impact Factor - 3.452 ISSN : 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# Research Journey

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2018

SPECIAL ISSUE - XLII

## भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि राजकारण





अतिथी संपादक
प्राचार्य ए. एल. भगत
मराठा विद्याप्रसारक संस्थेचे
कला व वाणिज्य महाविद्यालय, वडनेर भैरव
ता. चांदवड, जि. नाशिक

मुख्य संपादक
डॉ. धनराज धनगर
महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे
कला व वाणिज्य महाविद्यालय, येवला
ता. येवला, जि. नाशिक

For Details Visit to : www.researchjourney.net SWATIDHAN PUBLICATIONS

**Impact Factor – 3.452** **ISSN – 2348-7143**

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-Research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**February-2018**

**SPECIAL ISSUE-XLII**

## भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि राजकारण

**अतिथी संपादक**

**प्राचार्य अमोल भगत**

**मराठा विद्या प्रसारक समाजाचे**

**कला आणि वाणिज्य महाविद्यालय, वडनेर भैरव**

**ता. चांदवड, जिल्हा नाशिक.**

**विशेषांक कार्यकारी संपादक**

**प्रा. भीमराज गायकवाड**

**प्रा. एस.व्ही. कोल्हे**

**प्रा. डी. डी. गव्हाणे**

**मुख्य संपादक**

**डॉ. धनराज धनगर**

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 225/-

ISSN : 2348-7143
February 2018

## Editorial Board

**Chief Editor -**

**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV'S Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Co-Editors -**

- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, **Riyadh Kingdom** of **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon.
- **Dr. Gajanan Wankhede** - Baliram Patil College, Kinwat-Nanded **[M.S.] India**.
- **Prof. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon
- **Prof. Vijay Shirsath** - Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul.
- **Prof. Atul Suryawanshi** - S. S. M. M. College, Pachora.
- **Prof. B. P. Shewale** - M. S. G. College, Malegaon Camp, Nashik.

**Advisory Board -**

- **Dr. Marianna kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare -** Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. D. A. Suryawanshi** - Principal, R. C. Patel College of Education, Shirpur, **Dhule.**
- **Dr. Sandip D. Mundhe** - Head, Lib. Science, Sambhajirao Kendre College, **Jalkot, Latur**
- **Dr.Y. H. Saner** - Principal, Abhay College of Education, **Dhule**
- **Dr. D. D. Patil** - Principal, Arts, Science and Commerce College, Chopda, **Jalgaon**

**Review Committee -**

- **Dr. Uttam V. Nile** - P. S. G. V. P. Mandals Arts, Cmmerce, Science College, Shahada
- **Dr. Sanjay Dhondare** - Abhay Womens College, Dhule
- **Dr. Rekha Gajare** - Head, Dept. of Hindi, P.O.Nahata College, Bhusawal
- **Dr. Ramesh Sambhaji Kure** - Head, N. W. College, Akhala Balapura Dist-Hingoli
- **Dr. S. K. Wadekar** – Principal, Arts, Science & Commerce College, Alephata

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

- **Executive Editor-**

**Published by -**

© Mrs. Swati Dhanraj Sonawane, **Director, Swatidhan International Publication, Nashik**

**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 42 : भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि राजकारण
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

## अनुक्रमणिका


| अ.नं. | शीर्षक | लेखक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | भारतातील निवडणूक प्रक्रिया | - डॉ. सोनाली पाटील | ०५ |
| २ | निवडणुका आणि प्रसारमाध्यमे | - प्रा. सुवर्णा धामणे | १२ |
| ३ | भारतीय निवडणूक प्रक्रिया – विकास आणि सुधारणा | - प्रा. डी. डी. ठाकरे | १७ |
| ४ | निवडणुक प्रकियेत निवडणुक आयोगाची भूमिका | - प्रा. हर्षदा जोशी | २३ |
| ५ | भारतातील निवडणूक सुधारणा | - प्रा. गणेश लिंबोळे | २६ |
| ६ | मतदार वर्तनावर प्रभाव पाडणारे घटक | - प्रा. गोविंद ठाकरे | ३० |
| ७ | मतदार वर्तनावर प्रभाव पाडणारे घटक | - प्रा. जे. एल. ठाकरे | ३४ |
| ८ | मतदार वर्तनावर प्रभाव पाडणारे घटक | - प्रा. राजू सानप | ३८ |
| ९ | मतदार वर्तनावर प्रभाव पाडणारे घटक | - प्रा. अभिन पोटे | ४२ |
| १० | मतदार वर्तनावर परिणाम करणारे घटक | - प्रा. सी.डी.राजपूत | ४५ |
| ११ | मतदाराच्या वर्तनावर प्रभाव टाकणारे घटक | - श्रीमती एस.बी. पवार, प्रा.एस.व्ही. कोल्हे | ४८ |
| १२ | २०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकीचे विश्लेषण | - प्रा. शरद वाघ | ५१ |
| १३ | भारतीय निवडणूक प्रक्रियेत आधुनिक साधनांचा वापर | - प्रा. डी. डी. गव्हाणे | ५६ |
| १४ | भारतीय निवडणूक प्रक्रिया – विकास आणि सुधारणा | - प्रा. भीमराज गायकवाड | ५८ |
| १५ | मतदार वर्तनावर प्रभाव पाडणारे घटक | - प्रा. ज्ञानोबा ढगे | ६२ |
| १६ | निवडणुका आणि मतदार वर्तन | - प्रा. एस. एस. कावळे, डॉ. व्ही.डी. कापडी | ६७ |
| १७ | निवडणूक प्रक्रियेत निवडणूक आयोगाची भूमिका | - प्रा.दर्शना पाटील | ७१ |
| १८ | भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि राजकारण | - आरती कोल्हे | ७८ |
| १९ | मतदार वर्तनावर प्रभाव पाडणारे घटक | - सुमित आहेर, निकिता गांगुर्डे | ८२ |
| २० | भारतातील लोकसभा निवडणुका आणि महिलांचा राजकीय सहभाग | - प्रा. राजेंद्र आगवाने, प्रा. अरुण पोटे | ८५ |


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

- **Executive Editor**

**Published by -**

© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Nashik

**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

## संपादकीय

भारतीय निवडणूक प्रक्रिया आणि राजकारण हा Research Journey या नियतकालिकाचा विशेषांक वाचकांकडे सुपुर्द करतांना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात लोकशाही शासनव्यस्थेसाठी निवडणूका या महत्वाच्या आहेत. ही जबाबदारी निवडणूक मंडळ योग्य पद्धतीने पार पाडतांना दिसून येत असले तरी भारतीय निडणूक प्रक्रियेवर अनेक प्रकारचे आक्षेप घेतले जातात. भारतीय निवडणूकांवर जात, धर्म, भाषा, प्रसारमाध्यमे, आर्थिक घटक, EVM, इ. चा प्रभाव दिसून येतो. त्यादृष्टीने येणाऱ्या 2019 च्या सार्वत्रिक [illegible]मीवर निवडणूका व त्यासंदर्भात होणारे राजकारण तसेच या प्रक्रियेत पारदर्शकता निर्माण करण्यासाठी काही सुधारणा करता येणे शक्य आहे. याद्वारे निवडणूका स्वच्छ वातावरणात झाल्यास सामान्य मतदारांचा लोकशाहीवरील विश्वास वाढेल. यासंदर्भात सखोल चर्चा व्हावी या दृष्टीने सदर चर्चासत्र [illegible] करण्यात आले आहे. त्यास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने व मराठा विद्या प्रसारक समाजाने मान्यता दिल्याने हे कार्य पुर्णत्वास जावून आज हे शो[illegible] [illegible]क प्रकाशीत होत आहे.

या प्रकाशन प्रसंगी मराठा विद्या प्रसारक समाजाचे अध्यक्ष डॉ. तुषार शेवाळे, मा. उत्तमबाबा भालेराव, संचालक मविप्र समाज नाशिक, मा. हेमंत देसाई व मा. सुनिल तांबे (जेष्ठ पत्रकार व राजकीय विश्लेषक), मा. विश्वास देवकर (संपादक, देशदुत), डॉ. पी. डी. देवरे (अध्यक्ष, महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद), मा. अशोक सोनवणे यांनी सदर विषयावर तज्ञ मार्गदर्शक म्हणून प्रकाश टाकला. त्यांमुळे आमचे चर्चासत्र यशस्वी झाले.

तसेच महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी सदर चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी आपले योगदान दिले त्याबद्दल आम्ही सदैव ऋणी आहोत.

**दिनांक :- 9 फेब्रुवारी 2018**

**मा. श्री. ए. एल. भगत**
प्राचार्य व अतिथी संपादक
मविप्र समाजाचे कला व वाणिज्य महाविद्यालय,
वडनेरभैरव ता. चांदवड (नाशिक), महाराष्ट्र

ISSN : 2348-7143
February 2018

# भारतातील निवडणूक प्रक्रिया

**डॉ. सोनाली शिवाजी पाटील**
एम.ए.,एम.फिल., पीएच.डी.
सहा. प्राध्यापिका –राज्यशास्त्र विभाग.
म.वि.प्र.स.चे कला व वाणिज्य महाविद्यालय, दिंडोरी, ता. दिंडोरी, जि. नाशिक
मो. नं.–९६०४४३२७७४.

भारतातील निवडणूक यंत्रणा त्रिस्तरीय स्वरूपाची आहे.

**अ) केंद्रीय स्तर :** केंद्रीय पातळीवर एक प्रमुख निर्वाचन आयुक्त असतो. देशातील सर्व निवडणुकांवर तो नियंत्रण व देखरेख ठेवतो.

**ब) घटक राज्यीय स्तर :**

घटक राज्याच्या पातळीवर निवडणुकांचे कामकाज पाहण्यासाठी एक मुख्य निवडणूक आयुक्त असतो. त्याची नेमणूक राष्ट्रपतींच्या सल्ल्याने प्रमुख निर्वाचन आयुक्त करतो.

**क) जिल्हा स्तर :**

जिल्हा पातळीवर होणाऱ्या निवडणुकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र निवडणूक अधिकारी नियुक्त केला जातो. परंतु बहुधा ही जबाबदारी महसूल जिल्हाधिकाऱ्यांवर सोपवली जाते.

निवडणूक यंत्रणा सिद्ध झाल्यावर निर्वाचन आयोगाच्या नियंत्रणाखाली पुढीलप्रमाणे निवडणूक प्रक्रिया घडून येते.

१. राष्ट्रपती, उपराष्ट्रतपी, राज्यसभा, लोकसभा, विधानसभा, विधान परिषद आदींच्या निवडणुकांच्या तारखा निश्चित करून त्या जाहीर करणे.
२. उमेदवारांचे अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख व वेळ घोषित करणे.
३. उमेदवारी अर्ज परत घेण्याची तारीख व वेळ निश्चित करणे.
४. उमेदवारांच्या अर्जांची छाननी करणे, वैध उमेदवारी जाहीर करणे.
५. उमेदवारांची अनामत रक्कम भरून घेणे.
६. निर्वाचन आयोगाने निश्चित केलेल्या मतदारसंघात मतदान केंद्राची व्यवस्था करणे.
७. निवडणुकीच्या कार्यात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे.
८. मतपत्रिका छापणे, मतदान केंद्रांना लागणारे सर्व साहित्य पुरवणे.
९. मतदानाच्या वेळी मतदान केंद्रांवर देखरेख ठेवून मतदानाची गुप्तता राखण्यासाठी आवश्यक ते उपाय योजणे.
१०.मतदान पूर्ण झाल्यावर मतपेट्या सुरक्षित ठेवणे.
११.मतमोजणी करून निवडणुकीचा निकाल जाहीर करणे.
१२.निवडणुकीत गैरप्रकार झाला असेल तर त्या मतदारसंघात पुन्हा निवडणूक घेण्याचा निर्णय घेणे.
१३.निकाल जाहीर झाल्यावर त्यासंबंधीचा अहवाल तयार करून प्रमुख निर्वाचन आयुक्तांकडे पाठविणे.

ISSN : 2348-7143
February 2018

**निवडणूक प्रक्रियेतील घटक**

**अ) प्रौढ मताधिकार :**

भारतीय घटनेच्या ३२६व्या कलमात प्रौढ मताधिकाराची तरतूद करण्यात आलेली आहे. १८ वर्षे पूर्ण असणाऱ्या प्रत्येक भारतीय व्यक्तीला मतदानाचा अधिकार देण्यात आलेला आहे. जी व्यक्ती भारतीय नागरिक आहे तिला स्त्री–पुरुष भेद, जातीभेद, भाषाभेद असा कोणताही भेद न मानता प्रौढ मतदानाचा अधिकार दिलेला आहे. शिक्षण किंवा संपत्ती अशी अट न ठेवता प्रौढ मताधिकार सर्व नागरिकांना दिलेला आहे.

**ब) मतदारसंघाची रचना :**

लोकसंख्येच्या प्रमाणात मतदारसंघ पाडले जातात. सामान्यतः प्रदेशाची सलगता विचारात घेवून मतदारसंघ निश्चित केले जातात. प्रत्येक शिरगणतीनुसार मतदारसंघाची पुनर्रचना करण्यासाठी एक खास मंडळ नेमले जाते.

**क) मतदारसंघाची यादी :**

प्रत्येक मतदारसंघात नोंदणी अधिकाऱ्यांकडून मतदारांची एक यादी तयार करण्यात येते. सुरूवातीला एक प्राथमिक स्वरूपाची यादी तयार करून ती प्रसिद्ध केली जाते. त्यावर मतदारांकडून सूचना, तक्रारी इ. स्वरूपात मते मागवली जातात. त्यानुसार योग्य त्या दुरूस्त्या करून अंतिम यादी तयार केली जाते.

**ड) उमेदवारी :**

निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर केल्यानंतर उमेदवारांना नामांकन पत्र सादर करण्यास आवाहन केले जाते. ठराविक मुदतीत नामांकन पत्र सादर करावे लागते. मतदारयादीत नाव असणाऱ्या कोणत्याही नागरिकाला निवडणूक लढविता येते.

**इ) मतदान व त्यावरील खर्च :**

जाहीरनामे, पत्रके, वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन, प्रचारसभा, मिरवणुका इ. माध्यमांद्वारे निवडणुकीचा प्रचार केला जातो. त्यासाठी प्रत्येक राजकीय पक्षाचा उमेदवार वारेमाप खर्च करतो. लोकसभेच्या निवडणुकीसाठी उमेदवाराला २५ लाख रुपयांपर्यंत तर विधानसभेच्या निवडणुकीसाठी १० लाख रुपये निवडणूक प्रचारखर्च करता येतो.

**ई) मतदान केंद्रे :**

मतदारांच्या सोयीसाठी प्रत्येक मतदारसंघात अनेक मतदान केंद्रे उघडली जातात. लोकसभा व विधानसभा यांच्या निवडणुका एकाच वेळी घ्यावयाच्या असतील तर मतदान केंद्रात वेगवेगळी सोय करण्यात येते. प्रत्यक्ष मतदान घेण्यासाठी वेगवेगळी सोय करण्यात येते. प्रत्यक्ष मतदान घेण्यासाठी अनेक अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या नेमणुका केल्या जातात. कोणाही व्यक्तीला मतदानासाठी तीन मैलांपेक्षा जास्त अंतर जावे लागणार नाही, अशा पद्धतीने मतदान केंद्रे निर्माण केली जातात. प्रत्येक मतदान केंद्राला मतदान पेट्या व इतर साहित्य पुरवले जाते. मतदानाची प्रक्रिया व्यवस्थित पार पाडावी, यासाठी प्रत्येक मतदान केंद्रात केंद्राधिकारी व मतदान अधिकारी यांची नियुक्ती केलेली असते.

**निवडणूक प्रक्रियेतील दोष :**

निवडणूक प्रक्रियेतील भ्रष्टाचार दूर करता येईल, या विषयावर मुंबई येथे जानेवारी १९८६ मध्ये एक चर्चासत्र घेण्यात आले. माजी पंतप्रधान मोरारजी देसाई, उद्योगपती जे. आर.डी. टाटा व रामकृष्ण बजाज, माजी निवडणूक आयुक्त एस. एल. शकधर, प्रसिद्ध कायदेपंडित नानी पालखीवाला व राम जेठमलानी, प्रा.

मधू दंडवते, डॉ. उषा मेहता इ. व्यक्तींनी या चर्चासत्रात भाग घेतला होता. निवडणुकांतील बेसुमार खर्चावर नियंत्रण घालावयाचे असेल आणि भ्रष्टाचार नाहीसा करावयाचा असेल तर काळा पैसे व निवडणूक यांचा संबंध तोडला पाहिजे. निवडणुका लढविणे ही सर्वसामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेरील बाब झाली आहे. नगरपरिषदेच्या निवडणुकीत लाखांवर खर्च करणारे उमेदवार आढळतात. विधानसभेच्या व लोकसभेच्या निवडणुकीत पाच–पन्नास लाख रुपये खर्च करणारे उमेदवार दिसतात. हा पैसा अर्थात सरळ मार्गांनी मिळविलेला नसतो. बव्हंशी तो बेहिशेबीच असतो. तेव्हा काळ्या पैशाची व निवडणुकांची फारकत करणे गरजेचे आहे. अशी एकमताने या चर्चासत्रात सूचना करण्यात आली तसेच निवडणूक काळातील दहशतवाद व बनावट मतदानाला आळा घालण्यासाठी निवडणूक यंत्रणेत सुधारणा करावी.

स्वातंत्र्योत्तर भारताने लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार केला. लोकशाहीमध्ये सामान्य माणसाचा विकास घडवून आणण्यासाठी काही  स्वातंत्र्ये बहाल केली जातात. त्यापैकी राजकीय स्वातंत्र्याची पूर्तता करण्यासाठी व लोकशाहीला मूर्त स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी निवडणुका घेतल्या जातात. देशांतर्गत विकासात्मक धोरणे राबविणे, योग्य व पात्र व्यक्तीला निवडून देणे, मतदान करणे, निवडणुकीत उभे राहणे, विविध राजकीय पक्षांची तिकिटे मिळविणे, प्रचार व प्रसार करणे, जनसंपर्क व जनमत बनविणे. एकूणच या सर्व प्रक्रियेला निवडणुका असे म्हटले जाते.

स्वातंत्र्यप्राप्तीपासून ते आजपर्यंत देशात १६ निवडणुका यशस्वीरित्या पार पाडल्या आहेत. निवडणूक प्रक्रियेत काही अडचणी निर्माण होताना दिसतात. उदा. – प्रचंड निवडणूक खर्च, बोगस मतदान, धर्म व जातीच्या नावावर मदतान, भ्रष्ट व गुन्हेगार लोकांना तिकिट देणे, स्वार्थी व संधीसाधू राजकारण, पक्षांतर इ. स्वरूपाचे अनेक महत्त्वाचे दोष वा त्रुटी भारतीय निवडणूक प्रक्रियेत निर्माण झालेल्या आहेत. म्हणूनच भारतात निवडणूक सुधारणेसंदर्भात नेहमीच विचारमंथन सुरु असते. त्याचे फलित म्हणून विविध समित्यांनी केलेल्या निवडणुकांबाबत काही कायदे नव्याने निर्माण करण्यात आले. या सर्व सुधारणांचा आढावा या शोधनिबंधात घेण्यात आला आहे.

**निवडणूक सुधारणा :**

**निर्दोष मतदारयाद्यांसाठी सुधारणा –**

निवडणुकीपूर्वी मतदार याद्या अद्ययावत केल्या जातात. यादीत काही नावे नव्याने समाविष्ट करणे, मृत्यू झालेल्या मतदारांची नावे वगळणे, मतदारसंघ बदललेल्या मतदारांची नावे पूर्वीच्या मतदारसंघातून कमी करून नवीन मतदारसंघातील यादीत समाविष्ट करणे इ. बाबत सुधारणा कराव्या लागतात. यामुळे बोगस मतदार करणाऱ्यांवर मर्यादा येतात.

**उमेदवारी अर्ज भरताना व्यक्तिगत माहिती देण्याची सक्ती :**

उमेदवाराने आवेदनपत्र भरताना स्वतःची व्यक्तिगत स्वरूपाची सखोल माहिती देण्याची आवश्यकता आहे.

१. संपूर्ण नाव.
२. वय, जात, पोटजात, धर्म, लिंग.
३. शैक्षणिक, व्यावसायिक पात्रता.
४. स्वतःच्या मालकीची संपत्ती, पैसा, बँक खाते.
५. उमेदवारावरील फौजदारी खटले, भ्रष्टाचाराचे न्यायप्रविष्ट खटले.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 42 : भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि राजकारण
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

यांचा सविस्तर तपशील देण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे. या सुधारणांमुळे उमेदवाराबद्दलची माहिती मतदारांना होते व उमेदवार कोणत्या पात्रतेचा आहे, हे लक्षात येते. राजकीय भ्रष्टाचार आणि गुन्हेगारीकरण टाळण्यासाठी हा प्रयत्न महत्त्वपूर्ण आहे.

**अनामत रकमेत वाढ :**

उमेदवारी अर्ज भरताना पूर्वी नाममात्र अनामत रक्कम सरकार दरबारी भरावी लागत असे. त्यामुळे ही रक्कम भरणे कोणालाही शक्य होते आणि एक ना धड... भाराभर चिंध्या... या म्हणीप्रमाणे कोणीही उठावे व अर्ज भरावा अशी गत होत असे. आता त्यात सुधारणा करून प्रत्येक लहान–मोठ्या पदासाठी त्या त्या प्रमाणात वाढीव रक्कम भरणे सक्तीचे केले आहे. शिवाय एकूण मतदानाच्या १–६ मते संबंधित उमेदवाराला मिळाली नाही तर भरलेली अनामत रक्कम सरकारकडे जमा होते.

**आचारसंहिता लागू करणे :**

निवडणुका मोकळ्या व मुक्त वातावरणात व्हाव्यात हा उद्देश असतो, परंतु निवडणुकीच्या काळात गैरप्रकार होवू नयेत, यासाठी काही नियम व बंधने घालून दिली आहेत. त्यांनाच आचारसंहिता असे म्हणतात. आचारसंहितेचा उमेदवारांवर तसेच पक्षांवर आणि शासनावरही प्रभाव असतो, प्रत्येकासाठी काही स्वतंत्र नियम आहेत.

**मतदारांना ओळखपत्रांचे वाटप करणे :**

निवडणुकीत मतदारांची अवाढव्य अशी संख्या पाहता बोगस मतदान टाळण्यासाठी प्रत्येक मतदाराला ओळखपत्र देण्याची प्रक्रिया टी.एन. शेषण यांच्या काळात १९९६ पासून झपाट्याने सुरू झाली. ओळखपत्रात मतदाराचे फोटो, नाव, वय, लिंग, जात, पत्ता इ. स्वरूपाची माहिती नमूद असल्या कारणाने बोगस व खोट्या मतदानास सुधारणा होय.

**चित्रफित काढण्याची तरतूद :**

निवडणूक प्रक्रिया अधिकाधिक निर्दोष व पारदर्शक होण्यासाठी आयोगाने सुधारणांतर्गत काही गोष्टी ठरवून दिलेल्या आहेत. त्या खर्चाचा तपशील, प्रचारपत्रके वाटप, त्याचे ठिकाण, निवडणूक प्रचार या सर्व घडामोडींवर, हालचालींवर (सूक्ष्म देखरेख) ठेवण्यासाठी चित्रफित काढण्याचे कार्य सुरू केले आहे.

**इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा अवलंब :**

पूर्वी मतदानासाठी कागदी चिठ्ठ्यांचा वापर केला जात असे. त्यातील योग्य त्या चिन्हावर शिक्का मारून मतदान केले जात असे. परंतु त्यामुळे काही त्रुटी निर्माण होत असत. मतपत्रिकेत मोजणीत होणारे घोटाळे, मोजणीतील दिरंगाई, अस्पष्ट दिसणारे शिक्के, दोन चिन्हांवर अर्धे अर्धे मारलेले शिक्के, यामुळे मतदान बाद होत असे. हे दोष पाहता आयोगाने इलेक्ट्रॉनिक यंत्राच्या मतदानाला कायदेशीर मान्यता दिली आहे. मतमोजणीचे काम यामुळे अधिक सोपे व कमीत कमी वेळेत अचूक होवू शकते.

**१९८५ चा पक्षांतरबंदी कायदा :**

उमेदवार निवडून आल्यानंतर पक्षांतराच्या वाढत्या प्रवृत्तीला पायबंद घालण्यासाठी माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने पक्षांतर बंदी विधेयक संसदेत मांडले. संसदेने ते मंजूर करून ५२ व्या घटनादुरूस्तीनुसार १ मार्च १९८५ पासून ४१ कायद्यांची अंमलबजावणी सुरू झाली. यापूर्वी पक्षांतराचा प्रश्न फार गंभीर स्वरूपाचा झाला होता.

ISSN : 2348-7143
February 2018

**इतर सर्वसाधारण सुधारणा :**

१. अपक्ष उमेदवारांची वाढती संख्या मर्यादित करण्यासाठी कायदा करण्यात आला. त्याकरिता लोकसभेसाठी ५०० रुपयांवरून ५०००रुपये अनामत ठेव रक्कम करण्यात आली आणि विधानसभेसाठी २५० रुपयांवरून २५००रुपये करण्याची तरतूद करण्यात आली.
२. भारतीय संविधानाच्या कलम ३२६ (६१) संविधान संशोधन करून १९८८ मध्ये मतदारांची आयुर्मान पात्रता २१ वर्षांऐवजी, लोकसभा आणि विधानसभा निवडणूक प्रचाराचा कालावधी वीस दिवसांवरून चौदा दिवसांवर आणण्यात आला.
३. भारतीय संविधान, राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीत, राष्ट्रीय नेते यांच्याबाबत अवमानजनक वक्तव्ये व वर्तणूक करणाऱ्या व्यक्तीस सहा वर्षांसाठी निवडणूक लढवण्यास अपात्र ठरवण्यात येईल.
४. एकाच उमेदवाराला दोनपेक्षा अधिक मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे.
५. मतदान केंद्रांवर एखाद्या व्यक्तीने सशस्त्र प्रवेश केला असेल तर तो गंभीर स्वरूपाचा गुन्हा मानला जातो. मतदानाच्या दिवशी नशिल्या पदार्थांची व मादक द्रव्यांची दुकाने बंद ठेवण्याचे आदेश दिले जातात. मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत म्हणजेच ४८ तासांपर्यंत व प्रतिबंध लागू असतो.
६. मतदानाच्या दिवशी शासकीय व बिगरशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांना शासकीय सुटी देण्यात येते. जेणेकरून त्यांना मतदानाचा हक्क बजावता येवू शकेल.
७. निवडणुकीतील उमेदवारांची दिवसेंदिवस वाढती संख्या लक्षात घेवून त्यावर मर्यादा घालण्यासाठी लोकसभेच्या सर्वसाधारण उमेदवारांसाठी अनामत रक्कम १०,०००रुपये आणि राखीव उमेदवारासाठी ५,९०० रुपये करण्यात आली तर विधानसभेच्या निवडणुकीसाठी अनामत रक्कम ५,००० रुपये आणि २५,०० रुपये करण्यात आली.

RESEARCH JOURNEY

**टी. एन. शेषन यांच्या कालखंडातील सुधारणा :**

देशांतर्गत निवडणूक प्रक्रियेचे संचलन करण्यासाठी स्वतंत्र निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली, तर या आयोगाची सर्व सूत्रे मुख्य निवडणूक आयुक्तांकडे सोपविण्यात आली. १९९० पूर्वी देशांत निवडणूक आयुक्तांचे अधिकार किती शक्तीशाली असतात, याची जाणीव नव्हती. त्यामुळे निवडणूक आयोग काही अशी राजकीय नेते व राजकीय पक्षांच्या हातातले बाहुले बनले होते. १२ डिसेंबर १९९० रोजी टी. एन. शेषन यांची मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून नेमणूक झाली. मात्र त्यांच्या कालखंडात आयुक्तांचे अधिकार व शक्तीचा पुरेपूर वापर केला. शेषण यांनी संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत शिस्त आणि पारदर्शकता आणण्यासाठी मंत्री, खासदार, आमदार व अधिकारी वर्ग या कोणाचाही विचार केला नाही. गुन्हेगाराला शिक्षा असे त्यांचे धोरण होते, म्हणून त्यांचा कालखंड शेषन कालखंड मानला जातो.

ज्या मतदारसंघात उपरोक्त गैरप्रकार सिद्ध झाले, अशा ठिकाणी पुन्हा फेरमतदान घेण्याची व्यवस्था त्यांनी केली. राजकीय पक्षांना मिळणाऱ्या देणग्या, उमेदवारांचा निवडणूक काळातील खर्च, सत्ताधारी पक्षांचा निवडणुकीत शासकीय यंत्रणेचा वापर, आचारसंहितेची अंमलबजावणी इ. बाबत बरेच नियंत्रण त्यांनी प्रस्थापित केले. मतदार याद्या अधिकाधिक अद्ययावत केल्या. त्यांनी सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे मतदारांना मोफत ओळखपत्रांचे वाटप हे होय आणि अजूनही हे कार्य सुरूच आहे.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 42 : भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि राजकारण
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

संथानम समितीच्या शिफारशी : या समितीने १९६४ मध्ये निवडणूक खर्चाबाबत काही आर्थिक स्वरूपाच्या सुधारणा सूचविल्या आहेत.

१. निवडणूक आयोगाने राजकीय पक्षांच्या उत्पन्नाचे स्त्रोत व खर्चाचे हिशेब तपासावे.
२. उमेदवारांनी निश्चित वेळेत व ठरलेल्या तारखेच्या आत निवडणुकीतील खर्चाचा तपशील आयोगास सादर करावा.
३. राजकीय पक्षांकडून निवडणुकीत होणाऱ्या अमाप खर्चास व भ्रष्टाचारास पायबंद घालण्यासाठी निवडणूक खर्च सरकारने करावा.

**यशवंतराव चव्हाण समितीच्या शिफारशी :**

१९६८ मध्ये तत्कालिन गृहमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक प्रक्रिया आणि विशेष करून पक्षांतरावर प्रतिबंध घालण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीने केलेल्या शिफारशी पुढीलप्रमाणे :

१. सर्व राजकीय पक्षांनी एकत्रित येवून अशी आचारसंहिता स्वीकारावी की जेणेकरून पक्षांतर करणाऱ्या व्यक्तीला आपल्या पक्षात प्रवेश देवू नये.
२. जे प्रतिनिधी ज्या राजकीय पक्षातर्फे निवडून आला असेल तो कार्यकाळ संपेपर्यंत त्यास त्याच पक्षात राहण्याचे बंधन असावे.
३. पंतप्रधान, मंत्री आणि मुख्यमंत्री हे कनिष्ठ सभागृहात सभासद म्हणून निवडून आलेले असावेत.
४. पक्षांतर केलेल्या प्रतिनिधिंना मंत्रिपद देण्यात येवू नये.
५. स्वतंत्र (अपक्ष) निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारास मतदारांनी मते देवू नयेत.
६. केंद्र व राज्य मंत्रिमंडळातील मंत्र्यांची संख्या निवडून आलेल्या एकूण सदस्य संख्येच्या तुलनेत निश्चित प्रमाणात असावी.

**संयुक्त संसदीय समितीच्या शिफारशी :**

निवडणूक सुधारणेबाबत या समितीने १९७२ मध्ये काही शिफारशी सूचविल्या. त्या पुढीलप्रमाणे :

१. निवडणूक आयोग एक सदस्यीय स्वरूपावरून बहुसदस्यीय करावा.
२. सर्व राजकीय पक्षांना आकाशवाणीवरून निवडणूक प्रचार, प्रसार करण्यासाठी निश्चित समान वेळ द्यावा.
३. निवडणूक पद्धतीत मुलभूत आणि आमूलाग्र बदलासाठी एका विशेष समितीची स्थापना करावी. या समितीने सूचविलेल्या सर्वच शिफारशींना मान्यता मिळाली.

**दिनेश गोस्वामी समितीच्या शिफारशी :**

१९९० मध्ये राष्ट्रीय जनता दलाचे सरकार सत्तेवर असताना काही निवडक सुधारणा सूचविण्यासाठी दिनेश गोस्वामी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. या समितीने केलेल्या शिफारशी पुढीलप्रमाणे :

१. निवडणूक आयोग हा त्रिस्तरीय असावा. त्यातील एकाची मुख्य आयुक्त म्हणून निवड करावी. ती करताना उरलेल्या दोन पदांवर उपायुक्तांची निवड करावी. ही निवड करताना मात्र मुख्य आयुक्तांचा सल्ला घ्यावा.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 42 : भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि राजकारण
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

२. निवडणुका लढविण्यासाठी राजकीय पक्षांना राज्य शासनाकडून निधी दिला जावा.
३. एकाच उमेदवारास दोन मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास प्रतिबंध घालावा.
४. कार्यक्षम निवडणुकांसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करावा.
५. प्रत्येक मतदाराला ओळखपत्र उपलब्ध करून देणे.
६. निवडणूकप्रसंगी मतदारांना दिल्या जाणाऱ्या धमक्या, मतदान केंद्रांवर कब्जा करणे यांसारख्या गैरप्रकारांना पायबंद घालण्यासाठी कायदेशीररित्या ठोस अशा उपाययोजना करणे.
७. राष्ट्रीय सन्मान अवमान प्रतिबंधक अधिनियम १९७ नुसार दोषीला सहा वर्षांसाठी निवडणूक लढविण्यास अपात्र समजावे.
८. निवडणूक आयुक्तांना निवृत्तीनंतर इतर कोणत्याही पदावर काम करता येवू नये, अशी तरतूद करावी.
९. निवडणुकीसंदर्भातील सर्व वाद, खठले, इतर मुद्यांच्या चौकशीसाठी एक स्थायी समिती निर्माण करावी.

**निवडणूक सुधारणा आणि न्यायालयीन भूमिका**

दिल्ली उच्च न्यायालयाच्या एका खटल्याबाबत न्यायालयीन आदेशान्वये उमेदवाराचे सरकारी निवास, पाणीपुरवठा, विद्युत, टेलिफोन, वाहने इ. सोयीसुविधांबाबत माहिती निवडणूक अधिकाऱ्यांमार्फत किमान दोन तरी स्थानिक पत्रांतून मतदारांच्या माहितीस्तव प्रसिद्ध करावी. हा आदेश न्यायालयाने दिला तसेच निवडणूक प्रक्रियेशी संबंधित सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाने प्रत्येक उमेदवाराकडून कौटुंबिक, शैक्षणिक, आर्थिक व गुन्हेविषयक माहिती दर्शविणाऱ्या अर्जासोबत प्रतिज्ञापत्र मागवणे, असा आदेश दिला. परिणामी संसदेत यावर चर्चा होवून २००३ मध्ये आयोगाने उमेदवारांसाठी अर्जासोबत शपथपत्र दिले. ज्यामध्ये न्यायालयाने सूचविलेल्या उपरोक्त बाबी अंतर्भूत केल्या आहेत.

RESEARCH JOURNEY

**निष्कर्ष :**

लोकशाही व्यवस्थेत निवडणूक प्रक्रियेस मूर्त स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी केवळ निवडणूक सुधारणा करून भागणार नाही, तर सुधारणावादी निवडणुका घेण्यासाठी लोकजागृती होणे गरजेचे आहे. मतदानातील लोकांचा उत्साह, त्यांचा अधिकाधिक सहभाग वाढवण्याची आवश्यकता आहे.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 42 : भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि राजकारण
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

# निवडणुका आणि प्रसारमाध्यमे

**प्रा. सुवर्णा पंढरीनाथ धामणे**
राज्यशास्त्र विभाग
के. टी. एच. एम. महाविद्यालय,
नाशिक

**प्रस्तावना -**

नागरिकांमध्ये सार्वजनिक जीवनव्यवहारात सहभागी होण्याची भावना आणि राज्यव्यवस्थेबद्दलची आत्मीयता निर्माण करण्याचे सर्वात मोठे माध्यम निवडणुका हे असते. निवडणुकामधून लोकांनी दिलेले कौल सरकारला अधिमान्यता मिळवून देतो, तसेच शांततामय मार्गांनी व सुविहितपणे सत्तांतर घडवून आणतो. यासाठी लोकमत विवेकशील असणे. गरजेचे आहे. या लोकमताला आकार देण्यासाठी सर्वात अग्रेसर म्हणजे प्रसारमाध्यमे आहेत. प्रसारमाध्यमाच्या क्षेत्रात जी तंत्रज्ञानात्मक प्रगती झाली तिच्यामुळे निवडणूक काळात जनसंपर्क करण्याची नेत्याची क्षमता अफाट वाढलीश आहे पण त्याचबरोबर जनतेचा राजकीय सहभागाचे प्रमाणही प्रभावित झाले आहे.

"सार्वजनिक निवडणुका काटेकोरपणे आणि कार्यक्षमतेने पार पडल्या नाहीत तर नुसत्या सार्वजनिक यंत्रणाच कुचकामी ठरत नाहीत तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थाच संकटात सापडते." असे पोलॉक नामक राज्यशास्त्रज्ञ म्हणतो, त्यावरून लोकशाहीसाठी निवडणुकांचे असलेले महत्व स्पष्ट होते. आधुनिक काळात प्रतिनिधित्वाची संकल्पना निवडणुकीशीच अभिन्नपणे जोडली गेली आहे. राज्यसत्तेची अधिमान्यता तिला जनतेकडून असलेली स्वीकार्यता आणि पाठींबा यावरच आधारित असते. लोकांची ईहा हि निवडणुकांमधून अभिव्यक्त होते. मतदारांना योग्य वाटणाऱ्या व्यक्तीवर त्यांच्या प्रतिनिधित्वाचे शिक्कामोर्तब करण्याची संधी निवडणुकांमधून मिळते. मताधिकार हि त्यामुळेच लोकशाही राज्याव्याव्स्थामधील सर्वाधिक मौल्यवान बाब मानली जाते. लोकशाही राज्यव्यवस्थेत गावातील ग्रामपंचायतीच्या निवडणुकीपासून ते देशातील जनतेच्या संरक्षणासाठी, हितासाठी कायदे बनवणाऱ्या संसदेच्या निवडणुकांमध्ये लोकांचे मत तयार करण्यापासूनच ते जनतेचा आव्वाज शासनापर्यंत पोहचविण्याचे काम प्रसारमाध्यमे करत असतात. अर्थातच जनता आणि सरकार यांच्यातील दुवा म्हणून प्रसार्माध्यामानी काम करणे गरजेचे आहे. यामुळेच लोकशाही बळकट होते.

रेडीओ, दूरदर्शन, वृत्तपत्रे,, मासिके, सोशल मिडीया, व अन्य माध्यमे यातून राजकीय माहिती प्रचंड प्रमाणावर प्रसारित होत असते. हि माध्यमे नुसतीच माहिती प्रचंड प्रमाणावर प्रसारित होत असते हि माध्यमे नुसतीच माहिती देत नसतात.तर त्या माहितीचे विश्लेषण आणि निर्वाचनाकरिता असतात. आधुनिक काळात निवडणुका आणि लोकमताला दिशा देणारा महत्वाचा घटक म्हणजे प्रसारमाध्यमे नवस्वतंत्र देशात मध्याद्वारे लोकांना राजकीय संस्था व प्रक्रियांचा परिचय झाला. पारंपारिक अभिवृत्ती बदलल्या, तरुणांच्या महत्त्वाकांक्षा उंचावल्या आणि सरकारी संदेश जनतेपर्यंत पोहोचले. साम्यवादी देशांमध्ये क्रांतिकारी संस्कृती निर्माण करण्यात सरकारनियंत्रित माध्यमाचा वाट मोठा होता. प्रसारमाध्यमामुळे भौगोलिक सीमारेषा आज नष्टच झाल्या आहेत. दूरस्थ देशातील घडामोडीचा प्रभाव पूर्वीहि होते. परंतु, प्रसारमाध्यमांचा वाढता प्रसार आणि वापर यामुळे तो अधिकच जाणवतो. या विविध माध्यमांद्वारे लोकमतांची जडणघडण आणि आविष्करण होताना दिसते. त्यापैकी काही माध्यमे पुढीलप्रमाणे

**वृत्तपत्रे -**

वृत्तपत्रनिर्मिती व वितरण यात तंत्रज्ञानामुळे शक्य झालेली गतिमानता या गोष्टीमुळे वृत्तपत्रांना लोकमतनिर्मिती व आविष्करण या संदर्भात महत्त्व प्राप्त झाले आहे. आपल्या आवडत्या वर्तमानपत्रातील

ISSN : 2348-7143
February 2018

बातम्या आणि दृष्टीकोन समजून स्वीकारण्याकडे व्यक्तीचा काळ असतो. निवडणुका संदर्भातील जाहिराती, पक्षीय नेतृत्व व पक्षाची भूमिका, उद्देश जाहीरनामे यांचा आढावा त्या माध्यमातून सविस्तरपणे घेता येतो. वृत्तपत्राच्या या प्रभावामुळेच आता पक्षनिहाय वृत्तपत्रे झालेली आहेत. तरीही काही वृत्तपत्रे पक्षनिरपेक्ष व नेतानिरपेक्ष मते मांडतात. रेडीओ, दूरदर्शन यांच्या आगमनानंतर देखील वृत्तपत्रे याचा प्रभाव कमी होऊ शकला नाही. रेडीओ, दूरदर्शनवर बातम्या ऐकल्यानंतरही त्या बातम्यांचा तपशील जाणून घेण्यासाठी वृत्तपत्र वाचण्यासाठी लोक उत्सुक असतात. विविध वृत्तपत्रे विविध प्रकारे मते मांडतात. ज्यांना हि मते त्यांच्या गृहीताशी जुळलेली दिसतात ते लोक हि मते आपली म्हणून स्वीकारतात. दुसऱ्यालाही सांगतात. वृत्तपत्रांनी संपादकीयमधून मत व्यक्त करावे असा संकेत होता व बातम्यांना राजकीय रंग असू नयेत. अशी अपेक्षा होती. आता पक्षनिहाय वृत्तपत्रे झाल्यामुळे एकच बातमी भिन्न भिन्न विचारांच्या वृत्तपत्रात वेगवेगळा अर्थ ध्वनित करणारी दिली जाते. पाश्चात्य देशात संसूचन अतिशय प्रगत झालेले आहे. दूरदर्शनवर अगदी ताजी माहिती व तत्परतेने त्याचे विश्लेषण व संभाव्य परिणामावर चर्चा सादर केली जाते. असे असताना देखील त्या देशात वृत्तपत्रांचे महत्त्व कमी झालेले नाही.

पक्षनिहाय काम करणाऱ्या वृत्तपत्राचा वाचक निश्चित असतो हा वाचक पक्षापासून दूर जाऊ नये याची काळजी घेतली जाते. निवडणूककाळात जाहीराती, सभा, प्रचारमोहीम , पक्षीय मुद्दे, प्रतीस्पर्धीवरील आरोप अतिशय स्पष्टपणे जनते पर्यंत पोहचवले जाते.

**रेडीओ किंवा आकाशवाणी -**

रेडीओ अत्यंत प्रभावी व व्यापक अर्थाने लोकमत निर्मितीचे साधन आहे. ज्या देशात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. त्या देशासाठी वृत्तपत्राना मर्यादा येतात. पण हि मर्यादा रेडीओला येत नाही. १९८४ पर्यंत दुरदर्शन सार्वत्रिक होण्याच्या अगोदर सर्वदूर पोहोचण्याचे एक माध्यम होते. रेडीओवरून दिल्या जाणार्या बातम्या, विविध प्रश्नावर केली जाणारी चर्चा, महत्त्वाच्या विषयावर प्रसारित केली जाणारी भाषणे निश्चितच निवडणुका त्यामुळे प्रभावित होतात. १९७७ पर्यंत या प्रसारमाध्यमावर भारत सरकारचे नियंत्रण होते. त्यामुळे त्याची विश्वासाहर्ता कमी झालेली होती. १९७५-७७ या काळात माध्यमांचा वापर केवळ सरकारी पक्षाची बाजू उजळ करण्यासाठीच केला गेला. त्यांचा परिणाम भारतीय लोक वास्तव समजण्यासाठी बी.बी.सी. ऐकू लागले. आजही ब्रिटीश ब्रोडकास्टिंग कोर्पोरेशन अर्थात बी.बी.सी. ला विश्वासार्हता आहे. बहुतेक लोकशाही देशात या माध्यमांचा वापर सर्व राजकीय पक्षासाठी रेडिओवर त्यांच्या पक्षाची मते मांडण्यासाठी वेळ दिला जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी रेडिओच्या माध्यमातून मन कि बात या कार्यक्रमातून सत्ताधारी पक्षाची भूमिका सातत्याने मांडताना आपल्याला दिसतात. दुरदर्शन व वृत्तपत्राच्या तुलनेत रेडीओ हे प्रसारमाध्यम अतिशय स्वस्त आहे. त्यामुळे अधिकाधिक लोकांपर्यंत या माध्यमामार्फत पोहचता येते.

**दूरदर्शन -**

लोकनिर्मितीचे सर्वात प्रभावी प्रसारमाध्यम आहे. भारत व पाश्चात्य देशात निवडणुकीच्या वेळी उमेदवाराची राजकीय मते, आजमावण्यासाठी चर्चा आयोजित केली जाते. या चर्चेत प्रभावी मते मांडणार्यास मतांच्या संदर्भात निश्चितच फायदा होतो. भारतात दूरदर्शन मुले राजकीय नेते व त्यांची मते प्रत्यक्ष पहावयास मिळतात. शिवाय देशातील विविध प्रदेशातील परिस्थितीचा आणि लोकमताचा अंदाज घेता येतो. लोकांच्या समस्या. इच्छा, अपेक्षा राजकीय नेतृत्वापर्यंत पोहोचतात. दोन्ही दृष्टीने एकमेकांच्या विचारांची देवाणघेवाण होते. त्यामुळे दोन फायदे झाले. एक तर, राजकीय संघटनाच्या माहितीत वाढ झाली. परिणामतः राजकीय सहभागात वाढ झाली. दुसरा म्हणजे,राजकीय उदासीनता कमी होण्यास मदत झाली. जनसंपर्क वाढला.

**सोशल मिडिया -**

सध्या सर्वात जास्त सोपे आणि व्यापक असे प्रसारमाध्यम म्हणजे सोशल मिडिया. पूर्वी गप्पा मारण्यासाठी मुले कट्ट्यावर किंवा एखाद्या चौकात जमायची, परंतु आता गप्पासाठी उठून कुठे जायची गरज उरली नाही. हातात इंटरनेट नावाचे एक आयुध आले. त्यात सोशल मिडिया नावाचे शस्त्र आले आणि तरुणाईच्या आवाक्यात आकाश आले. राजकारण, निवडणुका यांचेही व्यासपीठ तिथेच भरले. माहिती आणि संवादाचे तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे अंतराचे बंधन नाहीसे झाले आहे. आणि आज सर्वांना सर्व प्रकारची माहिती मिळू शकते. तसेच परस्परांशी गतिशील संवादही होऊ शकतो. अशा प्रकारे सर्व जग जोडले जाऊन ' ग्लोबल व्हिलेज' हि संकल्पना प्रत्यक्षात उतरली आहे. तंत्रप्रणालीच्या संयोगामुळे विशेषतः चित्र, ध्वनी आणि माहितीच्या एकत्रित वापरामुळे एकात्मिक माहिती, संवाद आणि करमणुकीचे एक वेगळे दालन उघडले आहे. निवडणुकीच्या क्षेत्रातही संगणकीय तंत्र आणि उपकरणांनी स्वतःचा ठसा उमटवला आहे. प्रत्यक्ष मतदानापासून विजयी उमेद्वाराबाबातचे अंदाज मतदानाआधीच्या प्रचाराची धामधूम आता सोशल मीडियामुळे चांगलीच बदलली आहे. उमेदवाराची प्रतिमा, त्याने केलेली विधाने या बाबींना फेसबुक आणि ट्वीटरवर जास्तीतजास्त लाइक्स आणि शेअरिंग मिळवणे हे प्रत्यक्ष मिरवणुका, पोस्टर आणि हैडबिलाइतके किंवा त्यापेक्षाही महत्त्वाचे मानले गेले आहे. स्मार्टफोन आणि इतर तंत्राच्या प्रसाराच्या विलक्षण वेगामुळे हे पाहायला मिळाला आहे. मतदारांचा आर्थिक-सामाजिक –शैक्षणिक स्तर तसेच वयोगटाबाबतची माहिती एकत्रितपणे देणारे नकाशे दाखविणे व मुख्य म्हणजे ते एकमेकांवर ठेवून पाहणे शक्य झाले आहे, उदा. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये कोणत्या क्षेत्रातील कशा प्रकारच्या मतदारांनी कोणत्याच पक्षाला मतदान केले. हे सुपरइंपोज केलेल्या नकाशाच्या सहाय्याने अल्पावधीतच मनोरंजक पद्धतीने पाहता आले. सोशल मिडिया हि एक ताकदच सर्वसामान्य वाचकांना लाभली आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. वृत्तपत्र, रेडिओ, मासिके इत्यादी मार्फत फक्त एका दिशेने संवाद साधला जाऊ शकतो. याउलट, या माध्यमाद्वारे दोन्ही बाजूनी म्हणजेच वाचक व संपादक संपर्क होऊन संभाषण घडू शकते. त्वरित माहितीचा प्रसार आणि आदानप्रदान हे त्याचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

बराक ओबामा २००८ मध्ये निवडून येणारे पहिले आफ्रिकन अमेरिकन होते. बाराल ओबामा यांना सोशल मिडिया राष्ट्राध्यक्ष म्हटले जाते. त्यांनी निवडणूककाळात सोशल मिडीयावर एक मोहीमच राबवली आणि एक उमेदवार म्हणून त्यांना त्याचा फायदा झालेला दिसून येतो. निवडणूककाळात सोशल मिडीयावर स्मरणपत्रे पाठवीत. फेसबुकवर लोकांशी संवांद साधत. नरेंद्र मोदी यांनीही निवडणूक काळात इतर पक्षांच्या मानाने प्रभावीपणे प्रसारमाध्यमाचा विशेषतः सोशल मिडीयाचा वापर केला. आजही २०१४ ची निवडणुकीत प्रसारमाध्यमांची भूमिका चर्चेचा विषय आहे.

सोशल मिडिया मोहीम केवळ तंत्रज्ञानावर आधारित नाही तर त्यात सामाजिक आचरणाचा सुद्धा विचार व्हायला हवा. आज संशोधनानुसार ६६% सोशल मिडिया वापरणारे राजकीय कृतीशी जोडून राहतात. आज निवडणूक काळात पक्ष्य टीमला सोशल मिडीयाच्या वापरासाठी कुशल बनवले जाते. सोशल मिडीयावर किती पोस्ट केले हे महत्वाचे नाही तर युजरनी किती वेळा लाइक्स दिल्या यावरून तुमची सत्ता कळते. सोशल मिडिया राजकीय सुसंवादाचा एक नवीन पायंडा पडत आहे. लोक राजकीय मिडीयावर असे वावरतात जसे कि, कुटुंब, मित्र, महाविद्यालयीन तरुण, आणि स्वतःचे हितासाम्बाश असणार्या गटाप्रमाणे एखाद्याला शिफारस करतात आणि हा एक प्रकारचा विश्वास आहे. ज्याच्या आधारावर तुम्ही जनतेचे मन वळवू शकतात. मिडीयाच्या माध्यमातून सामाजिक आणि राजकीय आचरणाला प्रभावित करणाऱ्या प्रेरक शक्ती बऱ्याच आहेत. राजकीय नेतृत्व आणि पक्ष शब्द्प्रसार, जाहिरात, विकाससंबंधी उद्देश, त्यातून इतर मतदारांना प्रोत्साहित

ISSN : 2348-7143
February 2018

करणे, निधीबद्दल समर्थन करणे, आश्वासन देणे, आशावाद निर्माण करणे या गोष्टी या माध्यमाच्याद्वारे जलद आणि सक्षमपणे लोकांपर्यंत पोहोचवतात. खरे तर आधुनिक प्रसारमाध्यमे हि पारंपारिक जनसंपर्कापेक्षा विविध गुणधर्माच्या आधारे जनतेला भावनात्मक आवाहन करणे आणि मन वळवणे अशा पद्धतीने संचारण करण्याचा प्रकार आहे.

प्रसारमाध्यमाच्या वापराबाबतीत आपल्याला ही गोष्ट स्वीकारावी लागेल की, चांगल्या बदलाबरोबर वाईट परिणामही येत असतात. साहजिकच या माध्यमाचा गैरवापर होताना आढळतो. प्रत्येक व्यक्तीच्या वर्तणुकीवर सामाजिक मुल्यांचा परिणाम झालेला असतो. भारतीय समाजात प्रोटीन वोटर्स म्हणजे विचारसरणी नसलेला मतदार किंवा भावनेच्या राजकारणाला बळी पडणारा मतदार हा प्रकार जास्त आढळतो. राजकारणात वागणारी व्यक्ती हि समोर वेगळी आणि पडद्यामागे वेगळी असते. यामुळेच प्रसारमाध्यामेदेखील राजकारणाच्या प्रभावापासून अलिप्त नाहीत. आज व्यक्ती मिडीयावर अवलंबून आहेत पण बहुतांशी समाज त्याच्या वापरापासून दूर आहे. सोशल मिडीयावर चालवणारे एक प्रकारे आपणच आणि त्याचे जे काही बरे वाइट परिणाम होतात ते आपल्यावरच होतात. आपण त्याचा किती कार्यक्षमपणे वापर करतो किंवा किती विवेकबुद्धीने त्याचा अर्थ लावतो हि गोष्ट देखील महत्त्वाची आहे.

अनेक देशात आज लोकमताचे मोजमाप केले जाते. त्यासाठी अनेक पध्दतीचा वापर केला जातो. मतदानपूर्व दिवसात प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे लोकमताचा कौल सांगितला जातो. मतदानानंतर व निर्वाचानाचा निकाल लागण्यापूर्वी निवडणूक निकाल (इक्झीट पोल) व्यक्त केला जातो.विशिष्ट प्रश्नावर जनमत आजमावले जाते. थोडक्यात, प्रश्नोत्तर, मुलाखती, सर्वसाधारण पाहणीद्वारे जनमताचे मापन केले जाते. प्रसारमाध्यमे विशिष्ट प्रश्नावर काही विशिष्ट व्यक्तीनीच दिलेल्या मताला व प्रतिक्रियांना प्रसिद्धी देतात. परंतु, जनतादेखील इतरांचे मत स्वतःचे मत म्हणून व्यक्त करते. स्वतःचे असे प्रभावी मत त्यांचे दिसत नाही. याशिवाय प्रसारमाध्यमाच्या तांत्रिक प्रगतीमुळे लोकमत बिघडवणाऱ्या शक्तीची ताकद इतकी बेफाम वाढली आहे कि ,त्यामुळे सामुहिक ईहा बाजूला राहून काही वरचढ व सशक्त व्यक्तींच्या स्वार्थी आकांक्षाचे ती माध्यमे साधन ठरण्याची शक्यता नजरेआड करता येत नाही. प्रसारमाध्यमाद्वारे प्रतिस्पर्धीविषयी अपप्रचार करून मत वळवण्याचा प्रयत्न करणे, त्यांच्यावर पुराव्याअभावी खोटे आरोप करणे, विघातक शक्तीद्वारे फुट पाडून दंगली करणे, हिंसाचार घडवून आणणे हे उद्दीष्ट डोळयासमोर ठेवून खोट्या अफवा , खोट्या क्लिप्स दाखवल्या जातात. चलत्चित्रणात बदल करून आपल्याला हवे ते चित्रण निर्माण करणे ,चित्रे अदलाबदल करून विपर्यास व भडक दृश्ये समाजकंटकाकडून टाकले जातात. त्यामुळे यावर जाणीवपूर्वक विचार करणे आवश्यक आहे. १. प्रसारमाध्यामानी आपली सदसद्विवेकबुद्धीने चालली पाहिजे. TRP मुळे जे त्यचे व्यापारीकरण झाले आहे. त्याएवजी राजकीयीकरण आणि सामाजीकरण व्हायला पाहिजे. २. आपल्या हितसंबंधी व्यक्तीने मांडलेल्या मर्यादित तथ्यांपुरते आपले ज्ञान मर्यादित राहू नये. लोंकाना सर्व व संपूर्ण तथ्ये सहजासहजी उपलब्ध झाली पाहिजेत. जनता भावनाविवश होऊन विचार करते. त्यांच्या विचारणा दिशा देण्याचे काम प्रसारमाध्यमे प्रभावीपणे करू शकतात. ३. प्रसारमाध्यमाद्वारे मिळणारी माहिती निरोगी, पूर्वग्रह-विरहित, सार्वत्रिक असली पाहिजे. चाकोरीबद्ध असता कामा नये. ४. भावनिक आवाहनातून तात्कालिक स्वार्थावर डोळा ठेवण्याऐवजी दूरगामी हित लक्षात घेवूनच प्रसारमाध्यामानी लोकांच्या विवेकास आवाहन केले पाहिजे. ५. प्रवाहाविरुद्ध जाऊन आपल्या भूमिकेशी सर्वानीच इमान राखण्याची निर्धारवृत्ती असली पाहिजे. ६. जनतेने पक्ष, संकुचित संघटीत समूह, पक्षीय वृत्तपत्रे अथवा सत्ताधाऱ्यांची प्रचारमाध्यमे यांच्याकडे आपली विवेकशक्ती गहाण टाकू नये. ७. देशातील सक्षम सायबर कायद्याबरोबर अंमलबजावणी देखील सक्षमपणे होणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष :**

भारतासारख्या लोकशाही संपन्न असलेल्या देशात प्रसार माध्यमांच्या स्वातंत्र्यास संरक्षण देण्याची प्राथमिक जबाबदारी हि सरकारची असते. देशातील सत्ताधारी सरकारच्या मताप्रमाणे प्रसारमाध्यमांनी वागणे हे लोकशाहीस अभिप्रेत नाही. २०१४ च्या निवडणुकीच्या मैदानात कोंग्रेसच्या सरकारचे घोटाळे, भ्रष्टाचार माध्यमांनी ज्या पद्दतीने दाखवले तसेच घोटाळेबाज सरकारविरुद्ध जनमत तयार करण्यात माध्यमांची भूमिका हि भाजपला निवडून देण्यासाठी खूप महत्त्वाची ठरली होती. भारतीय समाजाची पाळेमुळे भरभक्कम आहेत. त्यामुळे त्यांच्यावर पडणारा प्रभाव हा काहीवेळेस तत्कालीन असतो तर काही वेळेस दीर्घकालीन असतो. हे विसरून चालणार नाही. त्यामुळे २१ व्या शतकात जर तुमच्या माझ्या देशाला आधुनिकतेकडे महासत्तेकडे न्यावयाचे असेल तर माध्यमांनी सकारात्मक दृष्टीकोनातून निःक्षपातीपणे चालू घटनावर भाष्य करणे गरजेचे आहे. देशातील सामान्य माणसाचे प्रश्न, समस्या, अडचणी या निःक्षपातीपणे सरकारच्या कानावर घालण्यासाठी माध्यमांचा खूप मोठ्या प्रमाणावर योग्य वापर झाला पाहिजे. सरकार आणि जनता यातील एक सक्षम दुवा म्हणून प्रसारामाध्यामानी कार्य केले पाहिजे.

**संदर्भ :-**

१) डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण, राजकीय सिद्धांत आणि विश्लेषण, पिंपळापुरे प्रकाशन , नागपूर
२) डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण, शासन आणि राजकारण, तौलनिक अध्ययन, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर
३) जाधव तुकाराम, आणि शिरापूरकर महेश, भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया , युनिक अकादमी , पुणे
४) ओ.पी.गाबा, (अनु. तुकाराम जाधव), अन इंट्रडक्सन टू पोलीटीकल थिअरी, के सागर प्रकाशन, पुणे
५) Hoveyda Abbas, Ranjay Kumar, mohammed Afta, Indian Government and politics, Pearson pubilcation, Delhi.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 42 : भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि राजकारण
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

# भारतीय निवडणूक प्रक्रिया विकास आणि सुधारणा

**प्रा. डी. डी. ठाकरे**
राज्यशास्त्र विभाग
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नांदगाव,
ता. नांदगाव जि. नाशिक

**प्रस्तावना :**

इंग्लंडमध्ये १६८८ च्या क्रांतीनंतर राजाची सत्ता कमी होत जाऊन विधिमंडळाची सत्ता वाढत गेली. यातून संसदीय शासन पद्धत पुढे आली. नंतर झालेल्या फ्रेंच राज्य क्रांतीने विधिमंडळातील प्रतिनिधीचा आधार व्यापक आणि व्यवहारिक बनला. यातून प्रतिनिधीत्व आणि प्रातिनिधिक शासन पद्धतीचे महत्व वाढले. प्रातिनिधिक लोकशाही ही निवडणुकीच्या माध्यमातून उभी राहिली आहे. लोकशाहीत अंतिम सत्ता जनतेच्या हाती असते. जनता सार्वभौम असते हे तत्व निवडणुकीच्या माध्यमातून प्रस्थापित होते. यामुळे निवडणुकीस महत्व प्राप्त होते. आधुनिक काळात राज्यांनी प्रातिनिधिक लोकशाहीचा स्वीकार केल्याने लोकांना आपले प्रतिनिधी निवडता येतात तसेच राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळते नागरिक राजकीयदृष्ट्या जागरूक व जबाबदार बनतात. नागरिक निवडणुकीच्या माध्यमातून आपले राज्यकर्ते कोण असावेत याचा निर्णय घेऊन शासनावर नियंत्रण ठेवण्याचे अतिशय महत्वाचे काम करीत असतात. आपल्याला निवडणुकीस सामोरे जावयाचे आहे म्हणून राज्यकर्ते ही जबाबदारीने काम करतात. राजकीय पक्षांची जबाबदारी व महत्व वाढते. राजकीय पक्षांवर नियंत्रण ठेवण्यासाठी निवडणुकीचा उपयोग होतो. नागरिकांना राजकीय शिक्षण मिळते. लोकशाहीत अहिंसात्मक मार्गाने सतांत्तर, खऱ्या लोकशाहीचा अविष्कार, लोकशाहीमध्ये श्रेष्ठ जीवन मूल्यांना महत्व प्राप्त होते. निवडणूक नसेल तर प्रातिनिधिक लोकशाही यशस्वी होणार नाही.

RESEARCH JOURNEY

**संशोधनाची उद्दिष्टे**

१ भारतीय निवडणूक प्रक्रीयाचे अध्ययन करणे.

२ निवडणूक सुधारणाचा अध्ययन करणे.

**गृहीतके**

१ भारतीय निवडणूक आयोग चांगल्या प्रकारे कार्य करत आहे.

२ निवडणूक सुधारण्यासाठी उपाय केले जात आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

**तथ्य संकलन**

प्रस्तुत विषय आंतरशाखीय दृष्टीकोनातून अध्ययनासाठी निवडला असल्यामुळे ग्रंथ,वर्तमानपत्रे,मासिके इ. दुय्यम साधनांचा तथ्य संकलनासाठी उपयोग करण्यात आला आहे.

**भारतातील निवडणूक प्रणालीचा विकास :**

भारतीय घटनेने संसदीय लोकशाहीचा पुरस्कार केला आहे. देशात खऱ्या अर्थाने लोकशाही अस्तित्वात यावयाची असेल तर खुल्या आणि स्वच्छ वातावरणात निवडणुका होऊन योग्य व पात्र अशा प्रतिनिधीची निवड

ISSN : 2348-7143
February 2018

होणे आवश्यक असते. लोकशाहीत राज्यकारभार जनतेच्या संमतीतून आणि टीकेतून चालतो. अब्राहम लिंकन यांच्या लोकांचे, लोकांकडून लोकांसाठी असलेले शासन म्हणजे लोकशाही प्रत्यक्षात आणण्यासाठी निवडणूक यंत्रणा आवश्यक असते. लोकशाही आणि निवडणुका या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. भारताने प्रातिनिधिक शासनाचा स्वीकार केल्याने मध्यवर्ती सरकार आणि घटक राज्यांची सरकारे यांच्यातील प्रतिनिधी निवडणुकीद्वारे निवडले जातात. भारतीय घटनेने नागरिकांना प्रौढ मतदानाचा अधिकार दिला आहे. त्याचबरोबर निवडणूक लढविण्याचा अधिकारही दिला आहे. लोकसंख्येच्या आधारावर मतदार संघाची निर्मिती करून या मतदार संघातून सार्वत्रिक निवडणुका घेऊन प्रतिनिधीची निवड केली जाते. अर्थातच निवडणुका घेणे, मतदारसंघ, मतदारयाद्या तयार करणे, नियंत्रण ठेवणे, मतमोजणी व मार्गदर्शन करण्यासाठी निवडणूक आयोग असावे.

निवडणुका घेण्यासंबंधी एखादे कायमस्वरूपी निवडणूक मंडळ असावे, की राष्ट्रपतीकडून वेळोवेळी मंडळ नियुक्त करावे असे दोन पर्याय भारतीय घटनाकारांसमोर होते. पूर्ण विचारांती कायमस्वरूपी निर्वाचन आयोगासंबंधी तरतूद घटनेत असावी असे ठरविण्यात आले. त्यानुसार निश्चित कायम स्वरूपाचा निर्वाचन आयोग स्थापन करण्यात आला. तसेच संसद आणि घटक राज्याची विधिमंडळे यांच्यासाठी एकाच निर्वाचन आयोग राहील त्याचा प्रमुख 'मुख्य निर्वाचन आयुक्त' त्यांना मदतनीस म्हणून प्रादेशिक आयुक्त राहतील हे प्रादेशिक आयुक्त घटक राज्याच्या नियंत्रणाखाली न राहता ते मुख्य निर्वाचन आयुक्ताच्या अधिकाराखाली राहतील. भारतीय घटनेच्या १५ व्या भागात निवडणुका या शीर्षकांतर्गत कलम ३२४ ते ३२९ यात तरतूद करण्यात आली आहे. कलम ३२४ मध्ये असे म्हटले, की 'निवडणुकांवर देखरेख करण्यासाठी, निवडणुकांचे मार्गदर्शन व संचालन करण्यासाठी एक निवडणूक आयोग असेल.' यानुसार निवडणूक प्रक्रियेचे क्रियान्वयन करण्यासाठी २५ जानेवारी १९५० रोजी भारतीय निवडणूक आयोगाची निर्मिती करण्यात आली. आयोगाने आपले कार्य दिनांक २६ जानेवारी १९५० पासून सुरु केले. निर्वाचन आयोग हे एक स्वायत्त आणि अर्ध न्यायिक संस्था आहे. १९९३ नंतर घटक राज्यपातळीवर स्वतंत्र राज्य निर्वाचन आयोगाची तरतूद करण्यात आली आहे.

स्वातंत्र्यानंतर लगतच्या काही वर्षात मुक्त व न्याय्य निवडणुका घेणे फारसे अवघड नव्हते पण राजकारण जसजसे गुंतागुंतीचे होत गेले, राजकीय पक्षांमधील स्पर्धा जसजसी तीव्र होत गेली तसतसे निवडणूक आयोगाचे काम अवघड होत गेले. प्रत्येक नागरिकाचे मत निवडणुकीत अमुल्य असते. त्यामुळे उमेदवार आणि राजकीय पक्ष जास्तीत जास्त मते मिळवण्याचा कसोसीने प्रयत्न करतात. मताच्या प्राप्तीसाठी वैध अवैध, नैतिक अनैतिक अशा मार्गाचा स्वीकार करतात. मतदान केंद्र ताब्यात घेणे, मतपेट्या पळवणे, मतदारांना भयभीत करून मते विकत घेणे, मतदारांच्या भावना भडकावणे, जाती धर्माचा वापर करून मते मिळवणे अशा भ्रष्ट आणि गैर मार्गाचा अवलंब केला जातो. यासाठी निवडणूक सुधारणा केल्या जात आहेत.

**निवडणूक सुधारणा**

भारतातील निर्वाचन प्रक्रियेत वाढत चाललेले दोष पाहिले असता निवडणूक सुधारणाची गरज जाणवते. राजकारण हा बदमाशांचा खेळ आहे अशी मतदारांची प्रवृत्ती वाढत आहे. पक्षांतराच्या राजकारणाने आणि संयुक्त आघाड्यांच्या अयशस्वी शासन प्रणालीने ही प्रवृत्ती वाढीस लागली आहे. पक्षांच्या कार्यक्रमा ऐवजी व्यक्तिमत्वाला अधिक महत्व देण्यात येते. निवडणुकीचा वाढत चाललेला खर्च, बोगस मतदान, धर्म, जात यांचा होणारा वापर रोखण्यासाठी व निवडणुका अधिक निपक्षपाती, निर्दोष होण्यासाठी भारतात निवडणुक सुधारणासाठी प्रयत्न झालेले आहेत. यासाठी केंद्र शासनाने विविध समित्या स्थापन केल्या आणि

ISSN : 2348-7143
February 2018

काही मुख्य निर्वाचन आयुक्तांनी निवडणुकीत आलेल्या अनुभवाच्या आधारे निवडणूक सुधारणासाठी काही शिफारशी केल्या.

### यशवंतराव चव्हाण समिती

भारतात १९६७ नंतर मोठ्या प्रमाणावर पक्षांतराची सुरूवात झाली. त्यामुळे त्यावर नियंत्रण आणण्यासाठी व निवडणूक सुधारणा सुचवण्यासाठी तत्कालीन गृहमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या अध्येक्षेतेखाली १९६८ साली यशवंतराव चव्हाण समिती स्थापन केली या समितीने पुढील शिफारशी सुचवल्या

१. एका सार्वजनिक आचारसंहितेचा स्वीकार राजकीय पक्षांनी करावा व पक्षांतर करणाऱ्या व्यक्तीस आपल्या पक्षात प्रवेश देऊ नये.
२. ज्या राजकीय पक्षामार्फत जो प्रतिनिधी निवडून आला त्याचा कार्यकाल पूर्ण होईपर्यंत त्यास पक्षात राहण्याचे बंधन असावे.
३. कार्यकारी मंडळाचे सदस्य प्रामुख्याने पंतप्रधान, मुख्यमंत्री व मंत्री कनिष्ट सभागृहात निवडून आलेले असावेत.
४. मंत्रिमंडळातील सदस्यसंख्या निश्चित केल्यानंतर त्यात वाढ करू नये.
५. पक्षांतर करणाऱ्या मंत्रिपद देऊ नये.

### संयुक्त संसदीय समिती

१९७२ मध्ये संसदेने संयुक्त समिती स्थापन केली या समितीने पुढील शिफारशी केल्या

१. निवडणूक पद्धतीत अमुलाग्र व पायाभूत बदल करण्यासाठी विशेष समितीची निर्मिती करावी.
२. आकाशवाणीवरून निवडणूक प्रचारासाठी सर्व राजकीय पक्षांना समान वेळ द्यावा.
३. निवडणूक आयोग बहुसदस्यीय असावा.

RESEARCH JOURNEY

### तारकुंडे समिती

महाराष्ट्र उच्च न्यायालयाचे माजी न्यायधीश बी.एम.तारकुंडे यांच्या अध्येक्षेतेखाली १९७४ मध्ये तारकुंडे समिती स्थापन केली या समितीने देखील निवडणुकीत सुधारणा होण्यासाठी पुढील सुधारणा सुचवल्या :

१. मतदाराचे वय २१ वर्षा ऐवजी १८ वर्ष करावे.
२. राजकीय पक्षांनी आपल्या उत्पनाची साधने व खर्चाची साधने दाखवणे बंधनकारक करावे.
३. निवडणूक काळात मंत्रिमंडळातील सदस्यांनी शासकीय खर्चाने दौरे करू नये.
४. लोकसभा व विधानसभेच्या निवडणूक अनामत रक्कमेत वाढ करावी.
५. राज्यात राज्य निवडणूक आयोग स्थापन करावेत.
६. केंद्रीय निवडणूक आयोग त्रिसदस्यीय असावा तसेच आयुक्तांची निवड राष्ट्रपतीने पंतप्रधान, लोकसभा विरोधी पक्ष नेते, सरन्यायाधीश या तिघांच्या समितीने करावी.
७. निवडणूक आयोगास मदत करण्यासाठी केंद्र व राज्यात निवडणूक परिषदा तयार कराव्यात.

### दिनेश गोस्वामी समिती

१९९० च्या राष्ट्रीय मोर्चा सरकारने दिनेश गोस्वामी यांच्या अध्यक्षेतेखाली निवडणूक सुधारणा सुचवण्यासाठी समिती गठीत केली या समितीने पुढील शिफारशी केल्या

१) निवडणूक आयोग तीन सदस्यीय असावा.

२) निवृतीनंतर आयुक्तांना इतर पदावर काम करता येऊ नये.
३) मतदारांना बहुउद्देशीय ओळखपत्र देण्यात यावे.
४) एका उमेदवारास दोन मतदार संघातून निवडणूक लढवण्यास प्रतिबंध असावा.
५) निवडणुकीसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करणे
६) मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना राज्याकडून निधी दिला जावा.
७) आदर्श आचारसंहितेतील महत्वपूर्ण तरतुदीना घटनात्मक स्थान द्यावे.
८) निवडणूक केंद्रावरील गैरप्रकार रोखण्यासाठी कायदेशीर उपाय करावेत.
९) राष्ट्रीय सन्मान अवमान प्रतिबंध कायद्याद्वारे दोषीस निवडणुकीस अपात्र मानावे.

या समित्या बरोबरच काही मुख्य आयुक्तानीही निवडणुकीत सुधारणा करण्यासाठी शिफारशी सुचवल्या

**एस. पी. सेनवर्मा**

या मुख्य निवडणूक आयुक्तांनी १९७२ साली निवडणूक सुधारणाचे पॅकेज सुचवले पण ते स्वीकारण्यात आले नाही.

**एस. एल. शकधर**

या मुख्य निवडणूक आयुक्तांनी निवडणूक सुधारणाविषयक १९७७ मध्ये पुढील शिफारशी केल्या

१. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळी घेण्यात याव्यात.
२. लोकसभा व विधानसभा सदस्यांच्या संख्येमध्ये बदल न करता दर दहा वर्षांनी मतदार संघाची पुनर्रचना करण्यात यावी.
३. आरक्षण जागेत चक्राकार पद्धतीने बदल करणे.
४. राजकीय पक्षांची नोंद अनिवार्य करणे.
५. निवडणूक याचिकांची हाताळणी करण्यासाठी निवडणूक आयोग सक्षम बनवणे.
६. निवडणूक निधी उभारणे.

**आर. के. त्रिवेदी**

१९८२ ते १९८३ या काळात विविध घटक राज्यातील सार्वत्रिक निवडणुकांमधून आलेल्या अनुभवाच्या आधारे आर. के. त्रिवेदी या मुख्य आयुक्ताने १९८३ मध्ये निवडणूक सुधारणाबाबत पुढील शिफारशी केल्या

१. निवडणूक आयोगाला स्वातंर्त्याची हमी द्यावी.
२. प्रादेशिक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी कलम ३२४ (४) मधील तरतूद उपयोगी ठरावी.
३. कर्तव्याचे उल्लंघन करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाईची अधिकार आयोगाकडे असावा.
४. निवडणूक सेवेत असणाऱ्या सेवकांना त्याच मतदान केंद्रावर मतदान करण्याची परवानगी द्यावी.
५. दुर्बल घटकासाठी फिरते मतदान केंद्र उभारावे.
६. जम्मू काश्मीर लोकप्रतिनिधी कायदा १९५७ मधील तरतुदीप्रमाणेच १९५१ सालच्या लोकप्रतिनिधी कायद्यात दुरुस्ती करण्यात यावी.

**टी. एन. शेषन**

या मुख्य निवडणूक आयुक्ताने १० फेब्रुवारी १९९२ मध्ये पुढील शिफारशी केल्या

१. आदर्श आचार संहितेवर भर
२. मतदारांना पुरेसे संरक्षण

ISSN : 2348-7143
February 2018

३. राज्यसभा सदस्यांनी वास्तव्य करत असलेल्या राज्याचे प्रतिनिधित्व करावे.
४. ओळखपत्र देण्याची व्यवस्था
५. विशिष्ठ पद्धतीने निवडणूक खर्च देण्यात यावा.
६. विधानसभा निवडणुका जाहीर झाल्यानंतर केंद्र आणि राज्य सरकारांनी धोरणात्मक निर्णय घेऊ नये.
७. धर्मावर आधारित प्रचार करू नये.
८. निवडणुकीचा काल विश्लेषण करणाऱ्या दूरदर्शनवरील कार्यक्रमाना बंदी.
९. मद्यपान विक्री बंदी विना परवाना बंदुकीची जप्ती.
१०.निवडणुकीसाठी इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या वापरावर नियंत्रण.

**टी. एस. कृष्णमूर्ती**

२००४ मध्ये टी. एस. कृष्णमूर्ती या मुख्ये आयुक्तांनी पुढील निवडणूक सुधारणा सुचविल्या
१. मतदारांना नकारात्मक मतदानाचा पर्याय असावा.
२. लोकसभेमध्ये महिला प्रतिनिधित्व वाढवण्यात यावे.
३. राजकीय पक्षांनी त्यांचा हिशोब प्रकाशित करावा.

वरील प्रमाणे केंद्र शासने निवडणूक सुधारणा करण्यासाठी काही समित्या स्थापन केल्या व या समित्यांनी तसेच काही मुख्य आयुक्तांनी ज्या शिफारशी केल्या त्या अनुषंगाने पक्षांतरास आळा घालण्यासाठी १९८५ मध्ये ५२ वी घटना दुरुस्ती करून पक्षांतर बंदी कायदा करण्यात आला, १९८९ मध्ये ६१वी घटना दुरुस्ती करून मतदाराचे वय २१ वर्षावरून १८ वर्ष करण्यात आले, मतदारस बहुउद्देशीय ओळखपत्राची तरतूद, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर, मतदारस नकारात्मक मतदानाचा पर्याय अशा अनेक महत्व पूर्ण सुधारणा करण्यात आल्या आहेत. याशिवाय मतदान सक्तीचे करावे, विधानसभा व लोकसभा यांच्या निवडणुका या एकाच वेळी घेण्यात याव्यात, निवडणूक खर्च शासनाकडून केला जावा यासारख्या सुधारणा घडून आणण्याबाबत विचार होतो आहे.

**समारोप**

निवडणुका हा लोकशाही व्यवस्थेचा मूळ आधार आहे. निवडणूक प्रक्रिया राबवत असताना ज्यात सुधारणा झाली पाहिजे असे निवडणूक आयोगाला वाटते त्या त्या गोष्टीमध्ये निवडणूक आयोगाने योग्य वेळी सुधारणा करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. सर्वसाधारण मतदाराला निवडणुकीची प्रक्रिया समजावी, मतदाराला स्वत:च्या विवेकबुद्धीने निर्णय घेऊन मतदान करता यावे, मतदान प्रक्रियेत होणारा गैरव्यवहार टाळता यावा, कमीत कमी खर्च आणि कमीत कमी काळात निवडणुकीची प्रक्रिया पार पडून ती अधिकाधीक विश्वसनीय व्हावी असा प्रयत्न निवडणूक आयोग करत आहे.आदर्श आचारसंहिता निर्माण करून निवडणुकांचे पावित्रे टिकवण्याचा प्रयत्न निवडणूक आयोग करतो आहे. प्रौढ मताधीकारामुळे लोकसंख्या वाढीबरोबर मतदारांची संख्या वाढत आहे परंतु मतदानाची टक्केवारी फारशी वाढताना दिसत नाही. यासाठी केवळ निवडणूक आयोगानेच कार्य केले पाहिजे असे नाही तर नागरिकांचे हे कर्तव्य आहे की आपल्याला मिळालेल्या मूल्यवान मताधिकाराचा सतसत विवेक बुद्धीने वापर करावा.

**संदर्भ**

१. भारतीय राज्यघटना आणि घटनात्मक प्रक्रिया, तुकाराम जाधव आणि महेश शिरापूरकर, युनिक ॲकॅडमी पुणे.

२. भारतीय शासन आणि राजकारण, अ. वा. वाईकर, निराली प्रकाशन पुणे.
३. भारतीय संविधान शासन व राजकारण, डॉ. प. ल. जोशी, विद्या प्रकाशन नागपूर
४. महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, डॉ. एकनाथ खांदवे, आरती प्रकाशन अहमदनगर
५. इंटरनेट

ISSN : 2348-7143
February 2018

# निवडणुक प्रकियेत निवडणुक आयोगाची भूमिका

**प्रा. हर्षदा मंदार जोशी**
एच पी टी आर्ट्स आणि आर वाय के सायन्स ज्यु. कॉलेज,
नाशिक.

आधुनिक काळात प्रातिनिधिक लोकशाही असलेल्या राष्ट्रांमध्ये निवडणुकांना अनन्य साधारण महत्त्व आहे. देशाच्या नागरिकांचा राजकीय प्रक्रियेतील सहभाग हा निवडणुकांमधून व्यक्त होत असतो. 'सार्वजनिक निवडणुका काटेकोरपणे आणि कार्यक्षमतेने पार पडल्या नाही तर नुसत्या सार्वजनिक यंत्रणाच कुचकामी ठरत नाही तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थाच संकटात सापडते.' असे पोलॉक नामक राज्यशास्त्रज्ञाने म्हटले आहे. त्याच्या या विधाना वरून लोकशाही साठी निवडणुकांचे असलेले महत्व स्पष्ट होते. देशात लोकशाही प्रत्यक्षात यायची असेल तर निपक्षपाती आणि पारदर्शक पद्धतीने निवडणुका होणे अत्यंत महत्त्वाचे असते. निवडणूकांचे हेच महत्त्व लक्षात घेऊन भारतीय संविधान कर्त्यांनी निवडणुकांसाठी स्वतंत्र यंत्रणेचीनिर्मिती केली. हि यंत्रणा म्हणजेच निवडणुक किंवा निर्वाचन आयोग.

संविधानाच्या कलम ३२४ नुसार स्वतंत्र निवडणुक आयोगाची योजना करण्यात आली आहे संपूर्ण देशासाठी एकच मध्यवर्ती निवडणूक यंत्रणा असून तिच्या मदतीसाठी प्रादेशिक आयुक्तांची तरतूद आहे. निवडणुक आयोगात एक मुख्य निर्वाचन आयुक्त असतो तसेच गरज वाटल्यास राष्टपती इतर आयुक्तांची नेमणूक करू शकतो.मुख्य निवडणुक आयुक्ताला बडतर्फ करण्याचा अधिकार संसदेला असतो. गैरवर्तन किवा अकार्य क्षमतेचा कारणावरून संसदेच्या दोन्ही सभागृहाच्या दोनतृतीयांश बहुमताने त्यांना पदच्युत करता येते. निर्भयपणे आणि स्वतंत्रपणे निवडणुक आयुक्ताला त्याचे कार्य करता यावे यासाठी विविध तरतुदी राज्यघटनेत करण्यात आल्या आहेत.

निवडणुक आयोग हि स्वतंत्र यंत्रणा मुख्यता देशभरातील निवडणुकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी केली गेली असली तरी अनेक जबाबदाऱ्या या यंत्रणेला पार पाडाव्या लागलात. जसे कि संसदेच्या तसेच राज्याच्या विधिमंडळाच्या निवडणुकांसाठी मतदारांच्या अद्यावत याद्या तयार करणे, त्या निवडणुकांप्रमाणे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती यांच्या पदाच्या निवडणुकांचे संचालन करणे, या निवडणुकांच्या कामकाजावर देखरेख मार्गदर्शन व नियंत्रण करणे ईत्यादि कार्य निवडणुक आयोग पार पाडत असतो.भारतात निवडणुकीच्या कार्यात निवडणुक आयोगाची भुमिका त्यांच्या पुढील कार्यावरून अधिक स्पष्ट करता येऊ शकते.

१. **मतदारांच्या याद्या तयार करणे –**

भारतीय राज्यघटनेच्या ३२६ व्या कलामानुसार वय १८ वर्ष पूर्ण असणाऱ्या प्रत्येक भारतीय नागरिकाला प्रौढ मतदानाचा अधिकार दिला जाऊन तिची नोंद मतदार यादीत केली जाते. योग्य अशा पात्र मतदारांची नोंदणी करणे आणि अद्ययावत याद्यातयार करणे हि जबाबदारी निवडणुक आयोगाला पार पाडावी लागते. मतदारांच्य नावाची नोंदणी करण्या बाबतचे निवेदन निवडणुक आयोग वृतपत्रे आकशवाणी दुरदर्शन या माध्यमाद्वारे प्रसारित करत असते.

२. **निवडणुकांचे संचालन करणे –**

सार्वत्रिक निवडणुका घेणे, त्या संबंधी तयारी करणे, प्रत्यक्ष निवडणुकीच्या वेळी नियंत्रण करणे असे संचालनाचे महत्वपूर्ण कार्य निवडणुक आयोगाला करावे लागते. सत्तारूढ पक्ष, इतर प्रभावी गट आणि व्यक्ती यांच्या कडून निवडणुकीच्या वेळी वाम मार्गाचा वापर होऊ नये यासाठी निवडणुक

ISSN : 2348-7143
February 2018

आयोगाला दक्ष राहावे लागते. आचारसंहिता तयार करणे, समजातील दुर्बल घटकांसाठी स्वतंत्र मतदान केंद्राची व्यवस्था करणे, निवडणुकीच्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी निरीक्षकाची नियुक्ती करणे, बोगस मतदान होऊ नये यासाठी मतदारांना ओळखपत्र देणे इत्यादी कामे निवडणुक आयोगाला करून घ्यावी लागतात.

३. **निवडणुक रद्द करणे –**

निवडणुकआयोगाला निवडणुका रद्द करण्याचाही अधिकार असतो. मतदानाच्या वेळी मतदारावर दडपण आणणे, बोगस मतदान करणे, मतदान केंद्रावर हल्ला करणे, मतदान केंद्र ताब्यात घेणे, मतपेट्या पळविणे असे गैर प्रकार घडले असता निवडणुक आयोग ती निवडणुक रद्द करू शकतो.

४. **पोट निवडणुका घेणे –**

लोकसभा किंवा विधान सभा यांच्या रद्द झालेल्या निवडणुका पुन्हा त्या मतदार संघात घ्याव्या लागतात. निवडणुकीच्या वेळी उमेदवाराकडून वाममार्गाचा वापर झाला किंवा अन्य गैरप्रकार घडला तर निवडणुक रद्द करावी लागते. काही वेळा प्रतिनिधीच्या मृत्यु मुळे किवा राजीनामा दिल्यामुळे रिकाम्या झालेल्या जागांच्या पोट निवडणुका घ्याव्या लागतात.

५. **राजकिय पक्षांना मान्यता देणे आणि त्यांची पक्ष चिन्हे ठरून देणे –**

१९८९ पासून राजकीय पक्षांची नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे. भारतातील राजकीय पक्षांना अखिल भारतीय पक्ष किंवा प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता देणे हे निर्वाचन आयोगाचे महत्वाचे कार्य होय. सार्वत्रिक निवडणुकीत ज्या राजकीय पक्षाला देशातील चार घटक राज्यात चार टक्के मते मिळतात त्या पक्षाला अखिल भारतीय पक्ष म्हणून मान्यता मिळते. तसेच ज्या राजकीय पक्षाला एखाद्या घटक राज्यात सार्वत्रिक निवडणुकीत चार टक्के मते मिळतात त्या पक्षाला प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता देण्याचे कार्य तसेच पक्षांना चिन्ह देण्याचे कार्य निवडणुक आयोग करतो.

६. **उमेदवारांना अपात्र ठरविणे –**

१९५१ च्या लोकप्रतीनिधीत्वाच्या कायद्यानुसार जर उमेदवाराने ठरविक मुदतीत निवडणुक फाईल भरून दिली नाही तर त्याला अपात्र ठरविण्याचा अधिकार निवडणुक आयोगाला देण्यात आलेला आहे.

७. **निवडणुक खर्चावर निगराणी –**

निवडणुकितील उमेदवारांनी सदर केलेले निवडणुक खर्चाचे ताळेबंध तपासणे हे निवडणुक आयोगाचे काम सतत चर्चेचा विषय ठरले आहे. निवडणुकीचे निकाल अधिकृतपणे प्रकाशित झाल्यानंतर ठराविक मुदतीच्या आत प्रत्येक उमेदवाराने आपल्या निवडणुक खर्चाचे हिशेब निवडणुक आयोगाकडे सदर करणे अनिवार्य असते. आयोग या विवरणाची छाननी करून दोषी आढळल्यांची नवे सरकारी ग्याझेत मध्ये प्रसिध्द करतो.या कार्यांबारोबरच काही न्यायालयीन अधिकारही निवडणुक आयोगाला असतात.

लोकशाही व निवडणुका या एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत. वरील कार्यांचा विचार करता निवडणुक आयोग हि भारतीय लोकशाहीतील अत्यंत महत्वाची यंत्रणा आहे हे लक्षात येते. सार्वत्रिक निवडणुका खुल्या वातावरणात पार पडून लोकशाही मूल्य जोपासण्याची महत्वाची जबाबदारी निवडणुक आयोग पार पडताना दिसतो.

**संदर्भ –**

१. **बी. बी. पाटील -** जानेवारी २०१२ भारतीय शासन आणि राजकारण - फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२. **भा. ल. भोळे** - जून २००३. भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण - पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर.

ISSN : 2348-7143
February 2018

# भारतातील निवडणूक सुधारणा

**प्रा. गणेश मनोहर लिंबोळे**
मविप्रचे कर्मवीर काकासाहेब वाघ कला,
विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय
पिंपळगाव बसवंत ता.निफाड जि.नाशिक

भारतीय प्रातिनिधिक लोकशाही व्यवस्थेत निवडणुकांना अन्यय साधारण महत्व आहे. भारतीय लोकशाही निवडणुकांच्या चौकटीत आणि राजकीय पक्षाच्या आधारे कार्यान्वित असलेली दिसते. भारतात आजवर लोकसभेच्या एकूण १६ निवडणुका झालेल्या आहेत.या सर्व निवडणुकांचे संचालन करण्यासाठी भारतीय संविधानात कलम ३२४ नुसार स्वायत्त निवडणूक आयोगाची तरतूद केलेली आहे. भारतीय निवडणुकीच्या प्रक्रियेत वेळ-काल व परिस्थितीच्या आधारे काही महत्वाच्या सुधारणा करण्यात आलेल्या आहेत त्यांची चर्चा सदर संशोधन लेखात केलेली आहे.

**संशोधन लेखाची उदिष्टे**

१. भारतीय निवडणुक पद्धतीचा अभ्यास करणे.
२. भारतीय निवडणूक सुधारणा संदर्भातील समित्यांचा अभ्यास करणे.
३. निवडणूक सुधारणाचा भारतीय राजकारणावरील परिणाम अभ्यासणे.

भारतात निवडणूक प्रक्रियेच्या संदर्भात संविधानात अनुच्छेद ३२४ ते ३२९ अतर्गत तरतूद केली आहे. राजकीय सत्ता शांतामय व सनदशीर मार्गाने हस्तांतरित व्हावी यासाठी निवडणुका या सर्वोत्तम प्रकार आहे. यामुळे बहितांशी देशांनी हा प्रकार स्वीकारलेला आहे. भारतीय संविधानानुसार निवडणुकांचे संचालन करण्याची जबाबदारी हि निवडणूक आयोगाची आहे. भारतातील निवडणुक आयोगात एक मुख्य निर्वाचन आयुक्त व इतर दोन आयुक्त अशी रचना आहे. १९९३ पर्यंत निवडणूक आयोग हा एक सदस्यीय होता यानंतर आयोग त्रिसदस्यीय स्वरूपाचा आहे. भारतीय निवडणूक आयोगाचे पहिले निर्वाचन आयुक्त सुकुमार सेन होते. आज निवडणूक आयोगात मुख्य निर्वाचन आयुक्त म्हणून ओम प्रकाश रावत यांची नेमणूक केलेली आहे. निवडणूक आयोगाद्वारे निवडणूक प्रक्रीया राबविली जाते.यानुसार राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभा, राज्यसभा आणि घटकराज्यांच्या निवडणुकांचे संचलन निवडणूक आयोग करते. यासाठी मतदारसंघ तयार करणे,मतदार याद्या तयार करणे,राजकीय पक्षांना मान्यता देणे,निवडणूक कार्यकम नियोजन करणे,निवडणुकांचे संचालन व नियंत्रण करणे,निकाल जाहीर करणे,अशा स्वरुपाची कामे निर्वाचन आयोगाला करावी लागतात.भारतात सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराचा स्वीकार केलेला असून गुप्त मतदान पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. याशिवाय एकसदस्यीय मतदार संघांची निर्मिती केलेली असून काही मतदारसंघ हे अनुसूचित जाती आणि जमातींसाठी राखीव ठेवले आहेत. या मतदारसंघातून फक्त अनुसूचित जाती आणि जमातींच्या समूहातील व्यक्तींनाच निवडणूक लढविता येते.

भारतीय साविधांनातील भारतातील निवडणुका सुरवातीच्या दशकात व्यवस्थित पार पडलेल्या होत्या परंतु १९६७ नंतरच्या काळात भारतीय निवडणुकीत वाईट प्रवृत्तीचा प्रभाव वाढलेला दिसतो. पैसा जात, धर्म, संप्रदाय, सत्ता, बळ यांचा वापर करून अनेक प्रतिनिधी लोकसभेच्या आणि विधानसभेच्या निवडणुकांमध्ये सहभागी झाले.त्यामुळे राजकारणात गुन्हेगारांचे प्रमाण वाढलेले होते. अशा प्रवृत्तीना रोखण्यासाठी निवडणुकीत सुधारणा केलेल्या दिसून येतात. निवडणूक सुधारणाचा मुख्य हेतू हा निर्दोष,निपक्ष व निर्भय पद्धतीने निवडणूक होणे व लोकशाही सदृढ करणे हा होय. भारतीय निवडणूक प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी

ISSN : 2348-7143
February 2018

आजवर अनेक समित्या आणि आयोग गठीत करण्यात आले आहेत.त्यापैकी काही महत्वाचे आयोग आणि त्यांनी केलेल्या शिफारशींचा आढाव पुढील प्रमाणे.

**संथानम समिती** :-

१९६४ मध्ये संथानम समितीने विशेषतः आर्थिक सुधारणा सुचविल्या त्या अशा

१) निवडणूकीचा खर्च सरकारने करावा.

२) राजकीय पक्षांच्या उत्पन्न व खर्च हे निर्वाचन आयोगाने तपासावेत.

**यशवंततराव चव्हाण समिती** :-

सन १९६७ च्या घटकराज्यांच्या निवडणुका नंतर भारतात मोठ्या प्रमाणवर पक्षातरांची सुरवात झाली त्याचा विपरीत परिणाम राजकीय व्यवस्थांवर होवू लागला यामुळे तत्कालीन गृहमंत्री यशवंततराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली १९६८ समिती गठीत केली.या समितीने पुढील महत्वाच्या शिफारशी केल्या .

१. जे प्रतिनिधी ज्या राजकीय पक्षाकडून निवडून येतील त्यांचा पूर्ण कार्यकाल त्याच राजकीय पक्षात असावे हे बंधनकारक असावे.
२. कार्यकारी मंडळ प्रमुख पंतप्रधान, मुख्यमंत्री व मंत्री हे कनिष्ठ सभागृहातील सदस्य असावेत.
३. पक्षातंर करण्याऱ्या व्यक्तीस मंत्रीपद देऊ नये.

**संयुक्त संसदीय समिती** :-

१९७२ साली संयुक्त संसदीय समिती निवडणूक सुधारणा सुचविल्या

१. आकाशवाणी वरून प्रचार करण्यासाठी सर्व राजकीय पक्षांना सारखाच वेळ द्यावा.
२. निवडणूक आयोग बहुसद्स्यीय असावा.
३. निवडणूक कामात मार्गदर्शन आणि सूचना देण्यासाठी एक विशेष समिती असावी.

**तारकुंडे समिती** :-

माजी न्यायाधीश बी.एम.तारकुंडे (१९७५) यांच्या अध्यक्षतेखाली हि समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीमध्ये एम.आर.मसानी, पी.जी.मालवणकर, आर.दि.देसाई आणि डीकोस्डा हे सदस्य होते.या समितीने केलेल्या शिफारशी अशा,

१. मतदारांसाठी वयोमर्यादा २१ वर्षऐवजी १८ वर्ष करावी.
२. राजकीय पक्षांनी उत्पन्न व खर्च दाखविणे बंधनकारक असावे.
३. प्रत्येक उमेदवाराने खर्चाचा तपशील द्यावा.
४. निवडणूक काळात मंत्रीमंडळातील सदस्यांनी शासकीय खर्चात दौरे करू नयेत.
५. केंदीय निर्वाचन आयोग त्रिसदस्यीय असावा.
६. राज्यात निर्वाचन आयोग स्थापन करावेत.

या आयोगाने केलेल्या शिफारशी पैकी काही शिफारशिंचा स्वीकार भारत सरकारने केलेला आहे.

**पक्षांतर बंदी कायदा :-**

१ मार्च १९८५ मध्ये पक्षांतर बंदी संदर्भातील ५२ वी संविधान दुरुस्ती करण्यात येवून हा कायदा लागू झाला. त्यानुसार

ISSN : 2348-7143
February 2018

१. राजकीय पक्षाचा आदेश डावलणारे सदस्य प्रतिनिधी म्हणून अपात्र ठरविले जातील.
२. निवडून आलेल्या व्यक्तीने पक्षांतर केल्यास त्याचे सभासदत्व रद्द होईल.
३. राजकीय पक्षातील १/३ सदस्यांनी पक्षांतर केल्यास त्यांचे सदस्यत्व रद्द होणार नाही.
४. पक्षांतर बंदी संबंधी न्यायालयात जाता येणार नाही.

**दिनेश गोस्वामी समिती :-**

१९९० मध्ये राष्ट्रीय मोर्चा सरकारने दिनेश गोस्वामी यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक सुधारणासाठी हा आयोग गठीत केला.या समितीने केलेल्या शिफारशी

१. निर्वाचन आयोग त्रिसदस्यीय असावा, मुख्य निर्वाचन आयुक्तांची नेमणूक करतांना सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश, विरोधी पक्षनेता यांचा सल्ला विचारात घ्यावा.
२. इतर आयुक्तांची नेमणूक करतांना मुख्य निर्वाचन आयुक्तांचा सल्ला घ्यावा.
३. निवृतीनंतर आयुक्तांनची इतर पदावर नेमणूक करता येवू नये.
४. मतदारांना ओळखपत्र द्यावे.
५. मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना निवडणुकीसाठी निधी दिला जावा.
६. एका उमेदवाराला एका पेक्षा जास्त मतदारसंघात निवडणूक लढविण्यास मनाई असावी.
७. निवडणुकीसाठी इलेक्ट्रोनिक मतदान यंत्राचा(**EVM**) वापर करावा.
८. निवडणुकीत गैरप्रकार करणारे अथवा दोषींना सहा वर्षासाठी निवडणूक लढविण्यास अपात्र घोषित करावे

या समितीने केलेल्या शिफारशींचा १९९६ च्या लोकप्रतिनिधी कायद्यातील संशोधनात समावेश केलेला आहे.

**लोकप्रतिनिधीत्व कायदा १९९६**

१९५१ च्या लोकप्रतिनिधीत्व कायद्यात १९९६ मध्ये दुरुस्ती करण्यात आली त्यानुसार

१. राष्ट्रीय सन्मान –अवमान प्रतिबंध कायदा १९७१ नुसार दोषी व्यक्तीस निवडणुकीस अपात्र ठरविण्यात आले आहे.
२. लोकसभेसाठी अनामत रक्कम ५०० रु वरून १०,०००रु करण्यात आली तर विधानसभेसाठी २५० रु वरून ५००० रु करण्यात आली.
३. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत मतदान घ्यावे
४. कोणत्याही उमेदवारास दोन पेक्षा अधिक मतदार संघातून निवडणूक लढविता येणार नाही.
५. मतदानाचा दिवस सवेतन सरकारी सुट्टी असेल.

याशिवाय इतरही काही समित्या गठीत केलेल्या होत्या त्यामध्ये व्होरा समिती (१९९३), इंद्रजीत गुप्त समिती (१९९८), लॉ कमिशन २००४, वेंकट चेल्लया समिती (२०००),वीरप्पा मोईली(२००७),तांका समिती(२०१०)इ.या सर्व समित्यांनी महत्वाच्या शिफारशी सुचविल्या त्यानुसार काही शिफारशींचा स्वीकार भारत सरकारने केला आहे. २००९ मध्ये लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीची अनामत रक्कमेत वाढ केली आहे त्यानुसार लोकसभा निवडणुकीसाठी १०००० रु. वरून २५००० रु. अनामत तर राखीव साठी ५००० रु. वरून १२५०० रु. इतकी अनामत रक्कम केली आहे. २०११ मध्ये निवडणूक खर्च वाढविला मोठ्या राज्यांसाठी ४० लाख लहान राज्यासाठी १६ लाख पर्यत खर्च मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. नोटा

ISSN : 2348-7143
February 2018

सारखा पर्याय २०१३ मध्ये दिल्ली, राजस्थान, मध्यप्रदेश छत्तीसगड, आणि मिझोराम या विधानसभा निवडणुकी पासून सुरु झालेला आहे. या सर्व सुधारणा भारतीय लोकशाहीला पूरक आणि पोषक स्वरूपाच्या आहेत. यामुळे भारतीय निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक झालेली आहे.

**संदर्भ :**

१. भोले भा.ल.,२००३ 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण'नागपूर,पिंपळापुरे आणि कं.पब्लिकेशन
२. पाटील बी.बी., २०१२,भारतीय शासन आणि राजकारण कोल्हापूर फडके प्रकाशन.
३. Birmal Prasad signg ,2013,Electrol Reforms in India–Issues and Challenges', international journal of Humanities and Social Inventionvol-2 issue 3 march.
४. www.eci.nic.in

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 42 : भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि राजकारण
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

# मतदार वर्तनावर प्रभाव पाडणारे घटक

**प्रा. जी. बी. ठाकरे**
व्ही.एन. नाईक कला वाणिज्य महाविद्यालय दिंडोरी,
जि. नाशिक.

लोकशाहीतील सर्व सत्ता मतदारांच्या हाती असते. त्यामुळे मतदारांच्या इच्छेवर अवलंबून असते की, कोणत्या राजकिय पक्षाला सत्ता प्रदान करायची या अनुषंगाने मतदारांच्या वर्तनाचा अभ्यास किंवा मतदारांचे वर्तन म्हणजे मतदान कोणत्या निकषांवर केले जाते किंवा कोणत्या घटकांचा मतदानावर प्रभाव पडतो, त्याचा अभ्यास होय. हा अभ्यास निवडणूकीवर प्रभाव पाडणाऱ्या घटकांचाही अभ्यास असतो. यातून लोकशाही राजकिय व्यवस्थेमध्ये निवडणूकीच्या संदर्भात मतदार कसे मतदान करतात हे दिसून येते. भारतीय राजकारणात गेल्या ६५ वर्षात झालेल्या सार्वत्रिक निवडणूकांचा आढावा घेतला असता, या निवडणुकांवर प्रभाव पाडणाऱ्या विविध घटकांपैकी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे मतदारांचे वर्तन होय. मतदार ज्या पध्दतीने मतदान करतात. त्यावर निवडणूकांचे निकाल अवलंबून असतात. भारतात १९८४ व २०१४ या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकींमध्ये देशांच्या इतिहासामध्ये सर्वाधिक मतदान अनुक्रमे ६४% व ६६.४% मतदान झाले आहे. या दोन वर्षाचा अपवाद वगळता भारतात ६०% च्या आसपास मतदान होते. याचा निवडणूकांवर परिणाम होत असतो. तसेच मतदान करतांना विविध घटक प्रभावित होत असतात. त्याचाही मतदारांच्या वर्तनावर प्रभाव पडत असतो. मतदाराच्या वर्तनावर प्रभाव पाडणाऱ्या खालील घटकांच्या आधारे मतदार वर्तनाचा आकृतीबंध जाणून घेता येईल.

**मतदार वर्तन निश्चित करणारे घटक :**

**जात :**

जात हा मतदारांचा वर्तनावर किंवा मतदान पध्दतीवर प्रभाव पडणारा महत्वाचा घटक आहे. जातीचे राजकारण आणि राजकारणात जातीयता ही भारतीय राजकारणाची खास वैशिष्टये आहे, "भारतीय राजकारणात जातीचे आहे आणि जातीचे झाले आहे" असे रजनी कोठारी यांनी म्हटले आहे निवडणुकीचे डावपेच ठरवितांना राजकीय पक्ष जात हा घटक विचारात घेतात.

भारतामधील मतदान पध्दतीमध्ये जात या घटकाची भुमिका पॉल ब्रास यांनी समर्पकरीतीने पुढीलप्रमाणे मांडली आहे "स्थानिक पातळीवर अंतर्गत भागात जातीय एक्य हा मतदान पध्दतीचा सर्वात महत्वाचा घटक आहे मतदार संघातील मत देतात किंवा त्याचा जातीचे सदस्य ज्या राजकीय पक्षाशी संलग्न त्या पक्षाला मत देतात त्यामुळे आपल्या जातीच्या उमेदवारास मतदान करण्याची प्रवृत्ती मतदारामध्ये आढळुन येते उमदेवार देखील जात या घटकाचा आधार घेवुन यातुनच जातीच्या आधारावरील राजकारण आकारास येते.

**धर्म :**

धर्म हा मतदान पध्दतीवर प्रभाव पाडणारा अजुन एक महत्वाचा घटक आहे राजकीय पक्ष सांप्रदायीक प्रचार करतात आणि मतदारांच्या धार्मिक भावनाचा फायदा घेतात. विविध सांप्रदायीक पक्षांमुळे धर्माचे राजकारण वाढले आहे जरी भारत हा देश धर्मनिरपेक्ष असला तरी निवडणुकीचा राजकारणात कोणतेही राजकीय पक्ष धर्माच्या प्रभावाकडे दुर्लक्ष करीत नाही उदा. पंजाबमधील अकालीदल हा पक्ष शीख धर्मियांचे मते प्राप्त करण्यात यशस्वी होतो. तसेच राष्ट्रीय पातळीवर भारतीय भारतीय जनता पक्षाने देखील हिंदुत्वाच्या आधारे मते प्राप्त करण्याचे प्रयत्न केलेले आहे. धर्म ही बाब अद्यापही भारतीय लोकांत महत्त्वाची मानली जात असल्याने लोक विशिष्ट धर्माच्या उमेदवारास किंवा आपल्या धर्माचे

ISSN : 2348-7143
February 2018

हितसंबंध जोपासणाऱ्या राजकिय पक्षास मतदान करतात. त्यामुळेच भारतात मुस्लीम मतदार भारतीय जनता पक्षास कमी प्रमाणात मतदान करतांना दिसतात.

**प्रादेशिकता:-**

प्रादेशिकवाद व उपप्रादेशिवाद यांची मतदान पध्दतीमध्ये महत्त्वाची भूमिका असते. एखाद्या विविष्ट प्रदेशात राहणाऱ्या लोकांच्या त्या प्रदेशाबाबत निष्ठा जोडलेल्या असतात. या प्रादेशिक आस्मितेमुळे मतदार विशिष्ट पध्दतीने मतदान करतात. आपल्या प्रदेशाचे हितसंबंध जोपासणाऱ्या उमेदवारास मतदान करतात. उपराष्ट्रवादाच्या अशा संकुचित दृष्टीकोनामुळे विविध राज्यामध्ये प्रादेशिक पक्ष उदयाला आले व त्यांचे स्थान पक्के झाले हे क्षेत्रीय पक्ष मतदारांच्या प्रादेशिक ओळखीस व प्रादेशिक भावनाना आवाहन करतात कधी कधी फुटीरतावादी पक्ष निवडणुकीवर बहिष्कार घालण्यात सांगतात.

**भाषा :**

भाषा हा सुध्दा लोकांच्या मतदान पध्दतीवर किंवा मतदार वर्तनावर प्रभाव पाडणारा एक घटक आहे. निवडणुकींच्या वेळी राजकीय पक्ष लोकांच्या भाषिक भावना चेतवितात आणि त्यांचे निर्णय प्रभावित करण्याचा प्रयत्न करतात १९५६ व त्यानंतर झालेली भाषावर प्रांत रचना यातुन भारतीय राजकारणातील भाषा या घटकाचे महत्व दिसुन येते तामिळनाडु मध्ये डीएम के आणि आंध्रप्रदेश मध्ये टीडीपी यासारख्या काही राजकीय पक्षांची निर्मिती भाषिकवादामुळे झाली.

**पैशाचा प्रभाव:**

मतदान पध्दती विशद करताना पैसा या घटकाची भुमिका दुर्लक्षुन चालणार नाही निवडणुक खर्चावर मर्यादा घातली असली तरी निवडणुकीवर कोटयावधी रुपये खर्च होतात. मतांच्या बदल्यात लोक पैसे दारु किंवा वस्तु यांची अपेक्षा करतात त्यामुळे पैसे घेऊन मतदान करण्याची प्रवृत्ती मतदारात बळावते मतदान करतांना कोणता उमेदवार अधिक पैसा देतो या घटकांचा विचार केला जातो.शिवाय पैसा घेऊन मतदान पैसे न मिळाल्याने मतदान करीत नाही त्यामुळे पैसा या घटकाचा प्रभाव इतर घटकाप्रमाणे मतदारांच्या वर्तनास प्रभावित करतांना दिसतो.

RESEARCH JOURNEY

**सत्तारुढ पक्षाने केलेले काम:**

निवडणुकीपुर्वी प्रत्येक राजकीय पक्ष आपला निवडणुक जाहिरनामा प्रसिध्दी करतो यामध्ये मतदारांना कामाची आश्वासने दिलेली असतात मतदार सत्तारुढ पक्षाचे कार्य त्यांच्या जाहिरनाम्याची पडताळुन पाहता सन १९७७ मध्ये झालेल्या कॉंग्रेस पक्षाचा आणि १९८० मध्ये जनता पक्षाचा पराभवावरुन दिसुन येते की, सत्तारुढ पक्षाने केलेल्या कामाचा मतदार वर्तनावर परिणाम होता सत्तारुढ पक्षाचा कामाविषयी मतदार समाधानी नसल्यास सत्ताधारी पक्षाचा विरोधात जनमत तयार होते.

**पक्षनिष्ठा**

राजकीय पक्षांशी वैयक्तिक व भावनिक सबंध हा मतदार वर्तनावर प्रभाव पडणारा महत्वाचा घटक असतो जे लोक विशिष्ठ पक्षांशी सबंधीत असतात ते पक्षाने कार्य केले असो व नसो त्याच पक्षाला मत देतात सन १९५० व १९६० च्या दशकात पक्षनिष्ठा खुप मजबुत होती परंतु १९७० च्या दशकापासुन पक्षनिष्ठा असलेल्या लोकांच्या संख्येत घट झाली आहे.

**विचारधारा :**

राजकीय पक्षाची विचारधारा या घटकाचा मतदाराचा निर्णयावर प्रभाव पडतो समाजातील काही लोकांच्या साम्यवाद, भांडवलशाही, लोकशाही, निधर्मीवाद, देशभक्ती विक्रेदी्करण, इत्यादी अशा विचारधारांशी बांधीलकी असते असे लोक सामान्यत: त्यांच्या विचारधारा असणाऱ्या पक्षांच्या उमेदवारीला पाठींबा देतात.

ISSN : 2348-7143
February 2018

**व्यक्तीमत्व**

पक्ष नेत्याच्या प्रभावी व्यक्तीमहत्वाची मतदान पध्दतीमध्ये महत्वाची भुमिका असते त्यामुळे जवाहरलाल नेहरु, इंदिरा गांधी, राजीव गांधी, जयप्रकाश नारायण, अटलबिहारी वाजपेयी आणि नरेंद्र मोदी यासारख्या उत्तुंग व्यक्ती महत्त्वाच्या नेत्यांना त्यांच्या पक्षांना लक्षणीय फायदा झाला व त्यांच्या प्रभावामुळे लोकांनी त्यांच्या पक्षास मोठया प्रमाणात मते दिली. राज्य पातळीवर सुध्दा प्रादेशिक पक्षनेत्यांच्य प्रभावी व्यक्तीमहत्त्वाचा निवडणूकीत त्यांच्या पक्षाला लक्षणीय लाभ होतो. अनेक राजकिय पक्ष अशा लोक प्रसिध्द व्यक्तींना उमेद्वारी देऊन मतदारांना आकर्षित करतात. सिनेमा, साहित्य, जाहिरात, क्रिडा अशा क्षेत्रात प्रसिध्द असणाऱ्या व्यक्तींना उमेद्वारी देऊन मतदारांना आकर्षित करण्यावर भर दिला जातो.

**इतर घटक :**

वर विशद केलेल्या घटकांव्यतिरिक्त भारतीय मतदारांच्या वर्तनावर प्रभाव टाकणारे अनेकविध घटक आहेत. - यामध्ये भ्रष्टाचार, घोटाळा युध्द अशा निवडणुकीपुर्वी घटलेल्या घटना, त्याच बरोबर चलनवाढ अन्नधान्य तुटवडा, बेरोजगारी अशा निवडणुकीच्या वेळी असलेली आर्थिक परिस्थिती व कुं टुब व नातेसबंध उमेदवाराची विचारधारा, राजकीय कौटुबिक पार्श्वभुमी प्रसार माध्यमांची भुमिका हे घटक देखील मतदार वर्तन निश्चीत करण्याची महत्वाची भूमिका पार पाडतात.

थोडक्यात मतदार वर्तनावर प्रभाव पाडणाऱ्या घटकांचा अभ्यास केला असता मतदाराने आज जागरुक होऊन राष्ट्र हितासाठी चांगल्या कार्य करणाऱ्या व्यक्तींना निवडुन देणे गरजेचे आहे त्यामुळे मतदाराने जात, धर्म, प्रदेश, भाषा पैसा, किंवा धनसंपती या घटकाचा प्रभावा खाली न येता चांगल्या आणि योग्य प्रतिनिधीना मतदान करणे आवश्यक आहे त्याच बरोबर पुढील लोक सभा निवडणुक येत आहेत लोकसभेची निवडणुक सबंध भारतीयाच्या जीवनावर परिणाम करणारी ठरत असते भारतीय लोकसभेत पोहचणारा आपला प्रतिनिधी आपल्या जीवनावर चांगले किंवा वाईट परिणाम घडवुन आणु शकतो हे लक्षात घेवुन मतदार म्हणुन आम्ही जागरुकपणे मतदान करण्याची गरज आहे.

आता परिस्थिती अशी आलेली आहे की पाटी बघुन नव्हे तर उमेदवार बघुन मतदान करणे गरजेचे आहे कारण जवळपास सर्वच पक्षांनी त्याच्या सोयीचे उमेदवार दिले आहे ते जनतेच्या सोयीचे आहेत काय? याचा फारसा विचार केला जात नाही यामुळे आपणास उमेदवार खालील कसोटयावर तपासुन त्यास मतदान करणे सोयीचे राहील.

- उमेदवाराने गेल्या ५-१० वर्षापासुन आपल्या मतदार संघात जनतेच्या मुलभुत गरजांची पुर्तता करण्याचा प्रयत्न केला आहे काय?
- उमेदवार सर्वसामान्यांचा प्रतिनिधी आहे की घराणेशाहीतुन आलेला आहे?
- उमेदवाराचे सामान्य नागरीकांशी सबंध कसे आहेत? त्याचे आतापर्यंतचे वर्तन सामान्य माणसासाठी सुखकारक राहीले आहे काय?
- उमेदवार गरीब माणसांचे प्रतिनिधी करणारा आहेत की श्रीमंत ?
- उमेदवार धर्मनिरपेक्ष लोकशाहीचा पुरस्कर्ता आहे काय?
- उमेदवाराचे वय अणि शिक्षण काय आहे? या बाबी पण लक्षात घेणे गरजेचे आहे.
- उमेदवाराचे वय आणि शिक्षण काय आहे? या बाबीपण लक्षात घेणे आवश्यक आहे?
- उमेदवाराने आतापर्यंत कितीवेळा पक्षांतर केले आहे?
- उमेदवाराला स्थानिक आणि राष्ट्रीय प्रश्नाची कितपत जाण आहे?

- उमेदवाराला मुख्य म्हणजे लोकांच्या प्रति बांधीलकी आहे काय?

वर वर्णन केलेल्या उमेदवाराच्या कसोटयाचा विचार करुन आपले मतदार वर्तन निश्चीत करुन योग्य मतदानाचा अधिकार बजावला तर भारतीय राजकीय व्यवस्थेत अनुकुल बदल घडुन येण्यास मदत होईल.

**संदर्भ**

१. बी.बी पाटील, भारतीय शासन आणि राजकारण फडके प्रकाशन, कोल्हापुर
२. एम लक्ष्मीकांत अनुवादक श्रीकांत गोखले, इंडीयन पॉलिटी के सागर पब्लिकेशन
३. प्रा. डॉ. वी.डी. अवारी, प्रा. डी. एन. खालेकर, भारतीय राजकीय प्रक्रिया Succees Publication
४. र.घ. वराडकर, राज्यशास्त्र,निराली प्रकाशन, कोल्हापुर
५. W.W.W. google.com

ISSN : 2348-7143
February 2018

# मतदार वर्तनावर प्रभाव पाडणारे घटक

**प्रा. जे. एल. पगारे**
राज्यशास्त्र विभाग
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नांदगाव,
ता. नांदगाव जि. नाशिक

**प्रस्तावना**

आधुनिक काळात राज्यातील सर्व लोक स्वतः शासनात प्रत्यक्ष असा भाग घेऊ शकत नाहीत. अशा वेळी बहुसंख्यांना मान्य होतील, असे शासक निवडण्याचे कार्य निवडणुकीमुळे शक्य होते तसेच या शासकांना सातत्याने लोकांना जबाबदार ठेवणेही निवडणुकीमुळे शक्य होते शांततामय मार्गांनी शासनात बदल करून लोकशाही शासन चालू ठेवणे व शासनावर नियंत्रण ठेवणे हे निवडणुकीमुळे साध्य होते. विशेषतः जेथे निवडणुका खऱ्या अर्थाने स्पर्धात्मक असतात आणि उमेदवारांना किंवा त्यांच्या पक्षांना त्यांनी केलेले किंवा ते करू इच्छिणारे कार्य लोकांपुढे मान्यतेसाठी ठेवावे लागते तेथे निवडणुकांमुळे समाजातील विविध सामाजिक समस्यांसंबंधी चर्चा होऊ लागते. लोकमत स्पष्ट होण्याचे मार्ग खुले होऊन लोकमताची साधने परिणामकारक रीत्या कार्यरत होऊ लागतात. नागरिक व शासक यांमधील संबंध नवीन करारांनी बांधणे सुलभ होते. निवडणुकांमुळे राजकीय वर्गाला स्थैर्य प्राप्त होते. संपूर्ण समाजाला व त्या समाजाच्या सरकारला कायदेशीरपणा प्राप्त होतो. नागरिकांमध्ये एक प्रकारचे नवीन संबंधांवर आधारित नाते निर्माण होते. सहभागाच्या भावनेमुळे प्रत्येक नागरिकामध्ये अस्मितेची व प्रतिष्ठेची भावना निर्माण होते. आपण कशाचे तरी कर्ते आहोत व आपल्या मताचा परिणाम काहीतरी घडविण्यामध्ये होतो, या जाणिवेमुळे नागरिकांमध्ये जबाबदारीची जाणीवनिर्माण होते. लोकशाहीमध्ये शासनाला कायदेशीरपणा प्राप्त करून देणे आणि आवश्यक तेव्हा शासनामध्ये शांततामय मार्गाने बदल घडवून आणणे निवडणुकांमुळे शक्य होते. हुकूमशाहीत पुष्कळदा निवडणूक–यंत्रणा औपचारिकपणे राबविली गेली, तरी निवड करण्याचे जे मुक्त स्वातंत्र्य लोकशाहीत असते, ते हुकूमशाहीत नसते लोकशाही सुदृढ व सक्षम असेल तर देशाच्या विविधांगी विकासाला चालना मिळण्यास, विकासाला गती येण्यास भरीव मदत होते. याच दृष्टीकोनातून या देशाचा नागरिक म्हणून प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क प्राथम्याने बजावणे नितांत गरजेचे आहे. किंबहूना मतदानाचा हक्क बजावणे म्हणजे राष्ट्रीय कर्तव्य बजावणे असे म्हणल्यास वावगे ठरणार नाही. परंतु आज मतदार आपले कर्तव्य बजावत असताना त्याच्यावर अनेक घटकांचा प्रभाव पडत असतो व त्यातून त्याचे वर्तन ठरते या अनुषंगाने लघु संशोधनात प्रकाश टाकण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

मतदार वर्तनावर प्रभाव पडणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

**गृहीतके**

१. मतदार वर्तनावर धार्मिकतेचा व जातीयतेचा प्रभाव आहे.
२. आर्थिक घटक, प्रादेशिकता, राजकीय पक्ष यांचा प्रभाव आहे.
३. व्यक्ती महात्म्य व इतरही घटकांचाही मतदार वर्तनावर प्रभाव आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधानिबांधासाठी ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

**तथ्य संकलन**

प्रस्तुत विषय आंतरशाखीय दृष्टीकोनातून अध्ययनासाठी निवडला असल्यामुळे ग्रंथ,वर्तमानपत्रे,मासिके इ. दुय्यम साधनांचा तथ्य संकलनासाठी उपयोग करण्यात आला आहे.

**मतदार वर्तनावर प्रभाव पाडणारे घटक**

भारतातील निवडणुकांवर व निवडणूक निकलांवर प्रभाव पाडणारा सर्वात महत्वाचा घटक म्हणजे मतदाराचे वर्तन होय. मतदार ज्या पद्धतीने मतदान करतात, त्यावर निवडणुकींचे निकाल अवलंबून असतात. मतदार ज्या वेळेस मतदान करतात त्यांच्यावर विविध घटकांचा प्रभाव पडत असतो व त्यानुसार ते मतदान करत असतात. असे घटक पुढील प्रमाणे

**जात**

जात हा घटक मतदाराच्या वर्तनावर मोठ्या प्रमाणात प्रभावित करत असतो.कारण भारतीय मतदारत जातीय निष्ठा मोठ्या प्रमाणात आढळून येते त्यामुळे आपल्या जातीच्या उमेदवारस मतदान करण्याची प्रवृत्ती मतदारात आढळून येते. महाराष्ट्रात मराठा जातीच्या उमेदवारास मराठा जातीच्या लोकांची मते प्राप्त होतात, तामिलनाडूत मुदलियार, आंध्र प्रदेशात कम्मा व रेड्डी, केरळात नायर या जातीची मते त्या त्या जातीच्या उमेदवारास मिळतात. उमेदवार देखील जातीचा आधार घेऊन मते मिळवण्याचा प्रयत्न करतात. काही पक्ष मतासाठी जातीशी सोयरिक करताना दिसतात. आजही महाराष्ट्रात राष्ट्रवादी कॉंग्रेसला मराठा जातीचा पक्ष असे लेबल लावले जाते, रिपब्लिकन पक्षाला दलितांचा पक्ष तर भारतीय जनता पक्षाला ब्राह्मणाचा मानला जातो. बसपाची तर १९८४ ते १९८८ पर्यंत घोषणाच होती 'ब्राह्मण, बनिया,ठाकूर चोर बाकी सब डी एस फोर'. निवडणुकीत जातीवर आधारित सर्रास प्रचार केला जातो. जाठ की बेटी जाठ को जाठ का व्होट जाठ को यामुळे आज देशात वेगवेगळ्या मतदार संघात जातीय निकषावर मतदान होताना दिसते.

**धर्म**

धर्म हा शब्द धृ पासून तयार झाला आहे. या शब्दाचा अर्थ धारण करणे असा होतो. व्यक्तीने समाजात कसे वर्तन करावे हे धर्म सांगतो. सामाजिक रचना सुस्थितीत करणारी प्रेरणा म्हणजे धर्म. धर्म एकसूत्रात बांधण्याचे काम करतो. पवित्र्याच्या भूमिकेतून श्रद्धा, व्यवहार, विश्वास, मूल्ये यावर चालणाऱ्या समाजव्यवस्थेच्या संकल्पनेला धर्म म्हणतात. प्राचीन काळापासून भारतात धर्माचा मोठा पगडा आहे. त्यामुळे भारताने धर्मनिरपेक्षेतेचा पुरस्कर केला असला तरी भारतात धार्मिकतेच्या आधारावर मतदारांना प्रभावित करण्याची प्रवृत्ती दिसते. भारतात विविध धर्माचे लोक राहतात त्यामुळे प्रत्येक धर्माचे राजकिय नेते आपल्या धर्माच्या लोकांची मते प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील असतात. राजकीय पक्ष देखील धर्माचा आधार घेताना दिसतात. पंजाबमधील अकाली दल हा पक्ष शीख धर्मीयांची मते प्राप्त करण्यात यशस्वी होतो. तसेच राष्ट्रीय पातळीवर भारतीय जनता पक्षाने हिंदू धर्माच्या आधारे मते प्राप्त करण्याचे प्रयत्न केलेले आहे. त्या त्या राज्यात प्रबळ असणारा धर्म त्या राज्यातील राजकीय नेते व राजकीय पक्ष यांचा राजकारण करण्याचा विषय झाला आहे. धर्म हि बाब अद्यापही भारतीय लोकांत महत्वाची मानली जात असल्याने, लोक विशिष्ट धर्माच्या उमेदवारास किवा आपल्या धर्माचे हितसंबंध जोपासणाऱ्या राजकीय पक्षास मतदान करतात.

**प्रादेशिकता**

प्रादेशिकता हा घटक देखील मतदार वर्तनावर प्रभाव पडत असतो. एखाद्या विशिष्ट प्रदेशात राहणाऱ्या लोकांच्या त्या प्रदेशाबाबद निष्ठा जोडलेल्या असतात या प्रादेशिक निष्ठाच मतदाराचे वर्तन प्रभावित करतात. आपल्या प्रदेशाचे हितसंबंध जोपासणाऱ्या उमेदवारास लोक मतदान करतात त्यामुळे प्रादेशिक पक्षांना राजकीय प्रक्रियेत प्रभाव निर्माण करण्याची संधी निर्माण होते. अनेक राजकिय पक्ष या आधारावर निर्माण झाले आहेत. प्रादेशिक पक्ष प्रादेशिक अभिमान बाळगून लोकांना आकर्षित करतात. विशिष्ट प्रदेशातील लोकांच्या भावना प्रभावित करून त्यांच्या मतदान प्रवृतीत बदल घडून आणतात व आपला फायदा करून घेतात. मतदार देखील त्या उमेदवारास किवा राजकीय पक्षास आपले हितसंबंध जोपासतात म्हणून मतदान करतात ते हा विचार करत नाही की संबंधीत उमेदवार किवा पक्ष कसे आहेत. ते केवळ प्रादेशिकतेच्या आधारे राजकारण करतात.

### आर्थिक घटक

अलीकडच्या काळात पैसा या घटकास निवडणुकीच्या राजकारणात अवास्तव महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे निवडणुकात जो उमेदवार जास्तीत जास्त खर्च करतो तोच निवडून येतो. तसेच पदाधिकारी पद प्राप्त करण्यासाठी आपल्या गटातील उमेदवारांना खुश करताना पैशाची खैरात वाटावी लागते. अशा वेळेस नेतृत्वाच्या बाबतीत कार्य आणि कर्तव्य यांना गौण स्थान प्राप्त होते. मतदार देखील मतदान करताना कोणता उमेदवार अधिक पैसे देईल त्यास मतदान करताना दिसतात.पैसा घेऊन मतदान करण्याची सवय लागल्याने अनेक मतदार पैसे न मिळाल्यास आपल्या मूल्यवान मताधिकाराचा वापर करताना दिसत नाही. म्हणजेच पैशाचा वाढता प्रभाव हा घटक मतदार वर्तनास प्रभावित करताना दिसतो.

### मतदारांचे हितसंबंध

मतदारांच्या आशा, अपेक्षा, हितसंबंध यांचा देखील मतदार वर्तनावर परिणाम करत असतो. मतदारांना सरकारकडून खूप मोठ्या अपेक्षा असतात या अपेक्षा सरकार किती पूर्ण करतो याचाही विचार मतदार करत असतात. समाजातील प्रत्येक मतदारांची आर्थिक सामाजिक पार्श्वभूमी वेगवेगळी असते त्यांचे हितसंबंध देखील वेगवेगळे असतात यामुळे मतदार देखील आपल्या हितसंबंधाला अनुसरूनच मतदान करतात.

### राजकीय पक्षाचे जाहीरनामे

निवडणुका जशा जवळ येतात, तसे निवडणुकीतील उमेदवारांकडून व राजकीय पक्षांकडून प्रचारकार्य जोराने सुरू होते. भूतकाळात केलेल्या चांगल्या कार्याची माहिती सांगितली जाते. भविष्यकाळासाठी नवा कार्यक्रम सादर करण्यात येतो. परिणामत: नागरिकांचे राष्ट्रप्रेम जागृत होते. समाजनिष्ठा नव्याने स्पष्ट होतात. राजकीय पक्षांचे जाहीरनामे व प्रचार यांतून लोकांचा शासनातील सहभाग स्पष्ट करण्याचा प्रयत्न होतो. समान कार्यक्रम तयार करण्यासाठी अनेक प्रकारचे लोक एकत्र येत असल्याने देशामध्ये एकत्त्वाची भावना वाढीला लागते . याच बरोबर प्रत्येक राजकीय पक्षाचा जाहीरनामा असतो असे जाहीरनामे राजकीय पक्ष निवडणुकीच्या काळात प्रसिद्ध करतात त्याचाही परिणाम मतदारांच्या वर्तनावर होत असतो. कारण या जाहीरनाम्यातून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला जातो. अनेक मोठ मोठी आश्वासने दिली जातात. मतदार या आश्वासनामुळे प्रभावित होऊन त्या विशिष्ट राजकीय पक्षास मतदान करतात. लोकांच्या हितसंबंधाची पूर्तता करणारी प्रलोभने हि त्यांना नेहमीच विशिष्ट पद्धतीने मतदान करण्यास प्रवृत्त करत असतात.

### व्यक्तीमहात्म्य

ISSN : 2348-7143
February 2018

समाजात विशिष्ट व्यक्तीला असलेली प्रतिष्ठा, मान सन्मान यामुळे ती व्यक्ती प्रभावी होते. त्यास अनेक अनुयायी असतात. व्यक्ती महात्म्य हा घटक राष्ट्रीय राजकारणापासून स्थानिक राजकारणापर्यंत प्रभावी आहे. त्यामुळेच लोक एखाद्या विशिष्ट व्यक्तीद्वारे प्रभावित होऊन त्यास मतदान करतात. राजकीय पक्ष देखील अशा लोकप्रसिद्ध व्यक्तींना उमेदवारी देऊन मतदारांना आकर्षित करतात. सिनेमा, साहित्य, जाहीराती, क्रीडा, अशा क्षेत्रात प्रसिद्ध असणाऱ्या व्यक्तींना उमेदवारी देऊन मतदारांना आकर्षित करण्यावर भर दिला जातो. स्थानिक पातळीवर पुढारीपण गाजवणाऱ्या लोकांना मतदारांचा पाठिंबा प्राप्त होतो. बर्याच वेळेस निवडणुकांसाठी राष्ट्रीय नेत्यांच्या नावाचा वापर केला जातो.

## निष्कर्ष

निवडणुकीद्वारा सर्वसाधारणपणे शासन हे लोकांना जबाबदार राखता येते, त्याचप्रमाणे खास करून लोकांच्या इच्छेनुसार कायदे करता येतात. हे जरी खरे असले, तरी जेथे निवडणुका मोकळ्या वातावरणात व निर्दोष रीतीने पार पडतात, तेथेही मतपेटीद्वारा मतदाराला त्याचे खरे मत स्पष्ट करता येतेच, असे नाही. अनेक वेळा मतदारांपुढे पुरेसे पर्याय नसतात किंवा असलेले पर्याय त्यांच्या मताशी मिळतेजुळते नसतात. राजकीय पक्षांनी उभे केलेले उमेदवार त्याला अयोग्य वाटण्याचा संभव असतो. अशा वेळी मतदार आपले मत नकारात्मक भूमिकेतून वापरतो. निश्चितपणे नको असलेले पर्याय, पक्ष, उमेदवार किंवा धोरण वगळून तो मताचा वापर करतो. ज्याला मतदार मत देतो, तो पक्ष किंवा उमेदवार त्याला मान्य असतोच, असे नाही. सर्वसाधारण मतदाराला उमेदवारांचा सर्वांगीण असा तौलनिक विचार करणे कठीण जाते. अशा वेळी मतदार जाती, धर्म, प्रादेशिकता, पैसा, हितसंबंध,राजकीय पक्ष व इतर माहिती—साधनांचा प्रभाव पडून तो मतदान करतो. मतदाराने उमेदवारांची पात्रता, अनुभव इत्यादींचा तौलनिक अभ्यास करून मतदान करणे आवश्यक असते. विशेषतः कल्याणकारी सरकारला अनेक तांत्रिक स्वरूपाची कामे करावी लागतात. अशा वेळी उमेदवाराची संबंधित क्षेत्रातील पात्रता व अनुभव मतदाराने लक्षात घेणे आवश्यक असते. तो उमेदवार सर्व सामान्य जनतेचा आहे की घराणेशाहीतून आला आहे ?, उमेदवाराचे सर्व सामान्य जनतेची संबंध कसे आहेत? उमेदवाराला स्थानिय आणिं राष्ट्रीय प्रश्नाची कितपत जान आहे? उमेदवार धर्मनिरपेक्ष लोकशाहीचा पुरस्करता आहे का? या सर्वांचा विचार करून मतदाराने आपल्या मूल्यवान मताधिकाराचा वापर केल्यास निवडणुकातील भ्रष्टाचार, गैरव्यवहार, गुन्हेगारी, प्रादेशिकवाद, घराणेशाही असे दोष दूर होऊन लोकशाही अधिक भक्कम होईल. म्हणूनच "ओ मतदाता, ओ मतदाता,तुम भारत के भाग्य विधाता राजसुय सम आज राष्ट्रहित यह चुनाव है होने जाता, कागज का यह नन्हा टुकड़ा, भारत माता का संबल है, वोट नहीं है तेरे कर में,महा यज्ञ हित तुलसी दल है ".

## संदर्भ

१. भारतीय शासन आणि राजकारण, बी.बी. पाटील, फडके प्रकाशन कोल्हापूर
२. भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार, राजेंद्र व्होरा आणि सुहास पळशीकर डायमंड पब्लिकेशन पुणे.
३. भारतातील राजकीय प्रक्रिया, डॉ. व्ही.डी. आवरी, प्रा. डी. एन. खालेकर, प्रा. व्ही.डी. कापडी, प्रा. आर. रिकामे, सक्सेस पब्लिकेशन पुणे.
४. इंटरनेट

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 42 : भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि राजकारण
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

# मतदार वर्तनावर प्रभाव पाडणारे घटक

**प्रा. राजु सानप**
राज्यशास्त्र विभाग
कै.बिंदु रामराव देशमुख कला वाणिज्य
महिला महाविद्यालय, नाशिक

**प्रस्तावना :-**

भारतीय राजकिय प्रकियेतील महत्वपूर्ण घटक म्हणून निवडणूक आयोगाची भूमिका आहे. भारतीय लोकशाही व्यवस्थेत नेतृत्व प्रभाव आणि मतदार वर्तन अत्यंत महत्वाचे आहे. भारतीय निवडणुकांत 50 ते 60 च्या आसपास मतदान होते. असे असले तरी मतदारांच्या वर्तनावर प्रभाव पाडणारे सामाजिक घटक अत्यंत महत्वाचे आहे. भारतीय विविधता आणि विविधतेतील सामाजिक घटक त्यात जातीयता, सांस्कृतीक वेगळेपण, आर्थिक घटक, प्रादेशिकता, भाषा, वंश, मतदारांचे हितसंबंध आणि राजकिय पक्षांचे जाहिरनामे तसेच जनमान्य नेतृत्व या घटकांचा मतदार वर्तनावर परिणाम करीत आहे.

**गृहितके –**

1. भारतीय मतदारांवर सामाजिक घटकांचा प्रभाव जाणवतो.
2. भारतातील काही मतदार परिपक्व तर काही अपरिपक्वतेचे लक्षणे दिसते
3. भारतीय मतदारांना आर्थिक घटक देखील प्रभावी करतो.

भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना 1950 मध्ये झाली. भारतीय राज्यघटनेत कलम 324 ते 329 हया कलमात निवडणूक आयोगाची रचना आहे. 1950 1989 पर्यंत एकात्म स्वरुपाचा असलेल्या निवडणूक आयोगाला 1993 पासून त्रिस्तरिय स्वरुप प्राप्त झाले. भारतातील निवडणूका शांत आणि सहकार्याच्या माध्यमातून पार पाडण्यात निवडणुक आयोगाची भुमिका महत्वाची आहे. भारतीय राजकारणाचा अभ्यास केल्यास 1952 ते 1967 हा काँगेस वर्चस्वाचा कालखंड होता. याचे कारण काँग्रेसला प्राप्त झालेली राष्ट्रिय चळवळीची पार्श्वभुमी, लोकमान्य अभिजन वर्ग आणि प्रभावी विरोधी पक्षाचा अभाव आहे परंतू 19767 नंतर भारतीय राजकारणात अत्यंत महत्वपूर्ण बदल झाले त्यात भारतात प्रांतिक स्वायतत्ता या घटकाने महत्वाची भूमिका बजावली आहे. भाषा, सांस्कृतीक वेगळेपण, वांशिक एकता, धार्मिक वेगळेपणा, प्रादेशिकता या घटकांनी भारतीय राजकारणात महत्वपुर्ण बदल केला. त्यामुळे संघटनात्मक पातळीवर एकत्र आलेल्या घटकांचे प्रादेशिक पक्षात रुपांतर झाले आणि हे घटक 1977 पासून भारतीय राजकारणात महत्वाची भुमिका पार पाडतांना दिसतात. भारतीय राजकारण राष्ट्रिय व प्रादेशिक पातळीवर प्रादेशिक पक्षांचे महत्व वाढते आणि तीन पायांची शर्यत सुरु झाली. 1990 नंतर कॉग्रेस व्यवस्थेचा हास कारण मंडळ आणि मंदिर आणि मार्कट या घटकांनी भारतीय राजकिय प्रक्रियेत महत्वपुर्ण बदल केला असे असले तरी भारतीय मतदारांच्या वर्तनावर 1952 ते आजपर्यंत काही घटक प्रभाव पाडत आहे. ते पुढीलप्रमाणे

**1. जात :**

सर्व पातळयांवर सामाजिक संबंध स्थापन करण्याच्या महत्वाचा आधार म्हणून जात या घटकाकडे पाहिले जाते. जातीचे राजकियकरण आणि राजकारणातील जात या दोन्ही बाबी भारतीय

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 42 : भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि राजकारण
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

राजकिय व्यवस्थेत वावरतांना दिसतात. निवडणुकांच्या उमेदवारांची निवड करणे मतदान करतांना जातीच्या उमेदवाराचा विचार केला जातो. महाराष्ट्रात मराठा तर तमिळणाडूत मुदलियार, आंध्रात कम्मारेडी, केरळमध्ये नायर, जातीचे मते त्यांच्या उमेवाराला मिळतात.

**2. धर्म :-**

भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे परंतू राजकिय पक्ष आणि सामाजिक संघटना विशिष्ट धर्माच्या रक्षणासाठी निर्माण झालेल्या दिसतात. निवडणुकीच्या वेळेस अप्रत्यक्षपणे धार्मिक अस्मितांना आवाहन केले जाते. धार्मिक संस्था, संघटना व्यक्ति यांचाही प्रत्यक्ष अप्रत्यक्ष वावर राजकारणात दिसतो. विशेषत: रथयात्रे नंतर भारतीय मतदारांवर धर्म घटकाचा प्रभाव बळावलेला दिसतो.

**3. भाषा :-**

भारत हे राष्ट्र बहुभाषिक आहे. राज्य पुर्नरचनेची मागणी तदनुषांगाने निवडनुकीच्या निकालांमध्ये त्यांचे प्रतिबिंब पडलेले आहे. भाषेचा प्रश्न अस्मितादर्शी असल्याने त्याआधारे जनमतावर प्रभाव पाडता येतो. व्दिभाषीक महाराष्ट्रातील 1957 च्या निवडणुकीत हा प्रभाव दिलेला आहे.

**4. प्रादेशिकता :-**

प्रादेशिकता हा घटक देखील मतदार वर्तनावर निर्धारित करण्यात महत्वाची भूमिका पार पाडतो. विशिष्ट प्रदेशात राहणा-या लोकांच्या त्या प्रदेशाबाबत निष्ठा जोडलेल्या असतात. प्रादेशिक अस्मितेमुळे मतदार विशिष्ठ पध्दतीने मतदान करतात.

**5. व्यक्तिमत्व :-**

पं.नेहरु, इंदिरागांधी, अटलबिहारी वाजपेयी, नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व इतर कारणापेक्षा व्यक्तिगत करिष्म्यामुळे अधिक काळ सर्वमत ठरले होते. व्यक्तिमहात्म्य म्हणजे एखादया विशिष्ठ व्यक्तिचा इतरांवर पडणारा प्रभाव व त्यास प्राप्त होणारे अनेक अनुयायी भारतात आहे. हा घटक राष्टीय राजकारणापासून स्थानिक राजकारणापर्यंत आहे. मतदार व्यक्ति महात्म्याला आकर्षित होऊन मतदान करतात.

**6. सत्ताधारी पक्षांची कामगिरी :-**

प्रत्येक पक्ष निवडणूक जाहिरनाम्याव्दारे आपल्या पक्षाचे काम, कार्यक्रम विचारप्रणाली ही मांडत असतो. सत्ताधारी पक्षात तिच्या कार्यकाळात जनमानसामध्ये आपली प्रमिमा कामगिरीव्दारे चांगली उभारलेली असते. यातून मतदान वर्तनाचा आकृतीबंध निर्धारित होतो.

**7. निरक्षता:-**

लोकांच्या निरक्षरतेचा फायदा जात, धर्म, प्रदेश, आणि इतर भावनिक मुद्रदयांच्या आधारे राजकिय पक्ष, जमातवादी गट घेतांना दिसुन येतात. निरक्षर लोकांचा मतदानात मोठया प्रमाणात सहभाग असतो. त्यांच्या असाहयतेचा लाभ राजकिय घटक उचलतांना दिसतो.

**8. फुटीरवाद :-**

स्थानिक पातळीपासून ते राष्ट्रिय पातळीपर्यंत फुटिरवादाचे घटीत दिसून येतात. रजनी कोठारी यांच्या मते फूटीरतेमुळे मतदार वर्तनात बदल होतो. नेतृत्व, निष्ठा, या बाबत मतदार आग्रही

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 42 : भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि राजकारण
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

असेल तर फुटिरतेमुळे त्यांचा परिणाम पारंपारिक पसंतीक्रम बदलला जातो, उदा राष्ट्रवादी काँग्रेस व मनसेची निर्मीती झाल्यानंतर मतदारांच्या वर्तनात बदल झाला.

**9. पक्ष निष्ठा :-**

अमेरिका, इंग्लंड या सारख्या विकसीत राजकिय व्यवस्थांमध्ये पक्ष निष्ठावंत अधिक दिसतात. तुलनेत भारतामध्ये पक्ष निष्ठावंतांची संख्या मर्यादित आहे. एखादया पक्षाशी बांधिलकी मानणारे मतदार त्या पक्षाची कोणतीही कृती, विचार धोरणे यांना पाठिंबा देतात उदा. 1977 साली काँग्रेसची स्थिती बिकट असतांनाही 34.5 टक्के मतदारांनी काँग्रेसला मतदान केले.

**10. तत्कालीन परिस्थिती :-**

मतदारांचे बदलणारे वर्तन हे मुख्य तत्कालिन स्थानिक व राष्ट्रिय मतदार वर्तनावर परिणाम करित असतात. 1971 साली लोकप्रियतेने निवडून आलेली काँग्रेस दरम्यानच्या आणिबाणीमुळे 1977 ला पायउतार झाली.

**11. निवडणूक प्रचार :-**

मतदारांना पक्षाचे विचार, आगामी आश्वासने उमेदवार, पक्षचिन्ह, भुमिका, बाबी समजण्यात आणि त्यांनी आपल्यालाच मतदान करावे यासाठी प्रत्येक राजकिय पक्ष निवडनूकीमध्ये प्रचार साधने वापरत असतो. जनसभा, कोपरा बैठक, पत्रके, व्यक्तिगत संवाद, हस्त्पत्रके बॅनर्स, वर्तमानपत्रे, आकाशवाणी, दुरदर्शन एसएमएस यामाध्यमातुन प्रचार केल्याने मतदारांच्या वर्तनावर परिणाम होतो.

**12. स्थानिक मुद्दे :-**

गेल्या काही वर्षापासून ग्रामपंचायती ते खासदारकी निवडणुका स्थानिक मुद्दयांवर लठविलेल्या जातात. पूर्वी केवळ स्थानिक पातळीवच्या निवडणूकामध्ये स्थानिक मुद्दे असायचे आत अशी विभागणी संपली आहे. या संदर्भात झारखंड मुक्ती मोर्चा, तेलंगणा राष्ट समिती, महाराष्ट्रात मराठी माणूस ही मुद्दे मतदार वर्तनावर प्रभाव पाडतात.

**13. सरकार विरोधी भावना :-**

सत्ताधारी पक्षाने जाहिरनाम्यामध्ये दिलेल्या आश्वासनांची पुर्ती केली नसेल वा तिची कारकिर्द सर्वच बाजूने आणि सर्वच घटकांसाठी सूमार दर्जाची ठरेलेली असेल तर जन भावना विरोधी बनते .

**14. पैशाचा प्रभाव :-**

भारतात पैसा हा घटकदेखील मतदारांच्या वर्तनात बदल घडवून आणण्याचा प्रक्रियेत महत्वाची भूमिका बजावतांना दिसतो. त्याचे कारण सर्वच प्रकारच्या निवडणुकांच्या वेळेस उमेदवार मतदारांना पैसे वाटतांना दिसतात. मतदान करतांना कोणता उमेदवार अधिक पैसे देतो. या घटकाचा विचार केला जातो.

**संदर्भ :-**

1. भोळे भा.ले. 2005 च्या भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळपुरे प्रकाशन नागपुर

2. जाधव तुकाराम 2011, भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया, द युनिक □काडमी पुणे
3. घोडके शरद, भारताचे शासन आणि राजकारण,2013, सक्सेस पुणे.
4. पळशीकर सुहास, 2006 समकालीन भारताचे राजकारण, प्रमिमा प्रकाशन, पुणे

ISSN : 2348-7143
February 2018

# मतदार वर्तनावर प्रभाव पाडणारे घटक

**प्रा. अभिन संपत पोटे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सायखेडा, ता. निफाड (नाशिक )
मो.नं.९७६७३४५१५२, ई-मेल-abhinpote5@gmail.com

**प्रस्तावना :-**

राज्यकारभार हा लोकांच्या इच्छेनुसार चालला पाहिजे अशी लोकशाही पद्धतीत अपेक्षा असते .पण प्रातिनिधीक लोकशाहीत लोकाच्या हाती शासनाची प्रत्यक्ष सत्ता नसते .ती लोकांनी निवडून दिलेल्या लोकप्रतीनिंच्या हाती असते .या मुळेच प्रातिनिधीक लोकशाहीत निवडणुकांना महत्त्व असते . निवडणुकांच्याद्वारे लोकांना राजकीय प्रकीयेत सहभागी होण्याची संधी मिळते.सर्व नागरिकांना राजकीय सहभागाची संधी देणारी आणि लोकांमध्ये राजकीय जबाबदारीची जाणीव निर्माण करणारी एकमेव प्रक्रिया म्हणजे निवडणुका होय .याचबरोबर शासना बद्दल लोकांमध्ये नाराजी असेल तर ते शासन बदलण्याची संधी निवडणुकांमुळे लोकांना मिळते. म्हणून लोकमतचे शासनावर नियंत्रण राहते .

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

भारताच्या निवडणूक प्रक्रिया व राजकारणावर प्रभाव पाडणाऱ्या पैलूचा आढावा घेणे. ( मतदार प्रभाव पडणारे घटक या संदर्भात .)

**संशोधन विषयाची गृहीताकृत्ये :**

भारताच्या निवडणूक प्रक्रिया व राजकारणावर काळानुसार कमी अधिक प्रमाणात विविध घटकांचा परिणाम होतांना दिसतो.

**संशोधन विषयाचे महत्व:**

निवडणुकांचे वस्तुनिष्ठ आणि शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण करण्याचा प्रयत्न आधुनिक काळात होऊ लागला आहे. या दृष्टीने मतदारांच्या वर्तनाचा अभ्यास महत्वाचा ठरतो. बहुसंख्य मतदार राजकीय पक्षाची धोरणे आणि त्यांचे जाहीरनामे याबद्दल अनभिज्ञ असतात. फारच थोड्या लोकांना राजकीय पक्षाची धोरणे कोणती आहेत आणि त्यांचे परिणाम कोणते होतील याबद्दलचे ज्ञान असते. बहुसंख्य मतदारांचे हे सामाजिक वर्ग , धर्म,वंश, जात, वयोमान, स्थानिक प्रश्न इ. घटकांच्या प्रभावातून ठरत असते. व्यक्ती तितक्या प्रवृत्ती या न्यायाने प्रत्येक मतदारावर सर्वात जास्त प्रभाव पडणारा घटक वेगवेगळा असू शकतो.

**संशोधन पद्धती :**

भारतीय मतदार वर्तनावर प्रभाव पाडणाऱ्या घटकांचे विचार विवेचन करण्यासाठी प्रामुख्याने द्वितीय तथ्य सामग्रीचा आधार घेण्यात येईल. त्यामध्ये प्रस्तुत विषयाच्या संदर्भातील ग्रंथांचा आधार घेण्यात आला आहे. तसेच विषयाची मांडणी करण्यासाठी वर्णनात्मक विश्लेषणात्मक पद्धतीचा आधार घेण्यात येईल.

**संशोधन विषयाचे विश्लेषण :**

**"मतदार वर्तनावर प्रभाव पडणारे घटक"**

ठराविक वयोमर्यादा पूर्ण करणाऱ्या सर्व प्रौढ स्त्री पुरुषांना मतदानाचा अधिकार देऊन राज्य घटनेने राजकीय सहभागाची कक्षा रुंद केली. लोकशाही व्यवस्थेला बळकटी आणण्याचे प्रयोजन यामागे होते. परंतु

आजही देशातील लोकशाहीतील निवडणूक प्रक्रियेबाबत काही लोक साशंक आहेत. त्यांच्या मते भारतीय मतदार हा विवेकी मतदाराप्रमाणे वर्तन करत नाही. त्यांच्या मतदार वर्तनावर पुढील घटकांचा आजही मोठ्या प्रमाणात प्रभाव पडत आहेत.

**जात –**

सर्व पातळयांवर सामाजिक संबंध प्रस्थापित करण्याचा महत्वाचा आधार 'जात' या घटकाकडे पहिले जाते.जातीचे राजकारण आणि राजकारणातील जात या दोन्ही बाबी भारताच्या राजकीय व्यवस्थेत वावरतांना दिसतात. निवडणुकीसाठी उमेदवारांची निवड करणे, मतदान करतांना जातीच्याच उमेदवाराचा विचार करणे, मंत्री मंडळ स्थापना वा राजकीय नियुक्ती करतांना जात या समीकरणाचा अवश्य विचार केला जातो.

**धर्म –**

भारतीय राज्यघटना धर्मनिरपेक्ष असून भारतीय जनता धर्मनिरपेक्ष नाही. या टीकेमध्ये बरीच सत्यता आढळते. काही राजकीय पक्ष व सामाजिक संघटना विशिष्ट धर्माच्या हित रक्षणासाठी निर्माण झालेल्या दिसतात. निवडणुकीच्या वेळेस अप्रत्यक्षपणे धार्मिक अस्मितांना आव्हान केले जाते.

**भाषा –**

भारत बहुभाषिक राष्ट्र आहे. भाषा आधारित राज्य पुनर्रचनेची मागणी आणि त्या अनुषंगाने निवडणुकीच्या निकालामध्ये त्याचे पडलेले प्रतिबिंब याचा अनुभव फार जुना नाही. भाषेचा प्रश्न अस्मिता दर्शी असल्याने त्या आधारे जनमतावर प्रभाव पाडता येतो. उदा. द्विभाषिक महाराष्ट्रातील १९५७ च्या निवडणुकांचा निकाल.

**प्रभावी व्यक्तिमत्व –**

पंडित नेहरू, इंदिरा गांधी यांचे नेतृत्व इतर कारणापेक्षा व्यक्तिगत करिष्म्यामुळे अधिक काळ सर्वसंमत ठरले होते. पक्षीय संघटना, शासन रचना आणि निवडणुका असा सर्वच स्तरांवर काही व्यक्तीमत्वांचा प्रभाव राहिलेला दिसून येतो. राष्ट्रीय स्तरावरील नेतृत्वा बरोबरच स्थानिक पातळीवरील नेतृत्वाच्या व्यक्तीमत्वामुळे त्यांच्या पक्षाला जन पाठींबा मिळतो.

**पैसा-**

निवडणुकीच्या काळात बहुतांश उमेदवार मतदारांना पैसे देऊन त्यांचे मत विकत घेतात. हे सर्वांना माहित असलेले उघड गुपित आहे. पक्षांकडून उमेदवारी मिळवण्यासाठी, जिंकून येण्यासाठी निवडणुकीच्या रिंगणात प्रचंड काळा पैसा आणला जातो. शे – दोनशे ते हजारो रुपयांना एक मत विकले आणि विकत घेतले जाते.

**प्रदेश वादाची भावना –**

वांशिक , बहुविविधता, जमातवाद, प्रदेशवाद आणि उपराष्ट्रवाद असे राष्ट्रीय अस्मितेचे प्रश्न भारतीय व्यवस्थेला भेडसावत आहेत. स्वतंत्र राज्य निर्माण करणे , अधिक स्वायत्तता मिळावी, आपल्या राज्याच्या हितसंबंधांचे रक्षण करणे, अश्या विविध आविष्कारातून प्रदेश वादाचे राजकारण डोके वर काढत आहे.

**निरक्षरता-**

लोकांच्या निरक्षरतेचा फायदा जात, धर्म, प्रदेश आणि इतर भावनिक मुद्द्यांच्या आधारे राजकीय पक्ष, जमातवादी गट आणि अतिरेकी घेतांना दिसतात. निरक्षर लोकांचा मतदानामध्ये सहभाग मोठ्या प्रमाणात असतो. मात्र त्यांच्या परिणामांकडे चिकित्सकपणे पाहण्यावर निराक्षरते मुळे मर्यादा येतात. त्यांना पैशाचे लालूच व इतर गोष्टींचे आमिष दाखवून तसेच भावनांचे शोषण करून लाभ उठवला जातो.

**संदर्भ-**

1. र. घ. वराडकर, भारतीय शासन आणि राजकारण, निराली प्रकाशन पुणे , जुलै ,२०१७
2. डॉ. बी.वाय. कुलकर्णी, भारतीय संविधान शासन व राजकीय प्रक्रिया, एज्युकेशन प्रकाशन, औरंगाबाद, जून, २०१३
3. तुकाराम जाधव, महेश शिरापूरकर, भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया, युनिक अकॅडेमी पूणे, जानेवारी,२०१७
4. कैलास सोनवणे , प्रा. वाघ , डॉ गोंगे ,भारताचे शासन आणि राजकारण , आयडॉल प्रकाशन, पुणे, जून ,२०१४

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 42 : भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि राजकारण
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

# मतदार वर्तनावर परिणाम करणारे घटक

**प्रा. सी. डी. राजपूत**
महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय,
मालेगांव कॅम्प, मालेगांव. जि. नाशिक

जगातील सर्वात आदर्श राजकीय व्यवस्था म्हणून लोकशाही व्यवस्था ओळखली जाते. लिंकन यांनी "लोकांनी, लोकांसाठी, लोकांकरवी चालवलेली शासन पध्दती म्हणजे लोकशाही होय" अशी लोकशाहीची सार्थ व्याख्या केली आहे. लोकशाहीत शासन कारभार लोकांच्या ईच्छेने चालतो. पुर्वी प्रत्यक्ष पध्दतीची लोकशाही अस्तीत्वात होती परंतू आजच्या काळात राष्ट्राचा आकार व लोकसंख्या विचारात घेता प्रत्यक्ष लोकशाही शासन पध्दती राबवणे अशक्य असल्याकारणांमुळे अप्रत्यक्ष लोकशाही शासन पध्दती राबवली जाते. यात राज्यकारभार प्रत्यक्ष लोक न चालवता लोकांचे प्रतिनिधी चालवतात. प्रतिनिधी निवडण्यासाठी सार्वत्रीक मतदान पध्दतीचा वापर केला जातो. देशातील सर्व नागरिकांना मतदानाचा अधिकार देण्यात आलेला असतो. भारतात १८ वर्ष पूर्ण करणाऱ्या सर्व भारतीय नागरिकांना मतदानाचा अधिकार देण्यात आलेला आहे. मतदान करणाऱ्या नागरिकांना मतदार हा शब्द वापरला जातो.

निवडणूकांना लोकशाहीत अतिशय महत्व आहे. निवडणूकातूनच देशाचा राज्यकारभार करणाऱ्या राज्यकर्त्यांना निवडले जाते. मतदार मतदान करुन देशाचे राज्यकर्ते कोण असावेत याची निवड करतो. मतदान प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी राज्यघटनेनुसार निवडणूक आयोगाची स्थापना केली जात असते. मतदारांच्या मतांमुळेच राज्यकर्ते निवडले जात असल्याने मतदारांच्या मतदान वर्तनावरच लोकशाहीचे यश अवलंबून आहे असे म्हणता येईल. प्रगल्भ मतदार हेच भक्कम लोकशाहीचे आधारस्तंभ मानले जातात.

RESEARCH JOURNEY

राजकीय पक्ष सत्ता मिळविण्यासाठी संघटितपणे मतदान प्रक्रियेत सहभागी होत असतात. मतदारांवर प्रभाव पडण्यासाठी ते प्रयत्न करताना दिसतात. यासाठी आपण निवडून आल्यावर कोणती कामे करु हे सांगण्यासाठी जाहीरनामे घोषीत केले जातात. मतदारांच्या मतदान वर्तनावर परिणाम टाकून आपला पक्ष कशाप्रकारे सत्तेमध्ये येईल याचा विचार सर्वच राजकीय पक्ष करतात. मतदार वर्तनावर परिणाम करणारे घटक पुढील प्रमाणे सांगता येतील.

## मतदार वर्तनावर परिणाम करणारे घटक:—

१. **व्यक्तिमहात्म्य:**

भारतीय राजकारणात मतदारांच्या वर्तनावर नेत्यांचा सर्वात जास्त परिणाम होतो. नेत्यांच्या वैयक्तीक लोकप्रियतेवरच पक्षाची मदार मोठी असल्याचे दिसते. प्रत्येक राजकीय पक्षाची इमारत लोकप्रियनेत्याच्या लोकप्रियतेवरच अवलंबून असते असे दिसते. भारतात पक्षाचा नेता नसतो तर नेत्याचा पक्ष असतो असे म्हटले जाते. म्हणूनच पक्षांतर करुनही अनेक नेते राजकारणात यशस्वी झाल्याचे चित्र दिसते. २०१४ ची सार्वत्रीक निवडणूक भाजपने नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रियतेवरच जिंकलेली दिसते. निवडणूक प्रचारात त्यांनी पक्षापेक्षा मोदींच्या लोकप्रियतेवर विश्वास दाखवून तसा प्रचार केला होता. मोदी सरकारला मतद्या असे अवहान ते जनतेला करत असताना दिसत होते. प्रत्येक राजकीय पक्षाकडे कमी अधिक लोकप्रिय असणारे नेते असतातच.

२. **धार्मिक घटक:**

भारतात धर्म हा घटक नेहमीच लोकांच्या सामाजीक, राजकीय वर्तनावर परिणाम करणारा ठरलेला आहे. धर्माचा प्रभाव मतदारांच्या वर्तनातही वेळो वेळी झालेला दिसून येतो. भारतात धार्मीक तेढ निर्माण होऊ नये म्हणून स्वातंत्र्यानंतर धर्मनिरपेक्षता हे तत्व म्हणून स्वीकारले गेले. परंतु राजकारणात धर्माचा वापर प्रयत्न करुनही कमी झाल्याचे दिसत नाही. आजही धर्माच्या नावावर मते मागीतली व दिली जातात.

रामजन्मभूमीच्या प्रश्नावरुन भारतीय जनता पक्षाने घेतलेल्या भूमिकेमुळे पक्षाच्या मतात वाढ झाली हे वास्तव आहे. प्रत्येक धर्मीयांचा स्वतंत्र राजकीय पक्षांना पाढिंबा असल्याचे दिसते.

३. **जातीचा प्रभाव:**

मतदान वर्तनावर सर्वात जास्त प्रभाव जात या घटकाचा होतो असे दिसते. भारतात जाती आधारीत राजकीय पक्षाची निर्मीती झाल्याचे पहायला मिळते. अनेक राजकीय पक्षांना विशिष्ट जातीतून सामाजीक आधार मिळत असल्याचे चित्र अनेक वेळा दिसते. ओ.बी.सी., दलित, उच्च जाती यावर आधारीत राजकीय नेतृत्व निर्माण झाल्याचे दिसते.

समाजात आजही जातीय अस्मीतेच्या आधारावर राजकीय गटांची निर्मीती होताना दिसते. जातीच्या आधारावर मत मागण्यावर जरी बंधने टाकण्यात आली असली तरी जातीचा प्रभाव न नाकारता येण्यासारखा दिसून येतो. राजकीय पक्ष उमेदवार देत असताना सुध्दा जातीचा विचार करतात असे अनेक वेळा दिसून आले आहे. सोशल इंजिनिअरिंग या नावाखाली जाती गटांना प्रभावीत करुन त्याचे रुपांतर मतपेटी केले जाते.

४. **पैशाचा प्रभाव:**

भारतीय राजकारणात १९९० च्या दशकानंतर वेगाने अर्थकारणाचा वापर राजकारणात वाढण्यास सुरुवात झाली. निवडणूका जिंकण्यासाठी पैशाचा वापर मोठया प्रमाणात वाढताना दिसत आहे. पैशाचे अमिष दाखवून मते मिळविण्याचा प्रयत्न मोठया प्रमाणात केला जातो. श्रीमंत उमेदवार याचा वापर मोठया प्रमाणात करतात हे एक उघड गुपीत आहे. प्रत्येक मताला विशिष्ट रक्कम देणे हा प्रकार चोरुन लपून होत असताना दिसतो. निवडणूक आयोगाच्या भरारी पथकांनी वेळोवेळी अनेक पक्षांच्या कार्यकत्यांकडून प्रत्यक्ष पैसे ताब्यात घेतल्याचे दिसते. आर्थीक परिस्थीतीने गरिब असलेल्या लोकांकडून आपल्या मताची विक्री होण्याच्या घटना जास्त आहेत असे सर्वेक्षण सांगते. पैशाचा परिणाम मतावर होतो ही वास्तवीकता आहे.

५. **प्रदेशीकता वादाचा परिणाम:**

प्रत्येक राज्यात प्रादेशीक पक्ष आहे व तो पक्ष प्रदेशावर झालेल्या अन्यायाचा पाढा वाचत असतो. स्वतंत्र विदर्भाची मागणी केली जाते व त्याला पाढिंबा देणाऱ्या राजकीय पक्षाला मत देण्याचे अवहान केले जाते. तृणमुल कॉंग्रेसचे पश्चिम बंगालमधील यश, तामिळनाडूत आण्णा डीएमकेस मिळत असलेले यश याचाच परिणाम आहे असे दिसते. अनेक राज्यात प्रादेशीक पक्षांचा प्रभाव वाढलेला आहे. याचे कारण मतदारावर प्रादेशीकतेचा झालेला परिणाम होय.

६. **बाहुबलाचा वापर:**

गुंडगिरीचा वापर भारतीय राजकारणात आता नविन राहिलेला नाही. १९९० च्या दशकानंतर अनेक निवडणूकीत राजकीय पक्ष व त्यांच्या नेत्यांनी गुंडांची मदत घेतल्याचे उघड सत्य आहे. राजकीय

नेत्यांकडे अनेक गुंडांचे संबंध असल्याचे अनेक वेळा दिसून येते. निवडूकीत मदत करण्याच्या बदल्यात त्यांना संरक्षण प्राप्त होते अशा चर्चा अनेक वेळा ऐकायला मिळतात.

नेत्यांशी संबंध असल्यास पोलीस कारवाही करत नाहीत असे बोलले जाते. विशिष्ट उमेदवाराला मतदान करण्यासाठी लोकांना धमकवण्याचे प्रकार घडतात. अशावेळी भीतीपोटी मतदानावर परिणाम होतो.

७. **साक्षरतेच्या प्रमाणात होत असलेली वाढ:**

साक्षरतेचा परिणाम मतदान वर्तनावर होताना दिसतो. मतदार वर्तमानपत्र वाचतो त्यातून मिळालेल्या माहितीनुसार आपले मत व्यक्त करत असतो. साक्षर मतदान दुसऱ्या कोणाच्या तरी सांगण्यातून आपले मत बनवत नाही. साक्षर राज्यामध्ये लाटेच्या राजकारणाचा परिणाम जाणवत नसल्याचे दिसून येते.

८. **सामाजिक प्रश्नाचा परिणाम:**

भ्रष्टाचार, महागाई, बेरोजगारी, ढासळलेली शासकीय सुव्यवस्था, सरकारची उदासीनता, कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न या सर्वाचा परिणाम मतदान वर्तनावर होतोना दिसतो मतदार मतदान करत असताना शासन काळात राजकीय पक्षांनी काणते बदल केले, लोकांचे किती प्रश्न सोडवले याचा विचार करुनच मतदान केले जात असते. मंत्रीस्तरीय भ्रष्टाचाराचा परिणाम कॉग्रेस पक्षाला भोगावा लागला हे २०१४ च्या सार्वत्रीक निवडणूक निकालावरुन दिसून येते.

समाजात घडणाऱ्या चांगल्या वाईट घटनांची जबाबदारी सत्ताधारी पक्षालाच उचलावी लागत असते. सामाजीक तेढ निर्माण होणाऱ्या घटना कशा प्रकारे थांबवता येतील याचा परिणाम कारण विचार सत्ताधारी पक्षालाच करावा लागतो. जर यात ते अयशस्वी झाले तर त्याचा परिणाम पुढील सार्वत्रीक निवडणूकीत मतदारांच्या वर्तनावर दिसतो.

RESEARCH JOURNEY

९. **भावनात्म आवहान:**

जनतेला केलेल्या भावनात्मक आवहानाला प्रतिसाद मिळताना दिसतो. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हत्ये नंतर राजीव गांधीबद्दल यांना मोठया प्रमाणात सहानभूतीच्या लाटेमुळे कॉग्रेस पक्षाला अभूतपूर्व यश मिळाले होते. राष्ट्रीय, प्रादेशीक स्तरावरील एखादी घटना घडल्यास व त्यानंतर त्वरीत निवडणूका झाल्यास त्याचा परिणाम स्पष्टपणे जाणवतो.

अशाप्रकारे मतदानाच्या वर्तनावर अनेक घटकांचा परिणाम होत असतो. परंतु हा परिणाम तात्कालीन स्वरुपाचा मानला जातो. निवडणूक वर्षात घडलेल्या घटनांचाच जास्त परिणाम लोकांवर होत असल्याचे जाणवते. मतदान करण्याच्या पूर्वी कोणता घटक जास्त परिणाम करेल हे निश्चित सांगता येणे कठिण आहे. कारण तो घटक व्यक्तीपरत्वे बदलत जाण्याची शक्यता असते. परंतु सर्वसाधारणपणे त्याचा अंदाज घेणे शक्य असते.

**संदर्भ:—**

१. भारतीय संविधान शासन व राजकीय प्रक्रिया — डॉ. बी. वाय. कुलकर्णी, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद
२. भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण — भास्कर लक्ष्मण भोळे, पिंपळपुरे प्रकाशन, नागपूर.
३. सामाजिक न्यायाची पार्श्वभूमी कॉग्रेसपुढीन आव्हाने आणि भाजपचा उदय — डॉ. प्रकाश पवार, डायमंड पब्लीकेशन.

ISSN : 2348-7143
February 2018

# मतदाराच्या वर्तनावर प्रभाव टाकणारे घटक

**श्रीमती. एस.बी. पवार**
के. टी.एच.एम कॉलेज नाशिक.

**श्री.प्रा. एस.व्ही. कोल्हे**
जनता ज्यु. कॉलेज व कला
वाणिज्य महाविदयालय वडनेर भैरव.

**गोषवाराः-**

*निवडणूका भारतीय राजकिय प्रक्रियेतील महत्वपुर्ण घटक आहे. लोकशाही व्यवस्थेमध्ये निवडणूक हया घटकाला महत्वपुर्ण स्थान आहे. राजकिय सत्तेचे शांतता व रचनात्मक मार्गाने परिवर्तन घडुन आणण्यासाठी भारतीय लोकशाही व्यवस्थेत निवडणूकास महत्व प्राप्त झाले आहेत. त्यामुळे देशातील निवडणूक प्रक्रिया सदोष असावी, कार्यक्षम असावी यासाठी भारतात निवणूक आयोगाची निर्मिती करण्यात आली आहे.*

**प्रस्तावनाः-**

भारतातील सर्व निवडणूकांचे संचालन करण्याची जबाबदारी निवडणूक आयोगावर आहे. भारतातील निवडणूक व्यवस्था ही वैशिष्टे पुर्ण आहेत. मतदार या घटकास निवडणूकीत मध्यवर्ती स्थान आहेत.त्यामुळे भारतातील निवडणूक प्रक्रियेने जे प्रतिनिधी निवडले जातात त्यात निवडणूक यंत्रणा आणि लोकशाही याचा महत्वाचा वाटा आहे. भारतात लोकशाही पध्दतीची स्थापना करण्यात आल्यामुळे निवडणूक प्रक्रियेस महत्व प्राप्त झाले आहेत.भारतात निश्चीत कालावधीनंतर निवडणूकणा होतात व सरकारकारची निर्मिती करण्यात येते.भारतात निवडणूकांची घोषणा करण्यापासुन निकाल जाहीर करेपर्यंत सर्व कार्य निवडणूक आयोग पार पाडते.

भारतातील निवडणूकावर व निवडणूका निकालावर प्रभाव पाडणारा सर्वात महत्वाचा घटक म्हणजे मतदाराचे वर्तन होय.मतदार ज्या पध्दतीने मतदान करतात त्यावर निवडणुकांचे निकाल अवलंबुन असतात. भारतात अदयाप ही मतदाराची टक्केवारी कमी आहे. जवळजवळ ६०% च्या आसपास मतदान होते याचा निवडणूकीवर परिणाम होतो. तसेच मतदान करतांना मतदारांना विविध घटक प्रभावित करत असतात. मतदारांच्या वर्तनावर प्रभाव पाडणा-या खालील घटकांच्या आधारे मतदारांच्या वर्तनाचा आकृतीबंध लक्षात येतो.

**१) जातीयता :-**

जात हा घटक मतदान वर्तनावर प्रभावीपणे परिणाम करतो.भारतात जाती निष्ठा मोठ्या प्रमाणात आढळते. यातुन आपल्या जातीच्या उमेदवारास मतदान करण्याची प्रवृत्ती मतदारामध्ये आढळते. महाराष्ट्रात मराठा जातीच्या लोंकाची मते मिळतात. आंध्रात कम्मा व रेडडी, केरळात नायर , तामिळनाडुत मुदलियार या जातीचे मते त्या उमेदवारास मिळतात आणि उमेदावार देखील जात या घटकाचा आधार घेवून त्या जातीसमुहात लोकांची मते प्राप्त करण्यात यशस्वी होतात. आणि त्यातुन ख-या अर्थाने जातीच्या आधारावर राजकारण अस्तीत्वात येते.

**२) प्रादेशिकता :-**

एखादया विशिष्ट प्रदेशात राहाणा-या लोकांचा त्यात्या प्रदेशाशी निष्ठा आढळते. आपल्या कर्मभुमीच्या नात्याने पाहाण्याचा द्रुष्टीकोन आणि आपली प्रदेशाबाबात निष्ठा आणि बांधिलकी अशा प्रादेशिक अस्मितेमुळे व्यक्ती किंवा मतदार विशिष्ट पध्दतीने मतदान करतात . जो कुणी आपल्या प्रदेशात सुखसाई हित सबधांना आणि विकास याला महत्व देईल अशा उमेदवारास लोक मतदान करतात. आणि त्यातुन विविध पक्ष राजकिय प्रक्रियेत आपल्या परिने प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करीत असतात. अनेक पक्ष प्रादेशिक अभिमान बाळगुन लोकांना आकर्षित करतात. आणि त्यांच्यावर आपले वर्चस्व प्रस्तापित करतात. समन्वय चर्चा शांततामय मार्गाने प्रश्न सोडविले

जातील असा विश्वास प्रादेशिक लोकांमध्ये निर्माण करुन लोकांच्या भावना जागृत करतात आणि लोंकाच्या मतदान विचारात परिवर्तन करतात.

**३) धार्मिकता :-**

भारत हा धर्म निरपेक्ष देश आहेत. भारतात धार्मिकतेला अधिक महत्व दिले जाते.भारतात विविध जाती धर्माचे लोक राहातात.प्रत्येक धर्मानुसार त्या त्या धर्माचे राजकिय नेते आहेत आणि लोक आपल्या धर्माचे मत आपल्याला कसे मिळेल यासाठी सतत प्रयत्नशील असतात. पंजाबमध्ये अकालीदल , शीख धर्मियांचे प्रतिनिधीत्व करते. तर राष्ट्रीय पातळीवर भारतीय जनता पक्ष हिंदुत्वादी राजकिय पक्ष आहेत. भारतीय जनसंघाचा उदय होण्यापुर्वी महाराष्ट्रात हिंदुत्ववांदाचे धुरीनत्व हिंदु महासभा आणि रामराज्य परिषद राजकिय पक्ष व काही संघटना वाहत होत्या. इस्लाम धर्मियांनी मुस्लीम लीगची स्थापना केली . धम ही बाब अदयापही भारतीय लोकांमध्ये महत्वाची मानली जाते. धर्म हा घटक समोर ठेवुन लोक विविध धर्माच्या उमेदवारास आपल्या धर्माचे हितसंबध जोपल्यास राजकिय पक्षात मतदान करण्याचा कल दर्शवितात.

**४) पैशाचा प्रभाव :-**

पैसा घटक मानवी वर्तनात बदल घडवुन आणणारा सर्वात महत्वाचा मानला जातो. निवडणुकीच्या काळात मतदारांना पैसे वाटले जातात आणि मतदार ही त्या मोहाला बळी पडतात आणि पैसे घेवुन मतदान करतात. असा मतदार योग्य प्रतिनिधी कोण याचा विचार न करता केवळ कोण अधिक पैसा देईल याचा विचार केला जातो. एका बाजुला केवळ ६० % मतदान होण्याचे कारण म्हणजे काही मतदार पैसे न मिळाल्यास मतदान करत नाही हे ही असावे. आजच्या राजकारणात पैशाचा वाढता प्रभाव आणि ज्या उमेदवाराकडे अधिक पैसा त्याच्याकडे मतदाराचा कल अधिक असतो आणि त्याचा परिणाम मतदानावर होतो थोडक्यात पैसा हा घटक राजकारणात मतदाराच्या वर्तनावर प्रभाव टाकतो.

**५) राजकिय पक्षाची जाहीरनामे :-**

निवडणूकीच्या काळात विविध राजकिय पक्ष आपली जाहीरनामे प्रसिदध करतात असे राजकिय पक्ष मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध प्रलोभलाने आकर्षित करतात. मोठी आश्वासाने देतात ज्या राजकिय पक्षात कमालीचे वकृत्व कौशल्य असेल तर तो संपुर्ण जनसमुहावर आपला ठसा उमटवतो. त्याच्या रसाळ वाणीला भुलुन मतदार प्रभावित होतात. आपले हितसबंध जोपासणारा केवळ हाच प्रतिनिधी आहे असे त्यांना वाटु लागते. त्यातुन त्याच्या वर्तनात मतपरिवर्तन दिसते.

**६) मतदाराचे हितसबंध :-**

प्रत्येक मतदारांना आपल्या सरकारकडुन काही अपेक्षा असतात त्यापुर्ण झाल्या की व्यक्तीला समाधान वाटते . आता हे सत्ताधारी पक्ष आपल्या अपेक्षा कितपत पुर्ण करु शकतील याचा विचार करणारा वर्ग आपल्या जन समुहात आहेत प्रत्येक राजकिय पक्षाची चौकस विचार मतदार करतो प्रत्येक समाजात मतदाराची आर्थिक , सामजिक पार्श्वभुमी वेगळी असते. त्यामुळे हित सबंध वेगळे असतात. हित सबधांना अनुसरुन मतदान करण्याचा कल वाटतो आणि त्यामुळे प्रत्येक मतदाराच्या वर्तनात वेगळपणा जाणवतो.

**७) व्यक्तीमत्व :-**

व्यक्तीमत्व हा घटक इतर प्रभाव पाडणारा प्रभावशाली घटक आहे. अगदी स्थानिक राजकारणापासुन ते राष्ट्रीय राजकारणापर्यंत उमेदवाराचे व्यक्तीमत्व प्रभाव पाडत असते. लोक कुणाला तरी एका घटकाला प्रभावित होत असतात. आणि आदर्श मानत असतात अशा वेळी व्यक्तींना प्रभावित होऊन लोक मतदान करतात.

**सारांश :-**

वरिल घटाकांच्या आधारे विचार करता व्यक्ती प्रवृत्ती ही सकारात्मक घटकाला महत्व देते. हे प्रश्न चिन्ह आहे सकारात्मक बाजु घेतली तर लोकशाहीला सुदृढ प्रतिनिधी निवडला जाईल आणि काही सकारात्मक घडेल मात्र

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 42 : भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि राजकारण
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

जनसमुह वाईट गोष्टीला जास्त महत्व देतो. ही एक मानवी प्रवृत्ती आहे सर्व सामान्यपणे चांगल्यापेक्षा वाईटवरच भर दिला जातो. आणि त्यातुन काही व्यक्ती विषयीची मत बनविले जाते. त्यामुळे प्रत्येक प्रादेशिक पक्षाने विधायक भुमिका पार पाडावी . अशी अपेक्षा आहे.तसेच प्रत्येक मतदाराने मतदानाचा हक्क बजवताना योग्य पध्दतीने बजवावा व आपल्या लोकशाही व्यवस्थेला मजबुत बनविण्यास खारीचा वाटा उचलावा हीच खरी अपेक्षा करणे योग्य ठरेल.

**संदर्भ ः-**


१. डॉ.शरद घोडके, डॉ.जे.सोनखासकर, डॉ.डी.सी.वाबळे, प्रा. प्रकाश पवार (२०१३), भारतीय शासन आणि राजकारण.(सक्सेस पब्लिकेशन )
२. शोभा कारेकर, शरद घोडके (२००४) महाराराष्ट्राचे शासन आणि राजकारण ) (अंशुल पब्लिकेशन )

# २०१४ च्या सार्वत्रिक निवडणूकीचे विश्लेषण

**प्रा. शरद अर्जून वाघ**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
कला, विज्ञान व वणिज्य महाविद्यालय,
मनमाड. ता. नांदगांव जि. नाशिक
Email – sharadwagh141@gmail.com

भारताच्या राजकिय प्रक्रियेत २०१४ निवडणूक अनेक कारणांसाठी वैशिष्टय पूर्ण अशीच मानावी लागेल. या निवडणूकीने भारताच्या राजकिय वातावरणात प्रचंढ परिवर्तन घडवून आणले आहे यात दुमत नाही. स्वतंत्र भारतात जवळजवळ ६० वर्ष एकहाती सत्ता असलेल्या कॉग्रेस पक्षाचे या निवडणूकीत अक्षरश: पानीपत का झाले? लोकसभेत विरोधी पक्ष म्हणून मान्यता मिळविण्याइतक्याही जागा वैभवशाली इतिहास असलेल्या कॉग्रेस पक्षाला मिळू नयेत याच्या इतकी वाइट गोष्ट कोणती असेल? राजकीय घराणेशाही, धोरण लकवा, पक्षश्रेष्ठींची रिमोट कंट्रोल व्यवस्था, मंत्रीमंडळातील भ्रष्टाचार, संघटनात्मक स्थरावर निर्माण झालेले दोष, सहकारी पक्षांचे कुरघोडीचे राजकारण, पक्षातील अंतर्गत गटांचे शह – काटशहाचे राजकारण, राजकीय अनुभव नसलेले राहुल गांधीचे नेतृत्व, जनमानसाशी तुटलेली नाळ व वरिष्ठ नेत्यांची बेजबाबदार वक्तव्ये यांसर्वांमध्ये याची उत्तरे आपणाला शोधावी लागतील. भारतीय जनता पक्षाला मोठा विजय मिळविण्यात यासर्व गोष्टींचा उपयोग झाल्याचे दिसते. गुजरात, राजस्थान, उत्तरप्रदेश, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, झारखंड, बिहार, छत्तीसगड या मोठया राज्यात कॉग्रेसचे मोठे नुकसान झाल्याचे दिसते. कर्नाटक वगळता एकाही राज्यात कॉग्रेस पक्षाला आपल्या जागा वाढवता आलेल्या नाहीत. ज्या सामाजीक आधारावर कॉग्रेस पक्ष पारंपारिक रित्या निवडणूका जिंकत आला होता तो सामाजीक आधार या निवडणूकीत नष्ट झाला होता. मनरेगा, अन्नसुरक्षा यांसारख्या लोकप्रिय योजनांच्या आधारे निवडणूक जिंकण्यचे कॉग्रेसचे प्रयत्न असफल ठरले. २०१४ च्या या निवडणूकीत तरुन मतदारांची संख्या १० कोटी ऐवढी प्रचंढ होती पण तरुन मतदारांना आकर्षीत करणे कॉग्रेसला जमले नाही.


भारतीय जनता पक्षाने या निवडणूकीत मोठया प्रमाणावर सोशल मिडियाचा वापर करुन तरुनांना आकर्षीत केले. आपल्या हायटेक प्रचार यंत्रणेचा अतिशय समर्पक वापर त्यानी करुन घेतला. सोशल मिडियाच्या वापरातही कॉग्रेस मागासलेलीच राहिली. कॉग्रेसनी या निवडणूक प्रचारात गौरवशाली इतिहासाचा वापर केला तर भारतीय जनता पक्षाने उज्वल स्वप्न दाखवले. 'अच्छे दिन आनेवाले है', 'सौगंध है मुजे इस मिट्टी की, मै देश नही झुकने दुगा' यासारख्या जाहिरातींनी लोकांच्या अस्मीतेला हात घालून त्याचे मतदानात रुपांतर करणे भारतीय जनता पार्टीला खूपच फायद्याचे ठरले.



स्त्रोत – निवडणूक आयोगाची वेबसाईट

ISSN : 2348-7143
February 2018

मुस्लीम, दलीत, इतर मागासवर्गीय हे पारंपारीक कॉंग्रेसचे मतदार दूर जाणे हा कॉंग्रेसला मोठा झटका मानावा लागेल. देशातील १६८ लोकसभा मतदारसंघात १०% ते १९.९% मुस्लीम लोकसंख्या आहे. ५६ लोकसभा मतदारसंघात २०% ते ३९.९% मुस्लीम लोकसंख्या आहे, तर २२ लोकसभा मतदार संघात ४० टक्क्यांपेक्षा जास्त मुस्लीम लोकसंख्या आहे. या मतदार संघातही कॉंग्रेसला विशेष यश मिळालेले दिसत नाही. या उलट यातील ३८ मुस्लीम बहुल मतदार संघात भारतीय जनता पक्षाने तर ३ ठिकाणी शिवसेनेने विजय मिळवल्याचे दिसते. यावरुन असे दिसते की, भारतीय जनता पक्षाने आपली हिंदुत्वाची प्रतिमा कायम ठेवून मुस्लीम समुदयाचा विश्वास संपादन करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. तुष्टीकरणाचे राजकारण कॉंग्रेसला राजकीय तोटयाचे ठरले आहे. उत्तर प्रदेशात मोठया प्रमाणात दलीत मताचा फायदा भारतीय जनता पक्षाला झाल्याचे खुद्द मायावतींनीच मान्य केले आहे. यादव मतांचाही मोठा फायदा भारतीय जनता पक्षालाच झाल्याचे दिसते. ओ.बी.सी. मतांचा प्रभाव असलेल्या उत्तर प्रदेशातील ३० पैकी २५ जागा व बिहारमध्ये ९ पैकी ४ जागा भारतीय जनता पक्षाने जिंकल्या आहेत. शेटजी — भटजीचा पक्ष ही प्रतिमा भाजपने बहुजन समाजातील नरेंद्र मोदी यांना पंतप्रधापदाचा उमेदवार घोषीत करुन पुसून टाकली. मोदींनी चहावाला म्हणून त्याची केलेली निंदानालस्ती 'चाय पे चर्चा' हा उपक्रम घेवून कॉंग्रेसवरच उलटवली.



स्त्रोत — निवडणूक आयोगाची वेबसाईट

२००९ व २०१४ च्या लोकसभा मतदान निकालाच्या तुलनात्मक आकडेवारी वरुन कॉंग्रेसचे अनेक राज्यातील वर्चस्व कशा पध्दतीने नष्ट झाले आहे हे लक्षात येते. मोठया राज्यांमध्येच कॉंग्रेसला मोठा धक्का बसल्याचे स्पष्ट होते. संघ परिवाराच्या संघटनात्मक बांधनीचा फायदा भाजपला मोठया प्रमाणात झाला आहे. मोदींची विकास पुरुष म्हणून निर्माण केलेली प्रतिमा व त्याला सोशल व प्रिंट मिडियातून दिलेला सपोर्ट, अबकी बार मोदी सरकार सारख्या लोकप्रिय घोषणा याचा भाजपाला फायदा झाला आहे.

ISSN : 2348-7143
February 2018

२०१४ च्या सार्वत्रीक निवडणूकीची वैशिष्टये:—

**१. सोशल मिडियाचा प्रभावी वापर:**

२०१४ च्या लोकसभा निवडणूकीत प्रथमच मोठया प्रमाणात सोशल मिडियाचा प्रभावी वापर राजकीय पक्षांनी आपल्या निवडणूक प्रचारात केलेला दिसतो. यामध्ये भाजपाने आपल्या हायटेक प्रचाराने सर्वांचे लक्ष वेधून आघाडी घेतली होती. एकाच वेळी अनेक ठिकाणी सभेला संबोधीत करण्यासाठी मोदींनी व्हीडिओ कॉन्फरन्सी सारख्या अत्याधुनिक साधनाचा यशस्वी वापर केला.

**२. तरुण नवमतदारांची प्रचंढ संख्या:**

या लोकसभा निवडणूकीत तरुण मतदारांची संख्या ही १० कोटी एवढी प्रचंढ होती. भाजपने सोशल मिडियाचा वापर करुन तरुणांशी मोठा जनसंपर्क ठेवला व निवडणूकीत त्याचा मोठा पाठिंबा मिळविण्यात त्यांना यश आले. २००९ च्या तुलनेत मतदारांमध्ये या निवडणूकीत १४% वाढ झाली होती. परंतु कॉंग्रेसला मात्र या निवडणूकीत २००९ च्या तुलनेत १०% नुकसानच सोसावे लागले. कॉंग्रेसचे एकूण टक्केवारीतील नुकसान सुमारे ३२% एवढे प्रचंढ होते याचाच सर्वात मोठा फटका कॉंग्रेसला बसला आहे.

**३. कॉंग्रेस वर्चस्वाच्या राजकारणाचा अंत:**

सुमारे ६० वर्ष एकहाती सत्ता संभाळणाऱ्या कॉंग्रेस पक्षाचा या निवडणूकीत प्रचंढ मोठा परावभ झाला. कॉंग्रेसला विरोधी पक्ष पदही मिळवून देणारे संख्याबळ मिळाले नाही. त्यामुळे देशातील या पक्षाच्या राजकीय वर्चस्वास मोठा तडा गेला. देशात कॉंग्रेस पक्षाच्या राजकीय ऱ्हासाला सुरुवात झाली असे म्हणता येईल.

**४. आघाडी सरकारांची अनिवार्यता संपली:**

देशात गेल्या २५ वर्षात कोणत्याच पक्षाला पूर्ण बहुमत मिळत नसल्या कारणामुळे आघाडी सरकारची अनिवार्यता निर्माण होत होती. परंतु २०१४ च्या सार्वत्रीक निवडणूकात भाजपला पूर्ण बहुमत मिळाल्यामुळे आघाडी सरकारची अनिवार्यता संपुष्ठात आली. देशात स्थीर सरकार निर्माण होऊ शकले.

**५. प्रादेशीक पक्षांच्या भूमिकेत बदल:**

प्रादेशीक पक्षांचा राष्ट्रीय राजकारणातील हस्तक्षेप आघाडयांच्या राजकारणांमुळे वाढलेला होता. परंतू या सार्वत्रीक निवडणूकीमध्ये प्रादेशीक पक्षांच्या राष्ट्रीय राजकारणावर मर्यादा आली. एकाच पक्षाला पूर्ण बहुमत मिळाल्यामुळे पूर्वी सारखे प्रादेशीक पक्ष राष्ट्रीय पक्षाशी सौदेबाजी करु शकले नाहीत. त्यांचे राजकारण राज्यांपूरते मर्यादीत झालेले दिसून येते.

**६. भारतीय जनता पक्षाचा शक्तीशाली पक्ष म्हणून उदय:**

२०१४ च्या या सार्वत्रीक निवडणूकांचे सर्वात महत्वाचे वैशिष्टय म्हणजे भारतीय जनता पक्षाचा सर्वात शक्तीशाली राजकीय पक्ष म्हणून झालेला उदय होय. २००९ व

२०१४ च्या सार्वत्रीक निवडणूकांच्या तुलनात्मक आकडेवारी वरुन आपल्या ते स्पष्ट करता येईल.

| भारतीय जनता पक्षाला मिळालेली मते | | | |
|---|---|---|---|
| निवडणूक वर्ष | मिळालेली मते | मतांची टक्केवारी | मिळालेल्या जागा |
| २००९ | ७,८४,३५,३८१ | १८.८ | ११६ |
| २०१४ | १७,१५,९५,४३२ | ३१ | २८२ |

भाजपला २००९ च्या तुलनेत १२ टक्के मते व १६६ जागा जास्त मिळाल्या आहेत. टक्केवारीत सांगायचे झाल्यास भाजपला ६४% मते व १४३% जागा २००९ च्या तुलनेत जास्त मिळालेल्या आहेत. भाजपच्या आघाडीतील इतर पक्षांनाही खूप मोठा फायदा मिळाल्याचे दिसते. देशात कॉंग्रेस पक्षासारखी एक हाती सत्ता मिळविण्यात भाजपला यश आले आहे असे म्हणता येईल.

**७. संपुष्ठात आलेले तुष्टीकरणाचे राजकारण:**

भारतीय राजकारणात जात, धर्म, प्रदेशवाद, पंथ, हितसंबध, वर्गवाद यांसारख्या विषयांवरुन तुष्टीकरणाचे राजकरण केले जात होते. जात, धर्माच्या नावावर मतदारांना विभागून त्याचे रुपांतर मतपेटीत करण्यचे प्रयत्न राजकीय पक्ष करत परंतु या निवडणूकीच्या निकालातून जातीच्या, धर्माच्या, वर्गाच्या आधारे मते दिली गेली नाहीत हे स्पष्ट होते.

जात, धर्म, वर्ग यांच्या आधारे बालेकिल्ले म्हणून प्रसिध्द असलेले विशिष्ट राजकीय पक्षांचे मतदार संघ २०१४ च्या सार्वत्रीक निवडणूकीत उध्दवस्त झालेले आहेत हे वास्तव आहे. जात, धर्म, यांच्या वरती जावून लोकांनी भाजपला मतदान केले हे निवडणूक निकालातून स्पष्ट होते.

**देशाच्या राजकारणात परिवर्तन येण्याची कारणे:**

सत्तेचा गैरवापर, राजकीय स्तरावरील भ्रष्टाचार, महागाई, प्रशासन स्तरावरील उत्तरदायीत्वाचा अभाव, राजकीय घराणेशाही, जनतेला गृहीत धरण्याची राजकारण्यांची मानसीकता, दहशतवादाची आव्हाने व शेवटी सर्व ठिकाणी चटके सोसावे लागणारी सामान्य जनता या सर्वांचा एकत्रीत परिणाम २०१४ च्या सार्वत्रीक निकालावर झाल्याचे निदर्शनास येते. शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या परिस्थीतीचे आकलन करण्यास पुरेशा आहेत. देशातील सामाजीक, राजकीय, आर्थीक स्थितीत एक प्रकारची मरगळ पसरल्याचे चित्र निवडणूकी पूर्वी देशात होते त्यामुळेच भाजपने दिलेला 'अच्छे दिन आनेवाले है' ही जाहिरात चर्चेचा विषय ठरली.

भारतीय जनता पक्षाने परिस्थीतीचे योग्य आकलन करित हायटेक निवडणूक प्रचार यंत्रणा उभारुन कॉंग्रेसला मात दिली. कॉंग्रेसमधील नेत्यांनी निवडणूक काळात केलेली वक्तव्य, सत्ताकाळात झालेला भ्रष्टाचार, स्थानिक नेतृत्वाचा तुटलेला जनसंपर्क याचा एकत्रीत परिणाम

त्या पक्षाला भोगावा लागला. नरेंद्र मोदींच्या कसलेल्या राजकारणा समोर तुलनेने अनुभवात कमी असलेले राहुल गांधींचे नेतृत्व कॉंग्रेस पक्षाच्या पराभवाला कारणीभूत असल्याचे दिसते. भाजपने भ्रष्टाचार मुक्त शासन व विकास या मुद्यावर प्रचार केला. पण कॉंग्रेस इतिहासातील महानता याचाच प्रचार करता दिसत होती.

सरकारचे प्रमुख म्हणून पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी अनेक मुद्यावर मौन बाळगले. हे विरोधी पक्षाच्या पथ्यावर पडल्याचे दिसून आले. लोकांना बदल हवा होता. नविन उर्जा देवू शकेल असे नविन नेतृत्व हवे होते, जे देशाला विकासाच्या मार्गावर आत्मविश्वासपूर्वक पुढे घेवून जाईल. याचा अचूक अंदाज घेवून भाजपने विकासाचा चेहरा म्हणून दहा वर्षा पेक्षा जास्त काळ गुजरातचे मुख्यमंत्री पद भूषवीलेले नरेंद्र मोदी या इतर मागासवर्गीय घटकातून पुढे आलेल्या नेत्याला पंतप्रधान पदाचा उमेदवार घोषीत करुन एकाच दगडात अनेक पक्षी मारले.

भाजपने आपला प्रखर हिंदुत्ववादाचा चेहरा बदलून 'सबका साथ सबका विकास' हा नविन नारा दिला. त्याचा त्यांना भरपूर राजकीय फायदा झाला. कॉंग्रेसने सर्वच जाती, धर्माच्या लोकांना खूश करण्याचा केलेला प्रयत्न अयशस्वी ठरुन त्याचा सामाजीक आधार कमकुवत होत गेला. कॉंग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी निवडणूक काळात केलेली वक्तव्य विरोधी पक्षांनांच नव्हेतर सामान्य जनतेला देखील आवडणारी नव्हती त्याचा अतिशय वाईट परिणाम निवडणूक निकालात दिसून आला.

२०१४ ची सार्वत्रीक निवडणूक अनेक अर्थांनी एतिहासीक अशीच होती हे मान्यच करावे लागेल. या निवडणूकीने देशाच्या राजकारणात एका वैभवशाली इतिहास असलेल्या राजकीय पक्षाला अस्ताकडे नेले तर दुसऱ्या पक्षाचा मोठा उदय घडवून आणला. याचा भारताच्या राजकारणावर दूरगामी परिणाम होणार आहे हे निश्चित आहे.

RESEARCH JOURNEY

**संदर्भ:**

१. सामाजीक न्यायाची पार्श्वभूमी कॉंग्रेसपुढीन आव्हाने आणि भाजपचा उदय – डॉ. प्रकाश पवार, डायमंड पब्लीकेशन. पान – २०८,२१०,२११.
२. भारतीय निवडणूक आयोगाची वेबसाईट (eci.nic.in/eci _main1/statistical_reportge2014.aspx)
३. भारतीय संविधान शासन व राजकीय प्रक्रिया – डॉ. बी. वाय. कुलकर्णी, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद. पान – ३८०,३८१,५३२.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 42 : भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि राजकारण
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

# भारतीय निवडणूक प्रक्रियेत आधुनिक साधनांचा वापर

**प्रा. डी.डी.गव्हाणे**
सहाय्यक प्राध्यापक व विभागप्रमुख (अर्थशास्त्र)
कला व वाणिज्य महाविद्यालय, वडनेरभैरव ता. चांदवड जि. नाशिक
dattadg.2007@gmail.com

भारतीय निवडणूका या सरकारी तिजोरीवर मोठा ताण निर्माण करतात. देशाच्या राज्यकारभारासाठी इतक्या मोठ्या प्रमाणात खर्च होऊनही लोकांचा निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास वाढलेला दिसत नाही. उलट तो कमी कमी होत असलेला दिसतो. शिवाय निवडणूकीच्या काळात सरकारी यंत्रणांवर मोठा ताण निर्माण होतो. त्यांमुळे 'डीजीटल इंडीयाच्या' युगात निवडणूकाही डीजीटल केल्या तर ?

**शोधनिबंधाचा उद्देश :-**

1. निवडणूकीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापराची शक्यता तपासणे.
2. सामान्य जनतेचा लोकशाही प्रकियेवरील विश्वास दृढ करणेसाठी उपाय सुचविणे.
3. निवडणूक काळात होणाऱ्या सरकारी खर्चात कपात करण्यासाठी उपाय सुचविणे.
4. सरकारी यंत्रणेचा वेळ, पैसा व कामाचा ताण कमी करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

**गृहितके :-**

1. निवडणूक प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास सामान्य जनतेचा निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास वाढेल.
2. निवडणूक काळात होणाऱ्या सरकारी खर्चात कपात करता येणे शक्य आहे.

**संशोधन पद्धती :-**

सदर शोधनिबंध हा वर्णनात्मक व उपायात्मक स्वरुपाचा आहे. यासाठी मतदारांचा अडचणी जाणून घेण्यासाठी निरीक्षण व मुलाखत याचा प्राथमिक तथ्यांचा तसेच दैनिक लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, सकाळ या दुय्यम आधार सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे.

भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी असल्याने या यंत्रणेत निवडणूका या खुप मोठी भुमिका बजावतात. त्यांमुळे निवडणूका या स्वच्छ व पारदर्शक वातावरणात होणे गरजेचे आहे. मात्र भ्रष्टाचारी मार्गाने या निवडणूकात अनेक प्रकारचे अडथळे निर्माण केले जातात. त्याचा परिणाम भारतीय लोकशाहीवरील सर्वसामान्य मतदारांचा विश्वास कमी होत चालला आहे. निवणूकांतील दोषांमुळे मतदार त्यांचा मतदानाचा हक्क न बजावणे पसंत करताता. राजकिय पक्षांनाही हेच हवे असते. त्यांमुळे जेव्हा भारतातील 100 टक्के मतदार मतदानाचा हकक बजावेल व त्यांनंतर जे सरकार बहुमताने निवडूण येईल ते खरे लोकशाही सरकार असेल.

**यासाठी पुढील उपाययोजना करणे गरजेचे आहे -**

**1. मतदान कार्ड आधार नंबरशी संलग्न करणे :-**

आधार नंबर पॅन, बॅक खाते, मोबाईल, इत्यादी सेवेसाठी अत्यावश्यक केले आहे. त्याचप्रमाणे ते मतदान कार्डलाही संलग्न करावे. त्यामुळे मतदार यादीतील दुबार असलेली नावे आपोआप कमी होईल व यादीचा घोळ मिटेल. मतदार यादीत बोगस नावे मुद्दाम घुसविली जातात व मतदानाच्या वेळी या नावांचा फायदा घेऊन बोगस मतदान केले जाते. आधार संलग्नीकरणाने ही बोगसगीरी बंद होईल.

ISSN : 2348-7143
February 2018

**2. देशातील सर्व निवडणूका एकाच वेळी घेणे :-**

भारतात सरपंच, जि. प., पंचायत समिती, विधानसभा, लोकसभा सदस्य यांच्या निवडणूका होतात. प्रत्येक वर्षात कुठली ना कुठली निडणूक असते. शिवाय निवडणूक आयोगाला स्वतंत्र कर्मचारी वर्ग नाही. त्यांमुळे पोलीस, शिक्षक, तहसिल, जिल्हाधिकारी यांच्या कर्मचाऱ्यांवर कामाचा बोजा पडतो. तसेच आचारसंहितेत सरकारला निर्णय घेता येत नसल्याने सरकारी कारभार लालफीतीत अडकला जातो. त्यांमुळे संपुर्ण देशात विधानसभा, लोकसभा, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, महानगरपालीका अशा सर्व निवडणूका एकाच वेळी घेतल्यास एकदा निडणूका झाल्या की, 5 वर्षे पुन्हा पुन्हा निवडणूका घेण्याची गरज पडणार नाही व खर्चात आणि सरकारी कर्मचाऱ्यांच्या श्रमात मोठी बचत होईल. प्रत्येक स्वराज्य संस्थेला मिळणारा निधी खर्च होण्यासाठी सर्व लोकप्रतिनीधींचा कालावधी एकच असणे फार महत्वाचे आहे. मतदारांनाही पुन्हा पुन्हा मतदान नसल्याने ते स्वतःहुन मतदान करण्यासाठी येतील.

**3. मतदानासाठी मशिन ऐवजी ऑनलाईन पद्धत सुरु करणे :-**

मतदानासाठी मशिन ठेवल्याने त्यांची जपणूक, बंदोबस्त यांवर खुप वेळ व श्रम खर्च होतात. त्याऐवजी मतदान केल्यानंतर ते मतदान केंद्रात न साठवता निवडणूक विभागाच्या मुख्य कार्यालयात इंटरनेटद्वारे साठविले जावे व मतदानाची वेळ संपताच सर्व जागांसाठीचे निकाल ऑनलाईनच जाहीर करावे त्यांमुळे मशिन सांभाळणे व तत्सम कामे कमी होऊन निकालात सुलभता व गती येईल.

**4. मतदानासाठी मतदान केंद्र ऐच्छिक करणे :-**

ऑनलाईन मतदान पद्धती व आधार जोडणी झाल्यास मतदारास मतदान करण्यासाठी आपले मतदान ज्या केंद्रात आहे त्या ठिकाणी जाण्याची गरज नाही. त्यांमुळे मतदार सोईच्या ठिकाणी मतदान करु शकेल. आजच्या मतदान पद्धतीत निवडणूक कर्मचाऱ्यांनाच त्यांचा मतदानाचा हक्क बजावता येत नाही.

**5. निवडणूक आयोगाने स्वतःचा ॲप तयार करणे :-**

निवडणूक आयोगाने सर्व सुविधायुक्त ॲप तयार केल्यास थोड्याच दिवसात लोक घरी बसल्या बसल्या मतदान करु शकतील. बॅक ॲप व वेबसाईटद्वारे बॅकीग व्यवहार होतात. त्याचप्रमाणे आधार पुष्टीच्या आधारे ॲप व वेबसाईटद्वारे मतदार आपले मत घरबसल्या देऊ शकेल.

**निष्कर्ष** :

1. निवडणूक प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास सामान्य जनतेचा निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास वाढेल. सुचविलेल्या उपाययोजना प्रत्यक्ष अंमलात आणल्यानंतर निवडणूका या स्वच्छ व पारदर्शक वातावरणात होतील. त्यांमुळे प्रत्येक राजकीय पक्षांना सत्ता संपादित करण्यासाठी विकास कामेच करावी लागतील. राजकारण करावे लागणार नाही तेव्हा मतदारांना खरे राजपद मिळेल व त्यांचा लोकशाहीवरील विश्वास अधिक दृढ होईल.
2. निवडणूक काळात होणाऱ्या सरकारी खर्चात कपात करता येणे डीजीटल साधनांमुळे शक्य आहे. शिवाय कार्यक्षमतेत मोठी वाढ होईल .

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 42 : भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि राजकारण
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

# भारतीय निवडणूक प्रक्रिया : विकास आणि सुधारणा

**प्रा.भिमराज गायकवाड**
विभाग प्रमुख व सहा.प्राध्यापक (राज्यशास्त्र)
म.वि.प्र.स.चे कलाव वाणिज्य महाविद्यालय,
वडनेर भैरव,ता.चांडवड (नाशिक)

**प्रस्तावना :-**

भारत हा जगातीलसर्वात मोठा लोकशाही प्रधान देश म्हणुन ओळखला जातो.संविधान निर्मीत्यांनी लोकशाहीचा केलेलास्विकार आजपर्यत सुरु असुन, हीलोकशाही आज बरीच प्रगल्भ झाली आहे. असे असले तरीहीभारतीय लोकशाही संपुर्णतः आदर्शवाटावी अशी आहे. असे मात्र आपण म्हणु शकत नाही.शांततामय मार्गानेसत्तातरघडवून आणणारा मार्ग, म्हणून लोकशाहीकडे पाहीले जाते.

भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्याविविध भाषिक प्रदेशात भारत प्रजासत्ताक राष्ट्र झाल्यापासून गेली अनेकवर्षे लोकशाहीच्या मुल्यांना धक्का न लागू देता देश तसेच राज्य पातळीवरील निवडणूका यशस्वीपणे राबवण्यात आल्या.देशाच्या प्रशासकिय यंत्रणेच्या तुलनेत लोकप्रतिनिधींना जनतेचे राज्य चालवण्यासाठी सत्तेवर आणणारीनिवडणुक प्रक्रिया ही एकशिस्तबध्द,सोपी व नेमक्या उद्देशासाठीराबवली जाणारी यंत्रणा आहे.असेही म्हणता येईल की, निवडणूक म्हणजेच नागरीकांचीव नागरीकांकरिताविकसीत केलेली, जनमतावर लोकनेताठरवणारी परंपरा आहे.प्रत्येक निवडणूकील चुकांपासून धडाघेतवेळोवेळीनिवडणूकींशीसंबंधितनियमांत सुधार करण्याचेही प्रयत्न भारतीय निवडणूक आयोगाने केले आहे.

लोकशाहीच्या निवडणूका या खुल्या वातावरणात व्हाव्यात हे महत्त्वाचे असते. परंतू मागील काहीवर्षात या निवडणूकीच्या संपुर्ण प्रक्रियेत अनेक दोषशिरले आहेत. भारतीय लोकशाहीसाठीहाचिंतेचा विषय बनला असून सामान्य मानसाचा या लोकशाही प्रधान राजकिय व्यवस्थेवरील विश्वास उडत चालला आहे. ही एक गंभीर बाब आहे.

1) **संशोधनाची उदिष्टेः**

1)भारतीय निवडणूक प्रक्रियेचा अभ्यास करणे.
2)भारतीय निवडणूक प्रक्रियेमध्ये काळानुसार कोणकोणत्या सुधारणा झाल्या यांचा अभ्यास करणे.
3)भारतीय निवडणूक प्रक्रियेच्या सुधारणांमध्ये संसदेच्या योगदानाचा अभ्यास करणे.
4)भारतीय निवडणूक प्रक्रियेच्या सुधारणांमध्ये निवडणूकआयोगाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
5)भारतीय निवडणूक प्रक्रियेच्या सुधारणांमध्ये न्यायालयांच्या भूमिकांचे अभ्यास करणे.
6)भारतीय निवडणूक प्रक्रियेमध्ये काळानुसार कोणकोणत्यासुधारणाव्हावेत यांचा अभ्यास करणे.

2) **संशोधनाच्या पध्दतीः**

प्रस्तूत शोधनिबंधासाठी दुय्यम सांधनांचा वापर करुन तथ्य संकलन करण्याचा प्रयत्न केला आहे.संबधित विषयावरिल संदर्भ व क्रमिक पुस्तके, मासिके, वर्तमान पत्रे, इंटरनेट वरिलवेबसाईट यांचा अभ्यास करुनहीमाहिती मिळवलेली आहे.

3) **भारतीय निवडणूक प्रक्रियाःविकास आणिसुधारणाः**

गेल्या अनेकवर्षात भारतातील निवडणूकामध्ये उत्तरोत्तरसुधारणाघडून येत असूननिवडणूक पध्दत अधिकाधिक बळकट होत आहे.

ISSN : 2348-7143
February 2018

**अ) संसदेच्या कायद्यानेः**

निर्माण होणारी नवनवीन आव्हाने आणिसतत बदलणारी परिस्थिती यामुळे निवडणुक कायद्यामध्ये अनेक दुरुस्त्या करण्यात आल्या.यापैकी काही नवीन बदल पायंडा पाडणारेठरले.

1. **मतदानाच्या हक्कासाठी किमान वयोमर्यादा खाली आणणेः**
   यामध्ये 1989 मध्ये झालेला बदल महत्त्वपूर्ण ठरला.मतदानासाठी मतदार म्हणून नोंदणी करण्याचे वय 21 वर्षांवरुन 18 करण्यात आले.
2. **खुल्या मतदानाला सुरुवातः**
   2003 या वर्षापासुन राज्यसभेच्या निवडणुकांमध्ये खुल्या मतदानाला सुरुवात झाली.
3. **लष्करी आणि निम लष्करी दलातील कर्मचाऱ्यांना मतदान करण्याचा हक्कः**
   लष्करी आणि निम लष्करी दलातील कर्मचाऱ्यांना प्रतिपत्राव्दारे संसदेच्या कायद्याने मतदान करण्याचा हक्क देण्यात आला.
4. **परदेशातील नागरिकांना मतदार यादीमध्ये नाव नोदण्याची तरतूदः**
   अगदीअलीकडेसंसदेने कायद्यामध्ये दुरुस्ती करुन परदेशातील भारतीय नागरीकांना मतदार यादीमध्ये नाव नोंदण्याची तरतूद केलीआहे
5. **निवडणूक आयोग सक्षम करण्याबाबत संसदेची भूमिकाः**
   निवडणुकआयोगाच्या आधिकारांमध्ये संसदेकडुन करण्यात आलेल्या काही बदलांमुळे निवडणुकआयोग अधिक सक्षम होण्यास मदत झाली.

**ब) न्यायालयांचा पाठिंबाः**

कायद्याचा सकारात्मक अर्थलावुन न्यायालयांनीही निवडणूक आयोगाचे हात बळकट केले आहेत.

1. **निवडणूकांच्या वैधतेबाबतचा प्रश्न उपस्थित करण्याबतः**
   सर्वोच्च न्यायालयाने एका महत्त्वपूर्ण खटल्याच्या निकालातदिलेला निर्णय महत्त्वपुर्ण ठरलाआहे. यामध्ये राज्यघटनेच्या कलम 329(ब) अनुसारनिवडणक प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतनिवणुक याचिकांचा अपवाद वगळतानिवडणुकांच्या वैधतेबाबत प्रश्न उपस्थित करण्याला प्रतिबंध करण्यात आलाआहे, असे या निर्णयात म्हटले होते.
2. **निवडणूक आयोग व आधिकाऱ्यांविरुद्ध आव्हन देण्याबाबतः**
   1978 मध्ये अशाच एका महत्त्वपूर्ण खटल्याच्या निकालातसर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णयात, निवडणूक आयोग व आधिकाऱ्यांविरुद्ध आव्हन देण्याला सर्वसमावेशक बंदी घालण्यात आल्याचे न्यायालयाने सांगितलेआहे.
3. **आयकर विवरणपत्रे भरण्याबाबतः**
   1995 मध्ये अशाच एका महत्त्वपूर्ण खटल्याच्या निकालातदिलेला निर्णयत राजकिय पक्षांनी आयकर विवरणपत्रे भरायलाच हवी अशासुचणादिल्या, असे या निर्णयात म्हटले होते.
4. **मतदारांना त्यांच्या उमेदवाराविषयी माहीती करुन घेण्याचा हक्कः**
   मतदारांना त्यांच्या उमेदवाराविषयी माहीती करुन घेण्याचा हक्कआहेअसा एक महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. उमेदवारांना प्रतिज्ञापत्र सादर करणेआवश्यक असुन त्यामध्ये स्वःताचीगुन्हेगारी पार्श्वभुमी, मालमत्ता, कर्जआणिशैक्षणिक पात्रता याविषयी माहीती देणेआवश्यक आहे, असे या निर्णयात म्हटले होते.

ISSN : 2348-7143
February 2018

**क)निवडणूकआयोगाचे नाविन्यपुर्ण पाऊलः**

निवडणूक आयोगाने अनेकसुधारणास्वतःच पुढाकार गेऊन केल्या आहेत.त्या पुढिल प्रमाणे.

1. **आदर्श आचारसंहितेचा मुद्दाः**

आदर्श आचारसंहितेचा मुद्दा राजकिय पक्षांनी मांडला होता. आयोगाने तो उचलून धरुन त्याबाबतची नियमावली तयार केली आणि 1990 पासुन त्याच्या कडक अंमलबजावणीस सुरुवात झाली.

2. **राजकिय पक्षाची नोंदणी,मान्यता वचिन्हे याबाबतचा प्रश्नः**

आधीच्या निवडणुक कायद्यांत राजकिय पक्षांची नोंदणी, मान्यता आणि त्यांना चिन्हाचे वाटप याबाबतच्या तरतुदी नव्हत्या.मात्र हळहळु आयोगाने पुढाकार घेऊन यांची अंमलबजावनी करण्यास सुरुवात केली

3. **मतदानासाठी यंत्रांचा वापरः**

1970 च्या उत्तरार्धातनिवडणूक आयोगाने मतदान यांत्राव्दारे मतदान घेता येईल का, याच्या शक्यता अजमावण्यास सुरूवात केली आणिसन 2000 नंतर झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणूकांपासून मतदानासाठी मतदान यंत्रांचा वापर करण्यात येऊ लागला.

4. **राजकिय निरीक्षक नेमण्याबाबतः**

राजकिय पक्षांचाही यामध्ये सहभाग असावा आणि मतदान केंद्र आधिकारी तटस्थपणे काम करतो की नाहीहेत्यांना पाहता यावे यासाठी प्रत्येक मान्यता प्राप्त पक्षाला मतदान केंद्र पातळीवर स्वःताचा प्रतिनधी म्हणजेच राजकिय निरीक्षक नेमता येऊ शकतो.

5. **ओळखपत्रे देण्याबाबतः**

बनावट मतदानाला आळा घालण्यासाठी आयोगाने 1993 मध्ये मतदारांना निवडणुकछायाचित्र ओळखपत्रे देण्यास सुरुवात केली.

6. **NOTA चा पर्यायः**

मतदारांला निवडणूकीला उभे राहीलेले कोणतेच उमेदवार जर योग्य वाटत नसेल तर तोत्यासाठी मतदान यंत्रावरील 'नोटा' म्हणजेच 'यापैकी कोणीही नाही'(NOTA-NONE OF THE ABOVE) या पर्याचा वापर करुशकतो.

7. **इतरसुधारणाः**

निवडणूक प्रकियेवर देखरेख ठेवण्यासाठी केंद्रीय निवडणूकनिरीक्षक नेमण्याची पध्दत आयोगाने 1990 पासुन सुरु केली. याशिवाय केंद्रीय पोलिस दल तैनात करणे,गुन्हेगारी पार्श्वभुमी असलेल्या व्यक्तींना निवडणूक लढवण्यास आयोगाने बंदीघातलीआहेआणिसंवेदनशील मतदान केंद्रांवर सुक्ष्म निरीक्षकांची नेमणुक करणे, याही उपाय योजना आयोगाने अंमलात आणल्या.

**भारतीय निवडणुक प्रक्रियेमध्ये काळानुसार कोणकोणत्या सुधारणाव्हावेत :**

1. सरकारणेनिवडणुकखर्चाची जबाबदारी उचलली तरनिवडणुक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांना समान पातळी वरुन मतदारांपुढे जाता येईल; तसेचनिवडणुवितील अनेक गैरप्रकारांना आळाघालता येईल.
2. राजकिय पक्षांना मिळणाऱ्या देणग्या, त्यांच्या उत्पन्नांचे इतर मार्ग आणि त्यांच्याकडुन होणाराखर्च या सर्वगोष्टींचाहिशेब राजकिय पक्षांनी ठेवावा आणि त्यांच्या हिशेबाचे लेखापरिक्षण करण्याची सक्ती करावी.
3. अपक्ष उमेदवारांच्या मोठ्या संख्येमुळे निवडणूक प्रक्रियेतील गुंतागुंतविनाकारणवाढते. कारण अपक्ष उमेदवारांपैकी काही मोजके अपवा वगळताइतर उमेदवार मतदारांच्या दृष्टीने दखलपात्रही नसतात.

ISSN : 2348-7143
February 2018

4. मतदारांनी उमेदवारांना मतदान करण्याऐवजी थेट राजकिय पक्षांनाच मतदान करावे आणि राजकिय पक्षांना जितकी मते मिळतील त्या प्रमाणात त्याला कायदे मंडळात जागा देण्यात याव्यात.
5. नागरी भागातील मतदारांची असलेली उदासीनताही एक गंभीर बाब असल्याने मतदान सक्ती करावे असे मानले जाते.पण सक्ती आणिलोकशाही एकमेकांबरोबर जाऊ शकत नाहीत, म्हणुनच मतदानामध्ये मतदारांचा सहभाग वाढावा असेवाटत असेल तर त्यासाठी मतदारांचे शिक्षणहोणे आवश्यक आहे.
6. काही वर्तमानपत्रे व दुरदर्शन वाहिन्या विशीष्ट राजकिय पक्षांच्या बाजुनेनिवडणुकिच्या काळातवातावरण निर्मीती करण्यासाठी काल्पनिक अंदाज व्यक्त करीत असतात. त्यामुळे मतदारांवर गैर स्वरुपाचा प्रभाव पडत असतो. ही बाबलक्षातघेऊन निवडणूकी पुर्वी व्यक्त करण्यात येणाऱ्या ✕एक्झिट पोल✕वर बंदीघालावी.
7. निवडणूकसुधारणांचा एक भाग म्हणुन उमेदवाराला परत बोलवण्याचा हक्कअसावा. थोडक्यात निवडणूकितनिवडूणआलेल्या खासदारकिंवाआमदारांना त्यांचे पद सोडुण परत बोलवण्याची ही प्रकिया आहे.

**निष्कर्ष:**

1. भारतासारख्या लोकसंख्येने मोठ्या असलेल्या वविविधताअसलेला देशातनिवडणूकआयोग शांततेतआणि मुक्त वातावरणातनिवडणूका पार पाडतेहे एक कौतुकास्पद काम आहे.
2. संसदेने पुढाकार घेऊन केलेल्या निवडणूक प्रक्रियेतील सुधारणा महत्त्वाच्या आहेत. कारणयामुळे निवडणूकआयोगाला आधिक बळकटी मिळालीआहे.
3. निवडणूकप्राक्रियेच्या सुधारणांमध्ये न्यायालयांनी घेतलेल्या भुमिकांमुळे निवडणूका पादर्शक होण्यासाठी खुप मदत झाली
4. निवडणूकआयोगाने पुढाकार घेऊन निवडणूक प्रक्रियेत केलेल्या सुधारणांमुळे भारतीय लोकशशाही बळकट होण्यास मदत झाली.

**सारांश:.**

लोकांच्या निवडणूक प्रकियेतील सहभागावरच राजकिय निवडणूकांचे यशापयश अवलंबुनअसते.जगभरातील राष्ट्रांपैकी अनेकराष्ट्रांत लोकसहभागाविना डबघाईला गेलेल्या लोकशाही यंत्रणांची उदाहणेदिसतील.त्यांच्या तुलनेनेभारत आदर्शराष्ट्र म्हणुन प्रत्येक वर्षागणिकविकास पावत आहे.याचे बहुतांश श्रेय भारतीय निवडणुकआयोगाला जाते, हे मात्र खरे.

**संदर्भ:**

1. कुरेशी.एस.वाय. (2014) 'गेल्या काही वर्षांत निवडणुकांमध्ये झालेल्या सुधारणा' योजना मासिक, जुलै
2. पाटील.ब्ही.बी. (2012) 'भारतीय राज्यघटना आणि राजकिय व्यवहार' केसागर पब्लिकेशन्स,पुणे
3. भोळे.भा.ल. (2010). " भारतीय गणराज्याचे शासन आणिराजकारण"निराली प्रकाशन, पूणे

ISSN : 2348-7143
February 2018

# मतदान वर्तनावर प्रभाव पाडणारे घटक

**प्रा ज्ञानोबा त्रिंबक ढगे**
राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन विभाग प्रमुख
कर्मवीर काकासाहेब वाघ कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,
पिंपळगाव (ब) ता.निफाड जि.नाशिक
मो ९६३७७४७८९६
इमेल :- ddnyanesht@gmail.com

लोकशाहीच्या व्याखेतच लोकांचा सहभाग गृहीत धरलेला आहे. किंबहुना जितका लोकांचा सहभाग जास्त तितकी लोकशाही अधिक प्रगत असते असे मानले जाते. प्राचीन ग्रीक मधील अथेन्स सारख्या नगर राज्यात किवां प्राचीन भारतातील गणराज्यात सर्वच लोक कायदे करण्यात किंवा प्रशासकीय निर्णय घेण्यात भाग घेत असत. परंतु आधुनिक राज्यात लोकसंख्या व भौगोलिक विस्तारामुळे हे शक्य नाही. म्हणून प्रातिनिधिक लोकशाही पुढे आली. अशा प्रातिनिधिक लोकशाहीला प्रत्यक्ष व्यवहारात आणण्याचे कार्य मतदान प्रक्रियेमुळे घडून येते. प्रातिनिधिकलोकशाही मध्ये लोकांनी ठराविक कालावधीसाठी प्रतिनिधि निवडावेत व त्या प्रतिनिधींनी राज्य चालवावे, शासन करावे असे अपेक्षित असते. लोकप्रतिनिधी बनण्यासाठी अनेक सत्ताशोधक / सत्ताकांक्षी इच्छुक असतात. अशा सत्ताकांक्षी स्पर्धकातून आपला प्रतिनिधी निवडण्यासाठी लोक मतदान करतात. या निवडणुकीच्या प्रकियेत लोकांना जो मतदानाचा अधिकार असतो तो सहभागाच्या दृष्टीने महत्त्वाचा असतो.राजकीय सहभागापैकी मतदान हा एक असा प्रकार आहे कि ज्यात सर्वांना सहभागी होण्यासाठी संधी उपलब्ध असते.

निवडणुका हा भारतीय राजकीय प्रक्रीयेतील महत्त्वाचा टप्पा आहे. राजकीय सत्ता परिवर्तन शांततामय आणि रचनात्मक मार्गांनी घडून आणण्यासाठी भारतीय लोकशाही व्यवस्थेत निवडणुकांना महत्त्व दिले जाते.

भारतीय संविधानाने सार्वभौम प्रौढ माताधिकाराचे सूत्र वापरले. प्रत्येक भारतीयांना वय वर्ष १८ पूर्ण केले कि त्याला मतदानाचे अधिकार दिलेला आहे.लोकशाहीत निवडणुका निरपेक्ष आणि निपक्षपणे होण्यासाठी निर्वाचन आयोग काम करत असते.भारतातील सर्व निवडणुकानचे संचालन करण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची आहे.लोकसभा आणि राज्याच्या विधानसभांच्या निवडणुका हे भारतीय निर्वाचन आयोग घेते तर राज्य निवडणूक आयोग स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेते.याशिवाय प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा निर्वाचन अधिकारी काम करतात. प्रत्यक्ष मतदानाच्या दिवसी मतदान केंद्रप्रमुख(केंद्राध्यक्ष),मतदान अधिकार महत्वाची भूमिका बजावीत असतात.

## मतदान वर्तन

भारतीय लोकशाहीत निवडणुका आणि त्यांच्या निकालावर प्रभाव पडणारा सर्वात महत्वाचा घटक म्हणजे मतदारांचे वर्तन होय. त्याच्या निवडणूक विषयी वर्तनावर निवडणुकांचे निकाल अवलंबून असतात.

## मतदान वर्तनावर प्रभाव पाडणारे घटक

### राजकीय पक्षांची विचारसरणी :

राजकीय पक्ष कोणती ना कोणती विचारसरणी घेऊन जनतेमध्ये जात असतात.त्यानुसार निवडणुका लढविणे, जाहीरनामे प्रसिद्ध करणे.सत्तेची अंमलबजावणी करणे हि कामे करीत असतात. भारतात काही मतदार वर्ग हा विशिष्ट विचारसरणीशी संबंधित राहून मतदान करताना दिसतो.

**व्यक्तिमत्व:**

करिष्माई व्यक्तिमत्व हे नेहमीच आकर्षणाचे केंद्रिबन्दु राहिलेले आहे. भारतीय राजकारणात देखील हि बाब प्रकर्षाने जाणवत आली आहे. स्थानिक राजकारणा पासून ते राष्ट्रीय राजकारणापर्यंत व्यक्तीमहात्म्य प्रभावी राहिले आहे.त्यामुळे लोक विशिष्ट व्यक्तीद्वारे प्रभावित होऊन त्यास मतदान करतात.

**अर्थशक्ती :**

पैसा हा देखील घटक मतदारांच्या वर्तनात बदल घडून अनण्याच्या प्रक्रियेत महत्वाची भूमिका बजावताना दिसतो.मतदान प्रक्रियेत उमेदवार पैस्याचे आमिष मतदारांना दाखवितात.त्यातून सुद्धा मतदान वर्तन बदलताना दिसते.

**जात:**

जातीयता हा घटक मतदारांच्या वर्तनावर मोठ्या प्रमाणावर प्रभाव पडताना दिसतो.राजकीय पक्ष तिकीट वाटप करताना जातीचे गणित मांडत असतात. त्यातून मतदार सुद्धा जातिच्या हित सामन्धाने मतदान करीत असतात. भारतात प्रत्येक राज्यात काही जाती राजकारणात प्रभावी राहत आल्या आहेत.त्याचा परिणाम मतदान वर्तनावर होत असतो.

**धर्म :**

भारत हा धर्मनिरपेक्ष देश जरी असला तरी निवडणुकी दरम्यान धार्मिकतेच्या आधारावर मत मागण्याची प्रवृत्ती मतदारांना प्रभावित करीत आलेली आहे. मतदार आपले धार्मिक हितसंबंध जोपासण्यासाठी आपल्या धर्माच्या व्यक्तिस मतदान करीत असतात. एखाद्या मतदार संघात दोन विभिन धर्माचे उमेदवार उभे असतील तर निवडणुकीत धर्म हा घटक प्रभावी ठरतो.

RESEARCH JOURNEY

**प्रादेशिकता:**

१९९० नंतर भारतीय राजकारणात प्रादेशिक पक्षांचे वर्चस्व वाढताना दिसत आहे. याचे कारण प्रादेशिक पक्ष मतदारांच्या प्रादेशिक भावनेला हात घालतात. प्रादेशिक अस्मिता विविध अंगाने जागी करून मतदारांना प्रभावित करतात.अलीकडील काळात तर आघाड्यंचे सरकार अस्तित्वात येत असल्याने आणि यात प्रादेशिक पक्षाचे भूमिका महत्वाची राहिल्याने याचा निच्छितच मतदारांच्या वर्तनावर प्रभाव पडतो.

**मतदारांचे हितसंबंध:**

मतदारंच्या आशा, अपेक्षा, हितसंबंध यांचा देखील त्यांच्या मतदार वर्तनावर परिणाम घडून येत असतो.मतदात्यांच्या सरकारकडून खूप अपेक्षा असतात.त्यामुळे स्त्ताधारी पक्ष आपल्या इच्च्छा अपेक्षांची कितपत पूर्तता करोत याचाही विचार मतदार करत असतात.

**निवडणुकीतील जाहीरनामे :**

निवडणुकीतील राजकीय पक्षांनी जाहीर केलेले जाहीरनामे देखील मतदारान आकर्षित करण्याचे काम करीत असतात.प्रभावी आणि लोकांना भावणारे जाहिरनामे असतील तर लोक मतदान करताना याचा विचार करून मतदान करीत असतात. जाहिरनाम्यात मतदाराना दिलेले आश्वासने हे मतदान प्रवर्तित करण्यास कारणीभूत ठरतात.

**सोशल मिडिया :**

मागील लोकसभा निवडणुकीत सोशल मिडीयाचा ,नवमाध्यमांचा वापर अत्यंत महत्वाचा ठरला आणि तंत्रज्ञानातील क्रांतीचा राजीकीय प्रभाव मतदार वर्तनावर होताना दिसला. राजकीय नेते, राजकीय पक्ष सरळ जनते पर्यंत जातात. आपले मत मांडतात त्यामुळे हा मार्ग एक प्रभावी संचार मध्यम म्हणून पुढे आले आहे

**शिक्षण :**

ग्रामीण आणि दुर्गम-मागास भागात साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याने त्यांच्यावर परंपरा, पारंपारिक नेतृत्वाचा प्रभाव असतो.त्यातून ते मतदान करताना स्वतन्त्रपणे मतदान करताना दिसत नाही.

**प्रसार आणि प्रचार माध्यमे :-**

प्रसार आणि प्रचार माध्यमे हि लोकजागृतीचे महत्वाचे साधन आहेत.इलेक्ट्रोनिक मिडिया,वृत्तपत्रे यातून सरकार च्या कामगिरी वर मोठ्या प्रमाणात चिकित्सा केली जाते,यातून अपोआप मतदारांचा कल बदलत असतो,निवडणूक प्रचार दरम्यान होण्यार्य चर्चा, कॅवरेज, संपादकीय लेख हे मतदारांना प्रभावित करीत असतात. या शिवाय काही माध्यमे विशिष्ट पक्षाशी बांधील राहून काम करतात त्याचा सुधा मतदार वर्तनावर प्रभाव पडताना दिसतो

**स्थानिक प्रश्न :**

गेल्या काही वर्षापासून निवडणुकीत केवळ राष्ट्रीय मुद्देच चर्चिले जात नाहीत तर त्या सोबत त्या त्या मतदार संघातील प्रश्न निवडणुकीत मोठ्या प्रमाणात प्रभावित कर्तन दिसतात.अन्न,वस्त्र,निवारा,चांगले आरोग्य,वीज,शुद्ध पाणी. सुदृढ पर्यावरण, हे व्यक्तीचे मुलभूत गरजा आहेत. म्हणून निवडणुकीत असे रोजच्या जगण्याचे प्रश्न सुद्धा मतदाराना प्रभावित करून जातात. स्थानिक प्रश्नाशी हात घालणारा उमेदवार मतदारांना भावात असतो .त्यामुळे अश्या उमेदवाराना जनता मतदान करीत असते.

**जनजागृती :**

मतदाना विषयीची जनजागृती हि मतदाराना मतदान केंद्राकडे आकर्षित करीत असते. त्यातून लोकांची जनजागृती हि राजकीय परिपक्वतेकडे घेऊन जाणारि असल्याने त्यातून सुधा मोठ्या प्रमाणात मतदार वर्तनावर प्रभाव पडतो

**प्रतिनिधींची कामगिरी** :

सध्याच्या निवडणुकीत उमेदवाराचे मूल्यमापन मतदार त्याच्या कामगिरीवर करतात. पक्षनिष्ठा, सदश्यत्व,ह्या गोष्टी तुलनेने कमी महत्वाच्या ठरतात. सत्तेत असणारा पक्ष पुढच्या निवडणुकीत पराभूत होणे,आधी जिंकलेले उमेदवार परत त्या मतदार संघातून परभूत होणे याला सर्वसाधारणपणे पक्ष 'पदिस्थत-विरोधी भावना' म्हणतात. यालाच कामगिरीच्या बाजूने वा कामगिरी करण्यामागील अपयशामुळे विरोधी पडलेले मत असे म्हणता येईल. याचाच अर्थ मतदार पूर्वीच्या उमेदवाराच्या कामगिरीकडे बगून मतदान करीत असतात. सत्ता कोण एका व्यक्तीकडे किवा पक्षाकडे नाशून खर्या अर्थाने सर्वाधिकार लोकांना असणे आणि त्यांनी निवडलेल्या प्रतिनिधीनी राज्यकारभार पाहणे यालाच खरी लोकशाही म्हणतात.मतदार प्रतिनिधींच्या गुणावगुणांची चर्चा करतात,त्याच्या कार्याचे मूल्यमापन करतात.

ISSN : 2348-7143
February 2018

**राजकीय पक्षाबाबताचे वाढते असमाधान:**

मतदाराना त्यांची काळजी,परवा करणारे राजकीय पक्ष,प्रतिनिधी आवडतात.त्यातून मतदान वर्तन घडत जाते.लोक राजकीय पक्ष,लोकप्रतिनिधी यांच्या बाबत असमाधानी आहेत.जनतेच्या अपेक्षा बहुतेक वेळा पूर्ण करण्यासाठी राजकीय पक्ष आणि लोकप्रतिनिधी यांची दमछाक होते.मग निवडणुकीत लोक मत परिवर्तीत करताना दिसतात.

**इतर :**

वरील मुद्याशिवाय मतदान खर्च,उमेदवाराचे समाजातील स्थान,दडपशाही,भीती,गुंडप्रवृत्ती,याचा प्रभाव सुधा मतदारांवर पडत असतो. निवडणूक स्थानीक आहे कि लोकसभा-विधानसभा आहे यावर देखील मतदारांचा काळ ठरलेला असतो, मतदार हा समाजातील विशिष्ट वर्गातून आला असल्याने त्याचा व्यवसाय,याबात सरकारचे धोरण,राजकीय पक्षाने घेतलेली भूमिका हि देखील मतदार वर्तन बदलण्यास कारणीभूत ठरताना दिसते. मतदान प्रक्रीये दरम्यान मतदान केंद्राची सुविधा, मतदान केंद्रावरील वातावरण हे घटक देखील मोठ्या प्रमाणात मतदारंवर्ती प्रत्यक्ष –अप्रत्यक्ष प्रभाव पडत असतात.

धार्मिक वातावरण, सांस्कृतिक घटक,सामाजिक घटक, राजकारणात संबंधी मतदारांचा कल (सत्ताकांशी-सत्ताशोधक कि प्राथमिक अवस्था) हा त्याच्या मतदान प्रक्रियेला प्रभावित करीत आलेला आहे. मतदारांची मानसिकता, राजकीय पर्यावरण,जनतेची राजकारणाप्रतीची उदासीनता, निवडणूक पद्धत,आर्थिक आमिषे, सरकार-राजकीय पक्ष यांच्या धोरणातील विसंगती, संसदेतील व सभागृहातील गोंधळ,ह्या सुद्धा बाबी मतदारांवर प्रभाव पाडीत असतात.

कुटुंब, मित्रपरिवार, दबावगट, सामाजिक बंधने, परंपरा, हे अनोपचारीक घटक प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मतदानवर्तनावर प्रभाव पडताना दिसतात.

RESEARCH JOURNEY

महागाई, भ्रष्टाचार, स्थिरता, गरिबी, बेरोजगारी, सुशासन, भावनिक मुद्दे, शिक्षणिक प्रश्न, मतदारांच्या अपेक्षा याचा देखील प्रभाव मतदान वर्तनावरती पडतो आहे.वय आणि शिक्षण हे देखील मतदान वर्त्नावर्ती प्रभाव पाडत आलेले आहेत. डॉ.ओ.पी.गोयल यांनी उमेदवार निदेश ण, समस्या निदेशन, पक्षीय तादात्म्य,पैशाची भूमिका, जाती व समुदाय या स्वरुपात मतदार वर्तनाची वैशिष्ट्य सांगितली आहेत.

भारतात लोकशाही ही अधिक परिपक्वतेकडे वाटचाल करीत चालेली असली तरी मतदारनच्या लोकप्रतिनिध कडून अपेक्षा वाढत चालल्या आहेत, याशिवाय भारतातील मुलभूत प्रश्न अजूनही सुटलेले नाहीत. समाज हा असमाधानी आहे, गरजू आहे. त्याच्या समस्या अजून मिटत नाहीत त्यमुळे मोठ्या प्रमाणात निवडणुकींचे निकाल धक्कादायक लागताना दिसतात. खंडप्राय भारतात जात,वर्ग,धर्म, हे लोकशाहीतील मुलभूत अडचण ठरत चालले आहेत. महानगरात मोठ्या प्रमाणात राजकारणाचे गुन्हेगारीकरण होत चालले आहे. याचा नकरात्मक परिणाम मतदान वर्तुनकीवर होताना दिसतो.

**संदर्भ:**

1. Indian Government and Politics: Hoveyda Abas,Ranjay Kumar,Mohmad Aftab Aslam Dorling Kiendersky pvt.Ltd,Noida, India,Edition 2011.
2. Democracy in India : Ed. Niraja Gopal, Oxford University Press,New Delhi.
3. Politics In India, Ed. Sudipta Kaviraj, Oxford University Press,New Delhi.

4. भारतीय लोकशाही :अर्थ आणि व्यवहार , संपा:राजेंद्र व्होरा,सुहास पळसीकर, डायमंड पब्लिकेशन,पुणे प्रथम आवृत्ती २०१०.
5. आधुनिक राजकीय विश्लेषण , गर्दे दि का आणि बाचल वि मा, कॉन्टीनेन्टल प्रकाशन.
6. राजकीय समाजशास्त्र: इनामदार ना र आणि पुराणिक
7. जनतेची राजकीय उदासीनता: संपा डॉ ए पी पाटील, डी एस गोडगे आणि डी टी ढगे साधना पब्लिकेशन,परभणी
8. लोकराज्य मासिक अंक नोव्हेंबर २०१६

ISSN : 2348-7143
February 2018

# निवडणुका आणि मतदार वर्तन.

**प्रा.एस.एस.कावळे व प्रा.डॉ.व्ही.डी.कापडी**
राज्यशास्त्र विभाग
एस.व्ही.के.टी.कला विज्ञान आणि वाणिज्य महा.
देवळाली कॅम्प नासिक

**प्रस्तावना :-**

जगातील अनेक देशांमध्ये विविध प्रकारच्या राजकीय व्यवस्था आज अस्तित्वात आहे. या सर्वच व्यवस्थांच्या सरंचनेमुळे तेथील राजकिय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक वातावरणावर त्याचा एक वेगळा प्रभाव निर्माण झाला आहे. तेथील समाजाने ही व्यवस्था पद्धती आपल्याशा केलेल्या आहेत. परंतु अशा व्यवस्था चिरकाल टिकण्यासाठी आणि राष्ट्राची व्यवस्था पद्धत सदोषपणे चालण्यासाठी त्यांचे अस्तित्व अबाधित ठेवणे गरजेचे आहे. सर्वकक्ष अथवा साम्यवादी राष्ट्रांमध्ये. लोकांच्या भावना, इच्छा किंवा त्यांच्या विचारांचा आदर केला जातोच असे नाही. कारण या व्यवस्था विशिष्ट विचार प्रणाली मानणाऱ्या काही व्यक्तिंच्या मनोभुमिकेतुन तयार झाल्यात. राष्ट्र सर्व प्रामुख्याने मानणाऱ्या या व्यवस्था जनतेच्या हक्कांपेक्षा राष्ट्र हितालाच अधिक महत्व देणाऱ्या ठरल्या लोकांच्या इच्छा, अकांक्षा, अपेक्षा राष्ट्र हिताच्या आड दाबल्या गेल्यात या उलट लोकशाही देशांमध्ये राष्ट्रहिताबरोबरच लोककल्याणाला ही प्राधान्य दिले गेले. म्हणुनच या देशांमध्ये ही व्यवस्था टिकुण राहील्याचेही दिसते. राजकिय सत्तेवरचा असंतोष निर्माण झाल्यास सत्तेत परिवर्तन घडवुन आणण्याचा मार्ग ही या व्यवस्थेने लोकांना दिला निवडणुकांच्या माध्यमातुन हे परिवर्तन घडुन येते. भारतासारख्या अधिक लोकसंख्या असणाऱ्या देशामध्ये लोकशाही व्यवस्था टिकू शकली याचे महत्वाचे कारण म्हणजे भारतीय जनतेकडे असलेले निवडणुकीचे साधन दर पाच वर्षांनी येथील जनता आपल्याला हवी असणारी सत्ता आणु शकते. हे सत्तांतरण कायद्याच्या व शांततेच्या मार्गानेच पार पडते लोकशाहीत केवळ मतदानाचा अधिकार देऊन चालत नाही तर या निवडणुका पारदर्शक व गुणवत्तापुर्ण असणेही आवश्यक ठरते तरच सामान्य जनतेचा या निवणुकांवर विश्वास निर्माण होतो.

भारतासारख्या भौगोलिक दृष्ट्या विस्तृत आणि लोकसंख्येने अधिक असलेल्या देशात निवडणुकांचे महत्व फार अधिक जाणवते. येथील लोकशाही व्यवस्था हीच मुळः हा आपले अस्तित्व आजपर्यंत टिकु शकली हेच एक मोठे आश्चर्य आहे. कारण विविध धर्म, जाती, संस्कृती भाषा असणाऱ्या या देशात लोकशाही व्यवस्था किती काळ तग धरुण राहु शकते अशी शंका विन्सटन चर्चिल सारख्या नेत्यांनाही पडली परंतु भारतासारख्या देशात आजपर्यंतच्या देशातील निवडणुका पार पडल्या त्या तेवढ्याच गुणवत्ता पुर्ण व पारदर्श होत्या मतदारांनीही आजपर्यंत मतदान करतांना राष्ट्रहीत व समाजहित जोपासणाऱ्या राजकिय पक्षांना सत्ता दिल्याचे दिसते. परंतु आजच्या काळात मतदान करणाऱ्या मतदारांवर अनेक गोष्टींचा प्रभाव पडल्याने त्यांच्या मतदार वर्तनात मोठा बदल घडून आल्याचे दिसते. येथील मतदार बऱ्याच अशी मतदान करतांना कोणता राजकिय पक्ष आपले हितसबंध जोपासु शकेल त्यालाच तो प्राधान्य देतांना दिसतो.

**उद्दीष्टे :-**

१. निवडणुका आणि मतदारांचे वर्तन यांचा अभ्यास करणे.
२. सद्यास्थितीतील राजकारणाचा आढावा घेणे.
३. भारतातील विविध घटकांमुळे मतदारांच्या होणाऱ्या वर्तनाचा अभ्यास करणे.
४. मतदाराच्या वर्तनामुळे सामाजिक व राजकिय प्रक्रियेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

ISSN : 2348-7143
February 2018

**अभ्यास पद्धती :-**

निवडणुका आणि मतदार वर्तनाचा अभ्यास करण्यासाठी ऐतिहासिक पद्धतीचा वापर केला जाणार आहे. त्यासाठी विविध पुस्तके व संदर्भ ग्रंथाचा वापर करणार आहोत.

**भारतीय मतदार वर्तनावर प्रभाव पाडणारे घटक :-**

आज भारतीय समाजात अनेक घटक आहे कि, ज्याद्वारे मतदार वर्तन निश्चित होत असते. यातिल काही घटक पुढील प्रमाणे सांगता येतील.

**१) धार्मिकता :-**

भारतासारख्या देशात मतदार वर्तनावर सर्वात प्रभाव पाडणारा घटक कोणता असेल तर तो म्हणजे "धर्म" कार्लमार्क्ससारखा विचारवंत धर्माला अफुची गोळी असे म्हणतो. कारण जनतेची मानसीकता बदलण्याची क्षमता केवळ धर्म या घटकातच आहे. हे येथील राजकिय पक्ष व राजकिय नेत्यांना हे माहित असल्यानेच धर्म हा घटक मतदारांसमोर प्रभाविपणे मांडुण त्यांची मते प्राप्त करतांना दिसतात. उदा. भाजपा सारखा पक्ष हिंदु धर्माचे भांडवल मांडुन मते मिळवितो तर पंजाबमध्ये अकाली दल, शिख धर्मियांवर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करतो. नॅशनल कॉन्फरन्स, ए.आई.एम.आई.एम सारखे पक्ष मुस्लीमांची मते मिळवितांना दिसतात.

**२) जातियता :-**

भारतीय मतदाराच्या वर्तनावर प्रभाव पाडणारा दुसरा महत्वाचा घटक म्हणजे जातियता आपल्या जातीच्या उमेद्वाराला निवडुण आणण्याची प्रवृत्ती मतदारांमध्ये मोठ्या प्रमाणावर आढळते. आपल्या जातीच्या उमेद्वाराकडून आपले हितसबंध सुरक्षित राहतीलच पण आपल्या जातीला राजकिय व आर्थिक फायदा होऊ शकेल अशा प्रकारची मानसिकता भारतीय लोकांमध्ये दिसते. यातुनच लोक आपल्याच जातीच्या उमेद्वाराला निवडुण मतदानाद्वारे निवडुण आणण्याचा प्रयत्न करतात. ज्या राज्यात जी जात संख्येने अधिक आहे. त्या प्रदेशात त्याच जातीचे राजकिय वर्चस्व प्रस्तापित झाल्याचे दिसते उदा. महाराष्ट्रात "मराठा" समाजाचे राजकारणात असणारे वर्चस्व.

RESEARCH JOURNEY

**३) प्रादेशिकता :-**

विशिष्ट भागात राहाणाऱ्या लोकांची भाषा, संस्कृती, खान-पान यात बऱ्याच वेळा समानता असते. त्याचा परिणाम म्हणजे या लोकांमध्ये लवकर एकात्मता निर्माण होत असते. एका प्रदेशात असल्याने त्या प्रदेशाबाबतच्या समस्या, प्रश्न हे तेथील लोकांना चांगल्या प्रकारे माहीत असतात. त्यामुळे येथील लोक आपल्याच प्रदेशातील उमेव्दाराला मतदान करतांना दिसतात प्रादेशिक अस्मिता जोपासण्याच्या या प्रवृत्तीतुनच सर्वच घटकराज्यांमध्ये प्रादेशिक पक्षांची निर्मिती झाली. उदा. महाराष्ट्रात शिवसेना तसेच इतर राज्यांमध्ये तेलगु देसम, पार्टी, डि.एम.के. झारखंड मुक्ती मोर्चा आसामगण परिषद हे सर्वच राजकिय पक्ष प्रादेशिक अस्मितेतुन निर्माण झालेले आहेत.

**४) व्यावसायिक हितसबंध :-**

मुलभुत गरजा पुर्ण करण्याच्या इच्छेतुनच प्रत्येक व्यक्ती आपल्या बौद्धीक व शारिरिक कुवतीनुसार व्यवसाय निवडत असतो. या व्यवसायाशीच त्याचे हितसंबंध जोडलेले असतात. जो राजकिय पक्ष त्याचे हे व्यावसायिक हित सबंध जोपासतो त्याच पक्षाला हे लोक मतदान करताना दिसतात. उदा. प्रथम पासुनच भारतातील मजुर, शेतकरी हे कॉग्रेसपक्षाला मतदान करताना दिसतात. तर उद्योग व्यावसायिक आपले हितसबंध जोपासणाऱ्या भाजप या पक्षाला मतदान करतात.

**५) राजकिय पक्षांचे जाहीरनामे :-**

सर्वच राजकिय पक्ष मतदानांच्या अगोदर आपल्या पक्षांमार्फत जाहीरनामे प्रसिद्ध करतात. या जाहीरनाम्याव्दारे लोकांना वेगवेगळी आश्र्वासने देऊन त्यांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला जातो.मतदान आपल्याला दिलेल्या आश्र्वासनांची परिपुर्ती या पक्षांकडून होऊ शकेल असा विश्वास ठेवून मतदान करतात.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 42 : भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि राजकारण
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

**६) पैशाचा राजकारणात होणारा वापर :-**

जगातिल सर्वच लोकशाही देशांमध्ये निवडणुकांच्या काळात पैशांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जाता. मतदारांना पैसे देऊन आपल्या बाजुने मतदान करुन घेतले जाते. मतदान करतानाही कोणता उमेद्वार अधिक पैसा देऊ शकेल या गोष्टीचा विचार केला जातो. त्यामुळे पैसे घेऊन मतदान करण्याची प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढीव लागली आहे. अशा वेळी इतर सर्व घटक दुय्यम ठरतात.

**७) नेतृत्वाचा प्रभाव :-**

राजकारणात सक्रिय असणारी व्यक्ती तिच्या नेतृत्व क्षमतेमुळेही प्रसिद्ध होत असते. अशा वेळी त्याच्य नेतृत्वाचा प्रभाव मतदारांवर पडत असतो. उदा. १९९० च्या दशकात स्वर्गीय राजीव गांधी यांच्याकडे तरुण वर्ग मोठ्या प्रमाणत आकर्षित झाला तर सध्या पंतप्रधान नरेंद्र मोंदीचा मतदारावर मोठा प्रभाव आढळतो.

**८) घराणेशाहीचा प्रभाव :-**

बऱ्याच लोकशाहीच नव्हे तर सर्वच राजकिय व्यवस्था मध्ये मतदारांवर घराणेशाहीचा प्रभाव आढळतो या प्रभावातुनच मतदार विशिष्ट लोकांना मतदान करतात. भारतातील सर्वसामान्य जनतेवर नेहमीपासूनच नेहरु, गांधी घराण्यांचा प्रभाव आढळतो यातुन आजपर्यंत भारतातील राजकारणावर त्यांचा प्रभाव तेथील राजकिय प्रक्रियांवर असलेला जाणवतो.

**९) स्थानिक पक्षांचा व उमेद्वावाराचा प्रभाव :-**

बऱ्याच अंशी मतदार वर्तनावर स्थानिक पक्षाचा अथवा स्थानिक उमेद्वाराचा प्रभाव पडत असतो. याचे महत्वाचे कारण म्हणजे आपले स्थानिक प्रश्न समस्या तेथील स्थानिक पक्षाला उमद्वारालाच अधिक माहीत असतात. त्यामुळे त्यांच्या माध्यमातुन हे प्रश्न सुटु शकतील असा विश्वास मतदारांना असल्याने मतदार अशा स्थानिक पक्षांना किंवा उमेद्वाराला मते देतांना दिसतात.

**१०) विविध प्रसारणमाध्यमे व आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभाव :-**

विविध प्रसारण माध्यमे आणि विविध सोशल नेटवर्किंगच्या माध्यमातुन अनेक वेळा जनतेच्या मनावर विशिष्ट प्रकारच्या राजकिय पक्षाच्या विचारांचा प्रभाव निर्माण केला जातो. आजच्या काळात तरुण वर्गामध्ये सोशल नेटवर्किगचे जाळे मोठ्या प्रमाणात आढळते त्यामुळे राजकिय पक्ष देखिल या माध्यमातुन आपला प्रभाव मतदारांवर पाडण्याचा प्रयत्न करतात. उदा. २०१४ च्या लोकसभा निवडणुकित भाजपासारख्या राजकिय पक्षाने सोशल नेटवर्किगच्या माध्यमातुन तरुण मतदारांना आपल्याकडे आकर्षित केले.

**११) राजकिय पक्षांच्या विचार प्रणालीचा प्रभाव :-**

कोणताही राजकिय पक्ष अथवा संघटना ही विशिष्ट अशा विचारप्रणालीने बनलेली असते. या विचार प्रणालीचा प्रभाव मतदारांवर होत असतो. भारतातील कॉग्रेस या पक्षाने समाजवादी धर्मनिरपेक्ष अशि विचारप्रणाली स्विकारली तर भारतातील कम्युनिस्ट पक्षांनी समाजवादी विचार प्रणालीचा स्विकार केला या विचार धारेच्या प्रभावातुन लोक विशिष्ट पक्षाला मतदान करतात.

**निष्कर्ष :-**

वरिल सर्व घटकांचा परिणाम मतदाराच्या वर्तनावर होत असल्याने त्याचा राजकारणावर परिणामी लोकशाहीवर चांगला वाईट परिणाम होतांना दिसतो तो पुढील प्रमाणे सांगता येऊ शकेल.

१. वरिल सर्व घटकांच्या प्रभावातुन मतदान होत असल्याने बऱ्याच वेळा एकाच राजकिय पक्षाला बहुमतात सत्ता मिळविणे अवघड जाते. त्यातुनच आघाडिचे राजकारण सुरु होते.
२. समाज विविध घटकांमुळे विभागला जात असल्याने सामाजिक एकात्मतेला धोका निर्माण होतो.

ISSN : 2348-7143
February 2018

३. देशातील बहुमताने कमी असलेल्या घटकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढीस लागते यातुनच वेगळ्या प्रदेशाची मागणि समोर येते. उदा. शिख धर्मियांना केलेली खलिस्तानची मागणी.

४. सामाजिक द्वेश भावनेतुन व्यवस्थे विरुद्ध असंतोष निर्माण होतो.

५. विविध घटकांच्या प्रभावातुन जे राजकिय पक्ष निर्माण होतात त्यामुळे अल्पसंख्याक समुदायांचे हित सबंध सुरक्षित राहाण्यास मदत होते.

६. विविध घटकांमुळे अनेक राजकिय पक्ष निर्माण झाले त्या मुळे एका पक्षाकडे असणाऱ्या सत्तेचे केंद्रीकरण संपुष्टात येऊन विकेंद्रीकरणास प्रोत्साहन मिळते.

७. प्रादेशिक व स्थानिक राजकिय पक्षाना त्या प्रदेशातील प्रश्नांची व समस्यांची जाण असल्याने त्या समस्या लवकर मार्गी लागण्यास मदत होते.

८. कोणत्याच एका राजकिय पक्षाला सत्ता मिळत नसल्याने राजकिय अस्थिरता निर्माण होते.

**थोडक्यात** मतदार मतदान करतांना वरिल सर्व घटकांचा विचार करुणच मतदान करतो. यामागे त्याचे हितसंबंध कारणीभुत ठरत असतात.

.

**संदर्भ :-**

१. भारताचे शासन व राजकारण सक्सेस पब्लिकेशन.
२. भारतीय राजकिय विचार अथर्व पब्लिकेशन्स, डॉ. शुभांगी राठी.
३. दै. सकाळ.

RESEARCH JOURNEY

ISSN : 2348-7143
February 2018

# निवडणूक प्रक्रियेत निवडणूक आयोगाची भूमिका

**प्रा.दर्शना पाटील**
सहा.प्राध्यापिका (राज्यशास्त्र विभाग)
कर्मवीर काकासाहेब वाघ कला, वाणिज्य,
विज्ञान व संगणक विज्ञान, रानवड (के.नगर) ता.निफाड जि.नाशिक

भारतीय निवडणूक आयोग ही भारतातील स्वायत्त, कायमस्वरूपी घटनात्मक अधिकार असलेली संस्था आहे. भारतातील लोकसभा, विधानसभेसह सर्व निवडणुका पारदर्शकतेने घेण्याची जबाबदारी या संस्थेवर आहे. २५ जानेवारी १९५० रोजी भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना झाली. तेव्हापासून दर पाच वर्षांनी किंवा त्याआधी लोकशाही प्रक्रियेनुसार निवडणूक आयोगाच्या देखरेखीखाली भारतात निवडणुका होत आहेत. संसदीय, राज्य विधानसभा आणि राष्ट्रपतीपदाची निवडणूक निवडणूक आयोगाची देखरेख आणि नियंत्रणाखाली पार पडते. निवडणूक आयोगामध्ये मुख्य निवडणूक आयुक्तांसह दोन अतिरिक्त निवडणूक आयुक्त असे तीन जण असतात. राष्ट्रपती निवडणूक आयोगातील सदस्यांची नियुक्ती करतात. १९८८पर्यंत मुख्य निवडणूक आयुक्त निवडणूक आयोगाचे सर्वेसर्वा होते. मात्र १६ ऑक्टोंबर १९८९मध्ये केंद्र सरकारने पेरीशास्त्री यांच्या कार्यकाळात निवडणूक आयोग बहुसदस्यीय करण्याच्या दिशेने पहिले पाऊल उचलताना दोन अतिरिक्त निवडणूक आयुक्तांची नियुक्ती केली.

पण ही नियुक्ती १ जानेवारी १९९०पर्यंत म्हणजे अल्पकाळासाठी होती. कायद्यात आवश्यक दुरुस्ती केल्यानंतर १ ऑक्टोंबर १९९३पासून निवडणूक आयोग पूर्णपणे बहुसदस्यीय झाला. निवडणुकीसंदर्भातील महत्त्वाचे निर्णय बहुमताने व्हावेत ही त्यामागची सरकारची भूमिका होती. मुख्य निवडणूक आयुक्तांवर पदाचा गैरवापर केल्याचा आरोप झाल्यानंतर त्यांना पदावरून हटवायचे असेल तर, संसदेच्या दोन्ही सभागृहालोकसभा आणि राज्यसभेमध्ये दोन तृतियांश सदस्यांची मंजुरी लागते. अतिरिक्त निवडणूक आयुक्तांना हटवण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे. मुख्य निवडणूक आयुक्त राष्ट्रपतींकडे अतिरिक्त आयुक्तांना हटवण्याची शिफारस करू शकतात. भारताचे पंधरावे निवडणूक आयुक्त एन. गोपालस्वामी यांनी नवीन चावला यांच्या विरोधात राष्ट्रपतींकडे अशी शिफारस केली होती. गोपालस्वामी मुख्य निवडणूक आयुक्त असताना नवीन चावला अतिरिक्त निवडणूक आयुक्त होते.

- **आयुक्तांची नियुक्ती आणि कालावधी :-** भारताचे राष्ट्रपती मुख्य निवडणूक आयुक्त आणि अतिरिक्त आयुक्तांची नियुक्ती करतात. निवडणूक आयुक्त म्हणून सहा वर्षांचा कालावधी मिळतो. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींसारखा निवडणूक आयुक्तांचा दर्जा असतो. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींइतके वेतन आणि भत्ते निवडणूक आयुक्तांना मिळतात.
- **निधी आणि खर्च : -** संरक्षण खात्याप्रमाणे निवडणूक आयोगासाठी एक स्वतंत्र बजेट असते. केंद्रीय अर्थमंत्रालय आयोगाबरोबर चर्चा करून आयोगासाठी निधीची रक्कम निश्चित करते. लोकसभा निवडणुकांचा संपूर्ण खर्च केंद्र सरकारचा असतो. विधानसभा निवडणुकीचा खर्च संबंधित राज्य सरकार उचलते. केंद्रात आणि राज्यात एकाच वेळी निवडणूक होत असेल, तर केंद्र आणि संबंधित राज्यामध्ये

खर्चाची समसमान विभागणी केली जाते. मतदार ओळखपत्रापासून निवडणुकीसाठी लागणा-या सर्व साहित्याचा या खर्चामध्ये समावेश असतो.

- **हस्तक्षेपाचा कोणालाही अधिकार नाही :-** निवडणूक आयोग संपूर्णपणे स्वायत्त संस्था असल्याने सरकार किंवा अन्य यंत्रणेला त्यात कोणताही हस्तक्षेप करता येत नाही. निवडणुकांचे सर्वाधिकार निवडणूक आयोगाकडे असतात. निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर करण्यापासून मतदान केंद्र, मतमोजणी केंद्र, तेथील सुरक्षाव्यवस्थेचे निर्णय निवडणूक आयोग करतो.
- **राजकीय पक्ष आणि निवडणूक आयोग :-** निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या प्रत्येक पक्षाला आधी निवडणूक आयोगाकडे नोंदणी करावी लागते. निवडणुकीत पक्षाला मिळालेल्याएकूणमतांच्या आधारावर निवडणूक आयोग त्या पक्षाला राज्य किंवा राष्ट्रीय स्तराचा पक्ष म्हणून मान्यता देत असतो. निवडणूक चिन्हाच्या बाबतीतही तसेच असते. कायमस्वरूपी निवडणूक चिन्ह मिळवण्यासाठी पक्षाला निवडणूक आयोगाने ठरवून दिलेल्या निकषानुसार मते मिळवावी लागतात. निवडणुकीच्या मैदानात उतरलेल्या पक्षाला तात्पुरते निवडणूक चिन्ह दिले जाते. राजकीय पक्षांतर्गतही लोकशाही कारभार चालावा यासाठी निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार राजकीय पक्षांनाही अंतर्गत संघटनात्मक निवडणुका घ्याव्या लागतात. आचारसंहिता, निवडणूक पद्धतीसंदर्भात राजकीय पक्षांची मते जाणून घेण्यासाठी निवडणूक आयोगही राजकीय पक्षांबरोबर चर्चा करतो.
- **निवडणूक आयोग अधिकार :-** एखाद्या उमेदवाराने नियमानुसार मुदतीत निवडणूक खर्चाचा तपशील सादर केला नाही, तर त्याला अपात्र ठरवण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला आहे. तसेच निवडून आलेल्या उमेदवाराचा अपात्रतेचा कालावधी कमी करण्याचा अधिकारही निवडणूक आयोगाला आहे.
- **न्यायालयात आव्हान :-** निवडणुकीसंबंधी निवडणूक आयोगाच्या निर्णयांना उच्च न्यायालयात किंवा सर्वोच्च न्यायालयात आव्हान देता येते. निवडणुकीची प्रक्रिया सुरू असताना, न्यायालय निवडणुकीत हस्तक्षेप करत नाही. मात्र निकाल लागल्यानंतर निवडणूक आयोग स्वत:हून निकालाचा फेरआढावा घेऊ शकत नाही. त्यासाठी न्यायालयात याचिका दाखल करावी लागते. संसद आणि राज्य विधानसभेची निवडणूक असेल, तर उच्च न्यायालयात याचिका दाखल करता येते. पण राष्ट्रपती, उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीबाबत आक्षेप असेल, तर सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करावी लागेत.
- **प्रसारमाध्यम धोरण :-** निवडणूक कालावधीत तसेच विशेष प्रसंगी निवडणूक आयोग पत्रकार परिषद आयोजित करून आपल्या निर्णयाची माहिती देत असतो. मतदान केंद्र, मतमोजणी केंद्रामध्ये प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना उपस्थित राहता यावे यासाठी निवडणूक आयोगाकडून पत्रकारांना विशेष पत्र दिले जाते. आवश्यक परवानगीने निवडणुकीचा दस्तावेज अभ्यास, संशोधनासाठी उपलब्ध करून दिला जातो.
- **मतदार प्रशिक्षण :-** लोकशाही निवडणूक यशस्वी करण्यासाठी मतदान प्रकियेमध्ये मतदारांचा जास्तीत जास्त सहभाग महत्त्वाचा असतो. २००९मध्ये निवडणूक आयोगाने मतदार प्रशिक्षण आणि सहभाग कार्यक्रम राबवला होता.
- **निवडणुक आयोग आणि त्याचे आयुक्त**

देशातील मतदानाच्या प्रक्रियेत निवडणूक आयोगाची भूमिका महत्त्वाची ठरते. भारतीय निवडणूक आयोगाने आणि त्याच्या १८ आयुक्तांनी ही भूमिका जबाबदारीने पार पाडली आहे.

**भारताचे पहिले निवडणूक आयुक्त – सुकुमार सेन**



सुकुमार सेन हे भारताचे पहिले निवडणूक आयुक्त होते. त्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय निवडणूक आयोगाने स्वतंत्र भारताच्या इतिहासातील पहिल्या दोन निवडणुका यशस्वीपणे घेऊन दाखवल्या. १९५२ आणि १९५७च्या लोकसभा निवडणुकीत सुकुमार सेन भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त होते. २१ मार्च १९५० ते १९ डिसेंबर १९५८पर्यंत ते भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त होते. त्यांनी नेपाळ आणि सुदानमध्येही पहिले निवडणूक आयुक्त म्हणून काम पाहिले. १८९९मध्ये एका बंगाली ब्राह्मण कुटुंबात सेन यांचा जन्म झाला. त्यांचे वडील न्यायदंडाधिकारी होते. कोलकात्यातील प्रेसिडेन्सी कॉलेज आणि लंडन विद्यापीठातून त्यांनी पदवी घेतली. १९२१ मध्ये ते भारतीय नागरी सेवेत दाखल झाले. त्यांनी देशाच्या विविध जिल्ह्यांमध्ये अधिकारी म्हणून काम केले. १९४७मध्ये त्यांचा पश्चिम बंगालच्या मुख्य सचिवपदी निवड झाली. त्यानंतर भारताच्या मुख्य निवडणूक आयुक्तपदी त्यांची निवड झाली.

- **कल्याण वैद्यनाथन सुंदरम** (२० डिसेंबर १९५८ **ते** ३० सप्टेंबर १९६७)

भारतीय नागरी सेवेमधील कल्याण वैद्यनाथन सुंदरम भारताचे पहिले कायदा सचिव आणि दुसरे मुख्य निवडणूक आयुक्त होते. स्वातंत्र्यानंतर भारतात विविध राज्यांच्या निर्मितीमध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यांच्या या कामाबद्दल लॉर्ड लुईस माऊंटबॅटननेही त्यांचे कौतुक केले होते. १९६२ची निवडणूक त्यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. संस्कृत भाषेचे ते तज्ज्ञ होते. २० डिसेंबर १९५८ ते ३० सप्टेंबर १९६७ पर्यंत ते भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त होते. १९६८मध्ये भारत सरकारने त्यांना देशातील दुस-या क्रमांकाचा सर्वोच्च नागरी सन्मान असलेल्या पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित केले होते.

- **एस. पी. सेन वर्मा**

एस. पी. सेन वर्मा भारताचे तिसरे निवडणूक आयुक्त होते. १ ऑक्टोंबर १९६७ ते ३० सप्टेंबर १९७२पर्यंत ते या पदावर होते.

- **महाराज नागेंद्र सिंह** (१ ऑक्टोंबर १९७२ **ते** ६ फेब्रुवारी १९७३)

भारताचे चौथे निवडणूक आयुक्त महाराज नागेंद्र सिंह राजघराण्याशी संबंधित होते. राजस्थानातील डुंगरपूरमधील राजघराण्यात त्यांचा जन्म झाला. महाराज बिजय सिंह यांचे ते तिसरे पुत्र होते. आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविलेले होते. १ ऑक्टोंबर १९७२ ते ६ फेब्रुवारी १९७३पर्यंत त्यांनी निवडणूक आयुक्त म्हणून काम पाहिले. १९६६, १९६९ आणि १९७५मध्ये त्यांनी संयुक्त राष्ट्र सभेवर भारताचे प्रतिनिधित्व केले. १९७३मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित केले.

- **टी. स्वामिनाथन**

टी. स्वामिनाथन भारताचे पाचवे निवडणूक आयुक्त होते. ७ फेब्रुवारी १९७३ ते १७ जून १९७७पर्यंत ते निवडणूक आयुक्त होते.

- **एस. एल. शकधर**

एस. एल. शकधर भारताचे सहावे निवडणूक आयुक्त होते. १८ जून १९७७ ते १७ जून १९८२पर्यंत त्यांनी निवडणूक आयुक्त म्हणून काम पाहिले. तिस-या, चौथ्या आणि पाचव्या लोकसभेचे ते सचिव होते. मूळचे जम्मू-काश्मीरचे असलेले शकधर संसदीय कामकाज आणि संविधानाशी संबंधित विषयाचे तज्ज्ञ होते. लोकसभेचे कामकाज अधिक प्रभावी पद्धतीने व्हावे यासाठी संसदीय प्रक्रियेमध्ये अनेक बदल सुचवत त्यांनी मोलाचे योगदान दिले. २००२मध्ये त्यांचे निधन झाले.

- **राम कृष्ण त्रिवेदी**

राम कृष्ण त्रिवेदी भारताचे सातवे निवडणूक आयुक्त होते. १८ जून १९८२ ते ३१ डिसेंबर १९८५पर्यंत त्यांनी आयुक्त म्हणून काम केले. ते गुजरातचे राज्यपालही होते. २६ फेब्रुवारी १९८६ ते २ मे १९९०पर्यंत ते गुजरातचे राज्यपाल होते.

- **आर. व्ही. एस पेरीशास्त्री**

आर. व्ही. एस. पेरीशास्त्री भारताचे आठवे निवडणूक आयुक्त होते. १ जानेवारी १९८६ ते २५ नोव्हेंबर १९९०पर्यंत ते मुख्य निवडणूक आयुक्त होते. पदावर असतानाच त्यांचे कर्करोगाने निधन झाले. आर. व्ही. एस. पेरीशास्त्री यांच्या कार्यकाळात निवडणूक आयोगात काही बदल झाले. भारत सरकारने त्यांच्या कार्यकाळात आणखी दोन निवडणूक आयुक्तांची नेमणूक करून निवडणूक आयोग बहुसदस्यीय करण्याच्या दिशेने पाऊल टाकले. पेरीशास्त्री यांनी निवडणुकीसाठी केंद्र सरकारला अनुकूल ठरेल अशी भूमिका घेण्यास नकार दिल्याने, त्यांच्या अधिकारांवर मर्यादा आणण्यासाठी केंद्र सरकारने आयोग बहुसदस्यीय करण्याच्या दिशेने पाऊल उचलल्याचे बोलले जाते. पेरीशास्त्री यांनी अनेक निवडणूक सुधारणा सुचवल्या होत्या. त्यांच्या काळातच मतदानाचे वय घटवून १८व्या वर्षी मतदानाचा अधिकार देण्यात आला.

RESEARCH JOURNEY

भारताच्या कायदा आयोगात कनिष्ठ कायदा अधिकारी म्हणून ते रुजू झाले. त्यानंतर टप्प्याने पुढे जात केंद्रीय कायदा मंत्रालयात त्यांनी वेगवेगळया पदांवर काम केले. १९७८मध्ये ते भारत सरकारचे सचिव होते.

- **व्ही. एस. रमादेवी** (२६ नोव्हेंबर १९९० **ते** ११ डिसेंबर १९९०)

व्ही. एस. रमादेवी भारताच्या पहिल्या महिला निवडणूक आयुक्त होत्या. २६ नोव्हेंबर १९९० ते ११ डिसेंबर १९९०पर्यंत त्यांनी निवडणूक आयुक्त म्हणून काम पाहिले. २६ जुलै १९९७ ते १ डिसेंबर १९९९पर्यंत त्या हिमाचल प्रदेशच्या राज्यपाल होत्या. २ डिसेंबर १९९९ ते २० ऑगस्ट २००२पर्यंत त्या कर्नाटकच्या राज्यपाल होत्या.

- **टी. एन. शेषन**

भारतातील निवडणूक व्यवस्थेला शिस्त लावण्याचे संपूर्ण श्रेय तीरुनेल्लई नारायण अय्यर म्हणजे टी. एन. शेषन यांना जाते. ते भारताचे दहावे मुख्य निवडणूक आयुक्त होते. टी. एन. शेषन यांनी पदभार स्वीकारण्यापूर्वी निवडणुकांमध्ये सर्रास गैरप्रकार चालायचे. खुलेआम अचारसंहितेचे उल्लंघन व्हायचे. प्रचारासाठी शासकीय यंत्रणांचा गैरवापर चालायचा. मात्र शेषन यांनी नियमांची काटेकोर अंमलबजावणी करून, निवडणुकांमध्ये चालणारे गैरप्रकार संपवले आणि निवडणुकांमध्ये पारदर्शकता आणली. भारतातील

ISSN : 2348-7143
February 2018

राजकीय पक्षांवर निवडणूक आयोगाचा धाक निर्माण करणारे टी. एन. शेषन पहिले आयुक्त होते. त्यांच्यापूर्वी झालेल्या कोणत्याही मुख्य निवडणूक आयुक्ताला अशा प्रकारची कार्यक्षमता दाखवता आली नव्हती. शेषन यांनी जो पायंडा घालून दिला त्यानंतरच प्रत्येक निवडणुकीत अधिक पारदर्शकता येत गेली. शेषन यांनी निवडणूक प्रक्रियेमध्ये अनेक सुधारणा करून, जनतेमध्ये मतदान प्रक्रियेबद्दल विश्वास निर्माण केला. १२ डिसेंबर १९९० ते ११ डिसेंबर १९९६पर्यंत ते भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त होते.

निवडणूक आयुक्त होण्यापूर्वी शेषन कोण, हे जनतेला माहीतही नव्हते, मात्र निवडणूक आयोगाचे कामकाज सांभाळल्यानंतर त्यांनी पारदर्शी निवडणुकीसाठी निर्णयांचा जो धडाका लावला, त्यामुळे घरघरात टी. एन. शेषन हे नाव माहिती झाले. शेषन यांनी राजकीय पक्ष आणि उमेदवारांवर धाक बसवला. स्वच्छ चारित्र्याचे, कार्यक्षम अधिकारी म्हणून ते ओळखले जातात. प्रशासकीय अधिका-याने नियमानुसार चालायचे ठरवले तर तो काय करू शकतो हे शेषन यांनी दाखवून दिले. भारतीयनिवडणूक व्यवस्थेवर शेषन यांनी स्वत:चा असा एक अमीट ठसा उमटवला. १९९७मध्ये त्यांनी अपक्ष म्हणून राष्ट्रपतीपदाची निवडणूकही लढवली. मात्र त्यांना राजकीय पक्षांचे मोठ्या प्रमाणावर समर्थन मिळवता आले नाही. के. आर. नारायणन यांनी त्यांचा पराभव केला. शेषन यांना या निवडणुकीत फक्त ५०,६३१ मते मिळाली. त्यांचे प्रतिस्पर्धी नारायणन यांना ९,५६,२९० मते मिळाली.

१५ डिसेंबर १९३२ रोजी एका तामिळ कुटुंबात जन्मलेल्या शेषन यांनी मद्रास ख्रिश्चन कॉलेजमधून पदवी घेतली. त्यानंतर त्यांना भारतीय नागरी सेवेमध्ये दाखल व्हायचे होते. मात्र १९५३मध्ये ते भारतीय पोलिस सेवेत दाखल झाले. पुढच्याच वर्षी भारतीय नागरी सेवेची परीक्षा देऊन शेषन १९५५मध्ये भारतीय प्रशासकीय सेवेत रुजू झाले. हार्वर्ड विद्यापीठातूनही त्यांना नागरी प्रशासनाची पदवी घेतली. मुख्य निवडणूक आयुक्त होण्यापूर्वी ते केंद्रीय सचिव, नियोजन आयोगाचे सदस्य होते. केंद्र सरकारच्या विविध खात्यांमध्ये त्यांनी महत्त्वाच्या जबाबदा-या सांभाळल्या.

- **टी. एन. शेषन यांनी घेतलेले महत्त्वाचे निर्णय-**
    1. मतदार प्रभावित होतील अशी कोणत्याही प्रकारची लाच देण्यावर बंदी.
    2. निवडणुकी दरम्यान दारू वाटण्यावर बंदी.
    3. बोगस मतदान रोखण्यासाठी मतदाराचे ओळखपत्र.
    4. प्रचारासाठी सरकारी यंत्रणांच्या वापरावर बंदी
    5. देवस्थाने, मंदिरांच्या ठिकाणी प्रचार करण्यावर बंदी.
    6. अधिकृत लेखी परवानगीशिवाय लाऊड स्पीकरच्या वापरावर बंदी.

- **एम. एस. गिल**

सध्या राजकारणात सक्रिय असणारे एम. एस. गिल १९९६ ते २००१ या काळात भारताचे अकरावे निवडणूक आयुक्त होते. गिल यांच्या कार्यकाळापासूनच देशात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर सुरू झाला. भारत सरकारने त्यांना पद्मविभूषण पुरस्कार देऊन सन्मानित केले. गिल सध्या राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षात सक्रिय आहेत. एप्रिल २००८मध्ये त्यांना भारताचे युवक कल्याण आणि क्रीडामंत्री बनवण्यात आले. २००९मध्ये कॉंग्रेस पुन्हा सत्तेवर आल्यानंतर त्यांना मंत्रिपद देण्यात आले. मात्र त्यानंतर झालेल्या मंत्रिमंडळ फेरबदलात

त्यांना डच्चू मिळाला. राज्यसभेमध्ये ते पंजाबचे प्रतिनिधित्व करतात. १९८५ ते ८७मध्ये ते पंजाब सरकारमध्ये कृषी सचिवही होते.

- **जेम्स मायकल लिंगडोह**

कडव्या शिस्तीचे जेम्स मायकल लिंगडोह भारताचे बारावे निवडणूक आयुक्त होते. निवडणूक आयुक्तपदी असताना त्यांचा आताचे भाजपचे पंतप्रधानपदाचे उमेदवार नरेंद्र मोदी यांच्याबरोबर झालेला वाद बराच गाजला होता. २००२मध्ये गुजरात दंगलीनंतर नरेंद्र मोदी सरकारने मुदतीपूर्वीच नऊ महिने आधीच विधानसभा विसर्जित करून, निवडणूक घेण्याची शिफारस केली होती. मात्र निवडणूक आयोगाने जाहीरपणे या निर्णयाला विरोध करत, निवडणुका घेण्याची मागणी फेटाळून लावली होती. त्या वेळी मोदी यांनी जाहीर सभेमध्ये लिंगडोह यांच्या ख्रिश्चन धर्मावरून त्यांच्यावर टीका केली होती. लिंगडोह ख्रिश्चन आहेत म्हणून ते निवडणुका घ्यायला तयार नाही असे मोदी म्हणाले होते. त्यावर लिंगडोह यांनी उत्तर देताना मोदी हलक्या विचारांचे असून, त्यांचे वर्तन घृणास्पद असल्याची टीका केली होती. सर्वोच्च न्यायालयानेही निवडणुकीसंदर्भातील निवडणूक आयोगाचा निर्णय योग्य ठरवला होता. मूळचे मेघालयचे असणारे लिंगडोह १४ जून २००१ ते ७ फेब्रुवारी २००४ या काळात भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त होते.

- **टी. एस. कृष्णमूर्ती**

टी. एस. कृष्णमूर्ती भारताचे तेरावे निवडणूक आयुक्त होते. भारतीय महसुली सेवेतून कारकींद सुरू करणारे कृष्णमूर्ती यांनी केंद्र सरकारमध्ये विविध पदांवर काम केले. फेब्रुवारी २००४ ते मार्च २००५पर्यंत ते भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त होते.

- **बी. बी. टंडन**

भारतीय प्रशासकीय सेवेतील १९६५च्या बॅचचे अधिकारी असणारे ब्रिज बिहारी टंडन १६ मे २००५ ते २९ जून २००६ या काळात भारताचे चौदावे निवडणूक आयुक्त होते.

- **एन. गोपालस्वामी**

एन. गोपालस्वामी हे भारतीय प्रशासकीय सेवेतील १९६६च्या गुजरात कॅडरचे अधिकारी. निवडणूक आयुक्त नवीन चावला यांच्यावर केलेल्या आरोपांमुळे त्यांची कारकींद गाजली. नवीन चावला निवडणूक आयोगांच्या बैठकांमधली गोपनीय माहिती फोडत असल्याचा गोपालस्वामी यांनी आरोप केला होता. नवीन चावला यांना निवडणूक आयोगामधून हटवण्याची शिफारस त्यांनी राष्ट्रपतींकडे केली होती. माजी लष्करप्रमुख व्ही. के. सिंह यांच्या वयाच्या मुद्द्यावरूनही ते सर्वोच्च न्यायालयात गेले होते. गुजरात सरकार आणि केंद्र सरकारमध्ये त्यांनी महत्त्वाच्या जबाबदा-या सांभाळल्या. ३० जून २००६ ते २० एप्रिल २००९पर्यंत ते भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त होते.

- **नवीन चावला**

नवीन चावला भारताचे सोळावे निवडणूक आयुक्त होते. १९६९च्या बॅचचे अधिकारी असणारे नवीन चावला गांधी घराण्याशी असणा-या जवळकीमुळे नेहमीच वादात राहिले. भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त बनण्यापूर्वी तत्कालीन मुख्य निवडणूक आयुक्त एन. गोपालस्वामी यांनी त्यांच्यावर निवडणूक आयोगाच्या गुप्त निर्णयांची माहिती काँग्रेसला पुरवत असल्याचा आरोप केला होता. त्यांची निवडणूक आयोगातून हकालपट्टी

ISSN : 2348-7143
February 2018

करण्याची शिफारसही केली होती. मात्र तरीही त्यांची मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती झाली. २१ एप्रिल २००९ ते २९ जुलै २०१०पर्यंत त्यांनी निवडणूक आयुक्त म्हणून काम पाहिले.

- **शहाबुद्दीन याकूब कुरेशी**

भारतीय निवडणूक आयोगाच्या मुख्य निवडणूक आयुक्तपदी निवड झालेले शहाबुद्दीन याकूब कुरेशी पहिले मुस्लिम व्यक्ती होते. कुरेशी १९७१च्या हरियाणा कॅडरचे अधिकारी होते. ३० जुलै २०१० ते १० जून २०१२ या काळात ते या पदावर होते.

- **वीरावल्ली सुंदरम संपथ**

वीरावल्ली सुंदरम संपथ हे भारताचे विद्यमान अठरावे मुख्य निवडणूक आयुक्त आहेत. भारतीय प्रशासकीय सेवेतील १९७३च्या आंध्र प्रदेश कॅडरचे ते अधिकारी आहे. आंध्र प्रदेशच्या ऊर्जा क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा त्यांनी केल्या. ११ जून २०१२ रोजी त्यांनी मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला. १६ जानेवारी २०१५पर्यंत ते भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त राहतील. १६व्या लोकसभेसाठी नऊ टप्प्यात मतदान घेण्याची घोषणा त्यांनी केली आहे. संपथ यांच्या कार्यकाळातच सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या नोटा अर्थात उमेदवार नाकारण्याच्या पर्यायाचा मतदान यंत्रामध्ये समावेश करण्यात आला. डिसेंबरमध्ये झालेल्या पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांत 'नोटा'चा प्रथम वापर करण्यात आला होता.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 42 : भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि राजकारण
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

# भारतातील निवडणुक प्रक्रिया आणि राजकारण

**आरती चंद्रकांत कोल्हे**
कला व वाणिज्य महाविद्यालय,
वडनेर भैरव.

**प्रस्तावना :**

भारताने लोकशाही पदधतीचा स्विकार केल्यामुळे राजकिय सत्ता परिवर्तनासाठी निवडनुकाच्या मार्गा चा अवलंब केला जातो. त्यासाठी एका स्वायत्त निवडणुक आयोगाची निर्मीती करण्यात आली आहे.राज्यसंघटनेतील तरतुदीनुसार निवडणुक आयोगास निवडणुकांच्या संदर्भात महत्त्वपुर्ण अधिकार व कार्ये पार पाडावे लागतात. भारतात मुक्त आणि यशस्वीपणे निवडणुका पार पाडण्यात निवडणुक आयोगाची भुमिका महत्वाची मानली जाते.

निवडनुका हा भारतातील राजकीय प्रक्रियेतील एक महत्त्वपुर्ण घटक आहे.राजकिय सत्तेत शांततामय व रचनात्मक मार्गांनी परिवर्तन घडवुन आणण्यासाठी भारतीय लोकशाही व्यवस्थेत निवडनुकांस महत्त्व दिले जाते. राजकिय पक्ष निवडणुकाच्या आधारावर राजकिय सत्तेची प्राप्ती करतात. त्यामुळे निवडणुक प्रक्रिया सदोष असावी, कार्यक्षम असावी यासाठी भारतात निवडणुक आयोगाची निर्मीती करण्यात आली आहे.भारतातील निवडणुक व्यवस्था ही वैशिष्टयपुर्ण आहे.

**निवडणुक सुधारणा :**

भारतात सार्वत्रिक निवडणुकांना प्रारंभ झाल्यानंतर निवडणुका योग्य प्रकारे पार पाडाव्यात यासाठी निवडणुका आयोगाने वेळोवेळी अनेक सुधारणा सुचविल्या. त्यापैकी काही सुधारणा अमलात आणल्या गेल्या आणि त्यातुन निवडणुकींचा दर्जा सुधारवण्यास मदत झाली. निवडणुकांचा दर्जा सुधारण्यास मदत झाली. निवडणुकांचा उद्देश योग्य प्रकारे साध्य होण्यासाठी सर्व नागरीकांना निवडनुकीत सहभागी होण्याची संधी मिळाली पाहिजे.त्यांना निर्भयतेने व स्वताःच्या इच्छेनुसार मतदान करता आले पाहिजे. यासाठी मतदान पध्दतीशी संबंधित सुधारणाही करण्यात आल्या.

**निवडणुक सुधारण्याची वैशिष्टये :**

**१) सार्वत्रिक प्रौढ मताधिकार :**

स्वतंत्र भारत्याच्या राज्यसंघटनेने लोकशाहीशी सुसंगत असे राज्यघटनेच्या ३२६ व्या कलमात सार्व त्रीक प्रौढ मताधिकाराचे तत्व स्विकारले आहे.या कलमानुसार लोकसभेच्या आणि राज्याच्या विधानसभेच्या निवडणुका प्रौढ मताधिकाराच्या तत्त्वानुसार होतील मतदानाचा हक्क प्राप्त होण्यासाठी राज्यघटनेतील तरतुदीने आणि संसदेने
काही अटी निश्चित केल्या आहेत.त्या पुढीलप्रमाणे :

- **अटी :**
  - **नागरिकत्व** :
    मतदानचा हक्क प्राप्त होण्यासाठी ती व्यक्ती भारताची नागरीक असली पाहिजे.
  - **वय :**
    वयाच्या २१ वर्षा पुर्वी व्यकतीला मतदानाचा अधिकार होता.मात्र आता शिक्षणाचा होणारा प्रसार आणि राजकिय जागृती यामुळे वयाची अट १८ वर्ष करण्यात आली.

ISSN : 2348-7143
February 2018

- **वास्तव्य :**

मतदाराला निवडणुक लढविण्याचा पक्षाची धोरणे व त्यांचे उमेदवार याची माहिती असावी.मतदार संघातील प्रश्नाची जाणीव असावी यासाठी निवडणुकीपुर्वी किमान मतदाराचे देशात वास्तव्य असावे अशी घालण्यात आली आहे.

**२) मतदारांना ओळखपत्रे :**

निवडणुकीत होणारे बोगस मतदान टाळण्यासाठी छायाचित्र असलेले ओळखपत्रे प्रत्येक मतदाराला देण्याची योजना अमलात आणली.ओळखपत्रे दाखवल्याशिवाय मतदान करता येणार नाही.असा नियम करण्यात आला या उपक्रमाला मोठा खर्च आला तरी यामुळे बोगस मतदानाला आळा बसण्यास मदत झाली.

**३) एक सदस्य प्रादेशिक मतदार संघ :**

प्रतिनीधी हा आपल्या मतदारांचे खऱ्या अर्थाने प्रतिनीधीत्व करणारा असावा. त्यासाठी प्रतिनीधी निवडण्याची पध्दत ही व्यवहार्य असली पाहिजे.यासाठी पुढील दोन पध्दती आहेत.

१) **प्रादेशिक प्रतिनीधीत्व**
२) **प्रमाणशीर प्रतिनीधीत्व**

भारतात राज्यसभा व विधानसभा परिषद यांचा निवडणुकीमध्ये प्रादेशिक प्रतिनिधित्वाच्या पध्दतीचा वापर केला जातो. मात्र प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची पध्दत भारतासारख्या देशात जिथे अशिक्षित मतदार मोठया संख्येने आहेत आणि लोकसंख्या ही खुप मोठी आहे तिथे व्यवहार्य ठरत नाही.यासाठी भारतात एक सदस्य प्रादेशिक मतसंघ पध्दतीचा अवलंब केला जातो.ही पध्दत सोपी व सुटसुटीत असुन लोकसभा, विधानसभा, जिल्हापरिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत याच्या निवडणुकांमध्ये या पध्दतीचा वापर केला जातो.या पध्दतीत भौगोलिक सलगता आणि लोकसंख्या यांचा विचार करून जेवढे प्रतिनीधी निवडायचे तेवढे प्रादेशिक मतदार संघ निर्माण केले जातात.मतदार संघात वास्तव्य करणारे मतदार आपला प्रतिनीधी निवडतात.

**४) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे :**

पहिल्या दोन सार्वत्रिक निवडणुका मतदाराला मतपत्रिका दिली जात नव्हती.तर प्रत्येक उमेदवारासाठी वेगळी मतपेटी असे.त्या मतपेटीवर त्यांच्या पक्षाची निशाणी असे.ज्या उमेदवाराला मत दयायचे त्या मतपेटीत मतदार आपली मतपत्रिका टाकत असे. या पध्दतीत मतपत्रिका कोऱ्या असत.त्यामुळे मतपत्रिका एका पेटितुन दुसऱ्या पेटित टाकणे सहज शक्य होते.त्यामुळे भ्रष्टाचाराला मोठी संधी मिळे , त्यामुळे ही पध्दत बंद करण्यात आली. त्यानंतर मतदाराला उमेदवारांची यादी आणि त्यापुढे त्यांचे निवडणुक चिन्ह असलेल्या मतपत्रिका देण्याच्या पध्दतीचा प्रारंभ झाला.त्यानुसार मतदान आपल्या पसंतीच्या पक्षाच्या नावा समोरील चिन्हावर शिक्का उमटविन्याचा आणि एकाच मतपेटीत आपली मतपत्रिका टाकायचा. पण यानंतरही मतपेटया पळविणे, बोगस मतदान करणे अशा प्रकारांना सुरूवात झाली. यावर उपाय म्हणुन निवडणुक आयोगाने आता इलेक्ट्रॉनिक यंत्राचा वापर करण्यास सुरूवात केली. या पध्दतीमध्ये मतदार इलेक्ट्रॉनिक यंत्राच्या सहाय्याने बटन दाबुन आपल्या उमेदवाराला मत देतो. या पध्दतीमध्ये मतदार इलेक्ट्रॉनिक यंत्राच्या सहाय्याने बटन दाबुन आपल्या उमेदवाराला मत देतो. या पध्दतीमुळे बोगस मतदान पध्दतीला आला बसला. आणि निवडणुक निकाल जाहीर करण्यासाठी कमी वेळ लागतो.

**५) गुप्त मतदान पध्दती :**

१) उघड मतदान पध्दती आणि
२) गुप्त मतदान पध्दती अशा मतदानाच्या दोन पध्दती आहेत.

भारतात सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळी गुप्त मतदान पध्दतीचाच वापर केला जातो. मतदाराला निर्भयपणे मतदान करता यावे यासाठी ही पध्दत उपयुक्त आहे.राज्यसभेत जे प्रतिनीधी घटक राज्याच्या विधानसभेकडुन निवडले जातात, त्यासाठी उघड मतदान पध्दतीचा सध्या केला जात आहे.

**निवडणुक सुधारणांसाठीचे प्रयत्न :**

**यशवंतराव चव्हाण समिती :**

यशवंताराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली १९६८ साली एक समिती नियुक्त करण्यात आली. त्याने पुढील शिफारशी सुचविल्या :

- एका सार्वजनिक आचार सहितेचा स्विकार राजकीय पक्षांनी करावा व पक्षांतर करणाऱ्या व्यक्तीस आपल्या पक्षात प्रवेश देऊ नये.
- पक्षांतर करणाऱ्या व्यक्तीस मंत्रीपद देऊ नये.
- मंत्रिमंडळातील सदस्यसंख्या निश्चित केल्यानंतर त्यात वाढ करू नये.इ

**तारकुंडे समिती :**

महाराष्ट्र उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधिश बी.एम.तारकुंडे यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती गठित करण्यात आली. या समितीच्या शिफारशी पुढीलप्रमाणे :

- मतदारासाठी वयोमर्यादा २१ वर्षाऐवजी १८ वर्षे करावी.
- राज्यात निवडणुक आयोग स्थापन करावेत.
- लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका अमानत रकमेत वाढ करावी.इ

**दिनेश गोस्वामी समिती :**

दिनेश गोस्वामी यांच्या अध्यक्षतेखाली निवडणुक सुधारणा सुचविण्यासाठी एक समिती गठित केली. तिने पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या :

- निवृत्तीनंतर निवडणुक आयुक्तांना इतर पदावर काम करता येऊ नये.
- मतदारांना बहुउद्देशीय ओळखपत्र देण्यात यावे.
- निवडणुकीसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करणे.इ

**पक्षांतर बंदी कायदा :**

१ मार्च १९८५ पासुन पक्षांतरबंदी कायदा लागु करण्यात आला. त्यात पुढील तरतुदींचा समावेश आहे :

- पक्षाचा आदेश न मानणारा सदस्य प्रतिनिधी म्हणुन अपात्र मानला जाईल.
- पक्षांतरासंबधी न्यायालयात दाद मागता येईल.

अशा प्रकारचे प्रयत्न भारतात निवडणुक सुधारणेसाठी करण्यात आले.यात १९८९ मध्ये घटनेत ६१ वी घटनादुरूस्ती होऊन मतदारांची वयोमर्यादा २१ वर्षाऐवजी १८ वर्षे करण्यात आली.ही महात्त्वपुर्ण सुधारणा मानावी लागेल. याशिवाय मतदान सक्तीचे करावे. स्त्रियांना विधिमंडळात ३३ ०/० आरक्षण दयावे. दोन पेक्षा जास्त अपात्य असणाऱ्यास निवडणुक लढविण्यास बंदी घालावी.निवडणुक खर्च शासनाकडुन केला जावा यासारख्या सुधारणा घडवुन आनण्याबाबत चर्चा होताना दिसते.

**निष्कर्ष :**

१) सार्वत्रिक प्रौढ मताधिकारामुळे प्रत्येक नागरिकाला मतदान करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे.
२) निवडणुक सुधारणाच्या तत्त्वामध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे महत्त्वाची भुमिका बजावतात.
३) निवडणुक सुधारण्याच्या प्रयत्नांमध्ये वेगवेगळया समित्या महत्त्वपुर्ण भुमिका बजावतात.

**सारांश :**

भारतात निवडनुकांना अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. भारतात सार्वत्रिक निवडणुकांचा प्रारंभ झाल्यानंतर निवडणुका योग्यप्रकारे पार पडाव्या, तसेच त्या भ्रष्टाचार युक्त निर्भीडपणे मतदाराना मतदान करता यावे यासाठी निवडणुक आयोगाने वेळोवेळी अनेक सुधारणा सुचविल्या त्यामध्ये १९८९ मध्ये घटनेत ६१ वी घटनादुरूस्ती होऊन मतदारांची वयोमर्यादा २१ वर्षाऐवजी १८ वर्षे करण्यात आली. त्याचबरोबर निवडणुक आयोगाने अनेक प्रकारच्या समित्या स्थापन करून अनेक प्रकारच्या सुधारणा घडवुन आणल्या.

**संदर्भ :**

१) शरद घोडके : "भारताचे शासन आणि राजकारण" सकसेस पब्लिकेशन.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 42 : भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि राजकारण
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

# मतदार वर्तमान प्रभाव पाडणारे घटक

**सुमित आहेर व निकिता गांगुर्डे**
कला व वाणिज्य महाविद्यालय,
वडनेर भैरव.

**प्रस्तावना :-**

आधुनिक काळातील लोकशाही ही अप्रत्यक्ष किवा प्रतिनिधीक लोकशाही आहे. यापद्धतीत लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीकडे राज्यकारभाराची सूत्रे असतात. आधुनिक राज्ये ही भौगोलिक आकारमान आणि लोकसंख्या या दृष्टीने फार मोठी आहेत .अशा राज्यांत प्रत्यक्ष लोकशाहीचा अवलंब शक्य नसतो. म्हणून अप्रत्यक्ष किवा प्रातिनिधिक लोकशाहीचा अवलंब केला जातो.

राज्यघटनेनुसार भारतातातील सर्व निवडणुकांबाबत देखरेख, मार्गदर्शन आणि नियंत्रणाचे अधिकार "निवडणूक आयोग" या नावाच्या स्वायत्त संस्थेकडे सोपिवण्यात आलेले आहे. निवडणुकामध्ये राजकीय पक्षांचे धोरण, त्याने जाहीर केलेला कार्यक्रम किवा राजकीय पक्षाचे जाहीरनामे या सगळ्यांचा परिणाम मतदारांवर होत असतो. निवडणुकीच्या काळात काही मतदारांना राजकीय पक्षांची धोरणे आणि त्यांचे जाहीरनामे याबद्दल माहिती असते. परंतु काही मतदारांना राजकीय पक्षाची धोरणे कोणती आहेत आणि त्यांचे परिणाम कोणते होतील याबद्दल पूर्ण माहिती नसते. त्यामुळे काही मतदार राजकीय पक्षांच्या धोरणावर विश्वास ठेवतात.

बहुसंख्य मतदारांचे वर्तन हे सामाजिक वर्ग, धर्म, वंश, जात, वयोमान, स्थानिक प्रश्न इ. घटकांच्या प्रभावातून ठरत असते. "व्यक्ती तितक्या प्रकृती" या न्यायाने प्रत्येक मतदारांवर सर्वात जास्त प्रभाव पाडणारा घटक वेगवेगळा असू शकतो. एका व्यक्तीच्या दृष्टीने त्याचा धर्म हा सर्वात जास्त प्रभाव पडणारा घटक असू शकेल तर दुसऱ्या व्यक्तीच्या बाबतीत त्याची जात किवा स्थानिक प्रश्न याचा प्रभाव सर्वात जास्त असेल.

**संशोधनाचीउद्दिष्टे:-**

1. राजकीय पक्षांची धोरणे आणि जाहिरनाम्यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
2. मतदारांना प्रभावित करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.
3. मतदारांचा कल जाणून घेणे.

**गृहीतके :-**

1. भारतातीलनिवडणुकाजातीय व धर्मीय आधारावर लढविल्या जातात.
2. विकास कामे करून हि भारतात सत्ता संपादन करतायेईल

**संशोधन पद्धत :-**

दुय्यमस्त्रोत , निरीक्षण, चर्चासत्रे, इंटरनेट इ.

भारतातील निवडणुका या यशस्वी होण्यामागे मतदारांचे वर्तन हे महत्वाची भूमिका पार पाडते. मतदार विशिष्ट पक्षाला किवा उमेदवारालाच मतदान का करतात. त्यामागे कोणत्या प्रेरणा असतात. या सर्व घटकांचा शास्त्रशुद्ध अभ्यास केला तर काही निष्कर्ष काढता येतील. मतदारांच्या या वर्तनामुळे निवडणुकांवर परिणाम होतो.

भारतातील निवडणुकामध्ये मतदारांना प्रभावित करणारे अनेक घटक आहेत. त्यापैकी काही प्रमुख घटक पुढीलप्रमाणे :-

**१) जातीयता:-**

जातीव्यवस्था ही भारतातातील पुरातन अशी सामाजिक व्यवस्था आहे. या व्यवस्थेने समाजाची विभागणी विभिन्न गटामध्ये केली त्यामुळे त्या त्या विशिष्ट जातीचे लोक आपल्याच जातीच्या उमेदवारास मतदान करतात. या जातीव्यवस्थेमुळे बरेच भारतीय लोक जातीनिहाय मतदान करतात. “जातीयता” हा घटक निवडणुकीत महत्वाचा बनलेला आहे. उदा. महाराष्ट्रात मराठा जातीच्या उमेदवारास मराठा जातीच्या लोकांचीच मते अधिक प्राप्त होतात. तामिळनाडूत मुदलियार अशा प्रकारे त्या त्या जातीचे मते त्या त्या जातीच्या उमेदवारास मिळतात. उमेदवारदेखील जात या घटकाचा आधार घेऊन विशिष्ट जातीच्या लोकांची मते प्राप्त करण्यात यशस्वी होताना दिसतात आणि सगळयामधूनच जातीच्या राजकारणाला सुरुवात होते.

**२) धार्मिकता:-**

भारत हा बहुधर्मीय देश आहे.भारतातविविध धर्माचे लोक राहतात धर्मनिरपेक्षता हे भारतीय शासनव्यवस्थेचे ठळक वैशिष्टे आहे. सर्व धर्मियांना राज्याकडून समान वागणूक, समान हक्क, आणि समान न्याय याची हमी राज्यघटनेने दिलेली आहे. भारतीय लोकशाही आणि राष्ट्राची एकात्मता यासाठी देशात धार्मिक सहिष्णुता आणि सौदार्ह यांची नितांत गरज आहे.

भारतात धर्मवादी राजकारण करणारे पक्ष आहेत. शिखांच्या संबधांचे आपणच हितरक्षक आहेत असा दावा करणारा अकाली दल, हिंदुच्या हितसंबंधाचा रक्षक असल्याची भूमिका घेणारे हिंदू महासभा, भारतीय जनता पक्ष, शिवसेना इ. पक्ष किवा विश्व हिंदू परिषद, रामराज्य परिषद, बजरंग दल यांसारख्या संघटना किवा मुस्लिमांच्या हितांचे आपणच रक्षक आहोत असा दावा करणारी मुस्लीम लिग तसेच मुक्तहिदा इस्तेहादुल मुस्लीम यासारखे पक्ष धार्मिक भावनांना आव्हान करून मतदारांना प्रभावित करतात आणि आपला आणि आपला उमेदवार निवडणूक आणण्याचा प्रयत्न करतात. या सर्व गोष्टीचा मतदारांवर प्रभाव पडत असतो. अशा प्रकारे धर्माचा आधार घेऊन उमेदवार मतदारांना आकर्षित करीत असतात. आणि यातूनच धर्माच्या राजकारणास सुरवात होते.

**३) प्रादेशिकता :-**

लोकांमध्ये प्रादेशिक अस्मिता स्वभाविकपणेच असते. आपापल्या प्रदेशातील लोकजीवन, तेथील प्राकृतिक, परिस्थितीत, भौगोलिक, वैशिष्टे, बोलीभाषा, परंपरा याबद्दल लोकांना आत्मीयता असते. यातून प्रादेशिक हितसंबध तयार होतात. मतदारांच्या वर्तनावर त्यांचा प्रभाव पडतो. भारतातील प्रत्येक राज्यात प्रादेशिक पक्ष आहेत, आणि अनेक प्रादेशिक पक्षांच्या उदय प्रादेशिक अस्मितेतून झालेला आहेत. असे पक्ष प्रादेशिक अस्मितेला आव्हान करतात. अन त्या आव्हानाला लोकांचाही प्रतिसाद मिळत असतो. आपापल्या प्रदेशात वास्तव्य करणाऱ्यां आणि आपल्या प्रदेशाचे हित संबध जोपासणाऱ्या उमेदवारालाच लोक मतदान करतात. अनेक प्रकारचे राजकीय पक्ष प्रादेशिक अस्मिता बाळगून लोकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करतात आणि त्याद्वारे लोकांची मते मिळवतात. उदा:- तामीळनाडूत द्रविड मुन्नेत्र कळघम, आंध्रप्रदेशात तेलगु देसम, पंजाब मध्ये अकाली दल.

**४) प्रादेशिक किवा स्थानिक समस्या :-**

एखाद्या राज्यामध्ये काही गंभीर स्वरुपाची समस्या निर्माण झाली असेल किवा राज्यातील एखाद्या प्रदेशाचा काही गंभीर प्रश्न असेल तर मतदारांच्या वर्तनावर त्याचा सर्वात मोठा प्रभाव पडत असतो. उदा :- आसाममध्ये बंगाल व बिहार या राज्यातून मोठ्या प्रमाणात लोकांचे स्थलांतर चालू होते. जेव्हा बांगलादेशातून घुसखोरी करून आलेल्या लोकांची वस्ती वाढत गेली, तेव्हा आसाममध्ये ‘आसाम लोकांसाठी आसाम’ ही घोषणा लोकप्रिय झाली. आसाम गणपरिषदेने स्थलांतरीत लोकांची आसाममधून हाकलपट्टी करावी यासाठी

ISSN : 2348-7143
February 2018

आंदोलन केले. लोकांचा त्याला पाठींबा मिळाला आणि त्या राज्यात 'आसाम गणपरीषद' सत्तारूढ झाली. लोकांच्या जिव्हाळयाची त्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत अशी गंभीर स्वरुपाची स्थानिक समस्या निर्माण होते. तेव्हा जात, धर्म, पंथ अशा घटकापेक्षाही मतदारांच्या दृष्टीने ती समस्या महत्वाची ठरते आणि मतदार वर्तनावर या घटकांचा सर्वात जास्त प्रभाव पडतो.

**५) वाढत्या आकांक्षा :-**

भारतासारख्या विकसनशील देशात जनतेच्या अपेक्षा आणि आकांक्षा सतत वाढताना दिसत आहेत. प्रौढ मताधिकारामुळे राजकीय प्रकीयेत सहभागी होण्याच्या संधी विविध सामाजिक घटकांना मिळाली आहे. राजकीय सत्तेत वाटेकरी होण्याची संधी मिळाली. त्याचबरोबर लोकांच्या अपेक्षाही वाढल्या. मतदारवर्ग हा सतत बदलत असतो. नव्या तरुण मतदारांची मतदारवर्गात भर पडत राहते. नव्या पिढीने मूल्य व त्यांच्या आकांक्षा नव्या असतात. यांचा निवडणुकावर परिणाम होत असतो. शिवाय अनेक मतदार प्रस्थापित सरकारकडून आपली अपेक्षापूर्ती होत असेल तरच त्या संबधित उमेदवारास मतदान करतात. त्यामुळे मतदारांच्या वाढत असलेल्या इच्छा आकांक्षा या मतदारांच्या वर्तनावर प्रभाव पडताना दिसतात.

**६) सुशासन आणि विकास :-**

अलीकडील काळात ज्या सार्वत्रिक निवडणुका झाल्यात त्यात एक गोष्ट प्रकर्षाने दिसून आली आहे ती म्हणजे त्या सरकारने विकास कामे केली. सुशासन (Good Governance) निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांना लोकांनी पुन्हा काही राज्यात अनेक वेळा निवडून दिलेले आहे. जी राष्ट्रे विकासदर वाढविण्यात ठोकळ राज्य उत्पादनात वाढ करण्यात यशस्वी ठरली तिथे प्रस्थापित सरकारचा लोकांना पाठींबा मिळाला. प्रस्थापितांना विरोध तेथे दिसून आला नाही. याउलट मतदार प्रस्थापितांच्या आश्वासनांनी प्रभावित होत आहेत. ज्या राज्यात गैरकारभार, भ्रष्टाचार झाला. कायदा व सुव्यवस्था स्थिती बिघडली. या सगळयांना मतदारांचे हे प्रभावी वर्तन कारणीभूत ठरते. जर मतदारांनी सुशासन आणि विकास या गोष्टींचा विचार करून मतदान केले तर भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने ती स्वागतार्ह बाब ठरेल. मागील लोकसभा निवडणुकीवेळी 'अच्छे दिन' ही सुशासनाची ग्वाही मतदारांना वाटल्याने भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेत आले आहे.

**थोडक्यात** वरील मुद्द्यांचा सखोल अभ्यास करून असे निदर्शनास आले कि मतदार हे जातीय व धार्मिक गोष्टींचा विचार करून मतदान करतात. त्याबरोबरच प्रादेशिक अस्मिता हा घटकही मतदारांच्या वर्तनावर प्रभाव टाकतो. तथापि नवीन पिढीतील तरुण रोजगाराच्या संदर्भात आणि विकासाच्या संदर्भात अधिक जागृत असल्याने सुशासन आणि विकास या आधारावर पुढील काळातील भारतीय राजकारणातील मतदारांचे वर्तन प्रभावित असेल.

**संदर्भ:-**

१. भारताचे शासन आणि राजकारण – र.घ.वराडकर

# भारतातील लोकसभा निवडणूका आणि महिलांचा राजकीय सहभाग

**प्रा. राजेंद्र दिलीप आगवाने[१] व प्रा.अरूण अंबादास पोटे[२]**
सहाय्यक प्राध्यापक,
राज्यशास्त्र विभाग, गुरूवर्य मामासाहेब दांडेकर कला,
भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सिन्नर जि. नाशिक.
मो. ९७६६१०२८०० मो. ९८२२५५८२५४

**प्रस्तावना:—**

भारताला स्वातंत्र्य मिळुन ६९ वर्ष पूर्ण झालेली आहेत तथापि स्वातंत्र्याचे फायदे भारतीय समाजातील महीलांसारखा एक मोठा घटक अजुनही उपभोगू शकत नाही. महिलांच्या संरक्षणासाठी व त्यांच्या सक्षमीकरणासाठी राष्ट्र आणि राज्य पातळीवर अनेक कायदे करण्यात आले. महिलांचा राजकीय सहभाग आणि नेतृत्व यात वाढ होउन आणि लोकशाहीचे बळकटीकरण करण्यासाठी १९९३ मध्ये ७३ आणि ७४ वी घटना दुरूस्ती करून महीलांना भारताच्या स्थानिक राजकारणात प्रथमच ३३ टक्के आरक्षण देण्यात आले महीलांच्या राजकीय विकासातील हे पहीले पाउल होते पुढे २०१० मध्ये महाराष्ट्र सरकारने महीलांच्या आरक्षणात वाढ करून ते ५० टक्के करण्यात आले. परंतू अजूनही महीला राष्ट्रीय राजकारणात समान प्रतिनिधीत्वापासून वंचीत आहेत. अगदी प्राचीन काळापासून स्त्रीया सामाजिक व कौटुंबिक अन्यायाच्या बळी ठरल्या होत्या पारंपारिक भारतीय समाजात तर स्त्रीयांना अनेक हक्कापासून वंचित ठेवण्यात आले होते. पारंपारिक भारतीय समाजात अशा अनेक धार्मिक व सामाजिक प्रथा रूढ होत्या की ज्यामुळे स्त्रयांना अत्यंत तुच्छ लेखण्याची माणसिकता तयार झाली होती. सतीची चाल, स्त्री भ्रुण हत्या, बालविवाह, विधवा विवाहास विरोध, केशवपण, स्त्रियांना शिक्षण घेण्यास प्रतिबंध, बहुपत्नीत्व यासारख्या चालीरीतीचा, रूढीचा स्त्रियांच्या जीवनावर कितीतरी विपरित दुरगामी परिणाम झालेले आहेत. आजच्या सद्यस्थितीतही भारतीय महीलांना अनेक प्रकारच्या गंभीर समस्यांशी झुंज द्यावी लागत आहे. भारतातील पुरूषसत्ताक व्यवस्थेचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन अद्यापही निकोप बनलेला नाही. त्यामुळे त्यांच्यापुढील आव्हानांची चर्चा होणे आवश्यक आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टये:—**

१. १९५२ ते २०१४ या काळातील लोकसभा निवडणूकातील महीलाच्या प्रतिनिधीत्वाचे स्वरूप अभ्यासने.
२. महीलांच्या राष्ट्रीय राजकारणातील सहभागाबाबत असणाऱ्या आव्हानांची चर्चा करणे.

**१९५२ ते २०१४ या काळातील लोकसभा निवडणूकातील महीलाच्या प्रतिनिधीत्वाची संख्या**

| अ.क्र. | लोकसभा निवडणुक वर्ष | लोकसभेतील एकून जागा | उमेदवार महीलांची संख्या | विजयी महीला खासदारांची संख्या | महीला मतांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९५२ | ४८९ | — | २२ | — |
| २ | १९५७ | ४९४ | ४५ | २७ | ४.४५ |
| ३ | १९६२ | ४९४ | ६६ | ३४ | ६.२७ |
| ४ | १९६७ | ५२० | ६७ | ३१ | ५.५७ |
| ५ | १९७१ | ५२० | ८६ | २२ | ४.०५ |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 42 : भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि राजकारण
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | १९७७ | ५४२ | ७० | १९ | ३.५० |
| ७ | १९८० | ५२९ | १४३ | २८ | ५.२९ |
| ८ | १९८४ | ५४२ | १७१ | ४४ | ७.९४ |
| ९ | १९८९ | ५२३ | १९८ | २९ | ५.४८ |
| १० | १९९१ | ५३६ | ३३० | ३९ | ७.११ |
| ११ | १९९६ | ५४३ | ५९९ | ३९ | ७.३६ |
| १२ | १९९८ | ५४३ | २७४ | ४३ | ७.९१ |
| १३ | १९९९ | ५४३ | २८४ | ४९ | ९.०२ |
| १४ | २००४ | ५४३ | ३५५ | ४४ | ८.२९ |
| १५ | २००९ | ५४३ | ५५६ | ५९ | १०.८६ |
| १६ | २०१४ | ५४३ | ६३१ | ६२ | ११ |

(संदर्भ—गायकवाड सुप्रिया, लेख लोकसभा निवडणूक विशेषांक, विचारशलाका—२०१४)

वरील तक्त्याच्या आधारे औपचारिकपणे महीलांचा राजकीय सहभाग हा आपणास समाधानकारक असलेला दिसत नाही असे असले तरी अनौपचारिक राजकारणात म्हणजेच मोर्चे, आंदोलने,मेळावे, अधिवेशने, चर्चा यासारख्या राजकीय कृतीमध्ये मोठया प्रमाणात सहभाग दिसून येतो. १९५२ ची पहीली लोकसभा निवडणूक ही स्वातंत्र्य चळवळीले प्रभावित झालेली तसेच या चळवळीत प्रत्यक्ष सहभागी असलेल्या महीला संसदीय राजकारणात निवडून आलेल्या दिसतात. उदा. विजया पंडीत, मथू लक्ष्मी रेडी,पद्मजा नायडू, सुचेता कृपलानी, राजकुमारी अमरित कौर यासारख्या महीला पुढे आलल्या दिसतात. यामध्ये मागास जातीतील महीला दिसत नाहीत. सोळाही लोकसभा निवडणूकीतील महीलांच्या प्रतिनिधीत्वाची सरासरी संख्या ही ३७ इतकी राहीली आहे. सर्वात कमी प्रमाण १९७७ मध्ये झालेल्या सहाव्या लोकसभा निवडणूकीत महीलांचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे केवळ १९ होते तर सर्वाधिक प्रमाण २०१४ मध्ये झालेल्या सोळाव्या लोकसभा निवडणूकीत ६२ महीला प्रतिनिधींची संख्या होती. वास्तविक पहाता राजकीय समानता असती तर महीलांना समान प्रतिनिधत्वाच्या अधारे २७१ लोकसभा महीला खासदार असणे आवश्यक आहे परंतु भारतासारख्या पुरूषप्रधान देशामध्ये हे होण्यासाठी आणखी कीती काळ वाट पाहावी लागेल हे सांगता येत नाही. सर्वात मोठा काळ सत्तेवर राहीलेला कॉग्रेस पक्षाच्या पंतप्रधान व अध्यक्ष इंदीरा गांधी आणि पक्षप्रमुख सोनिया गांधी या महीला असूनही यांच्या काळात महीला उमेदवारीच्या संख्येत अपेक्षित बदल दिसलेला नाही, इंदिरा गांधी हया भारतातील महीलांचे स्पिरीट होत्या.

**महिलांच्या राजकीय सहभागापुढील आव्हाने**

**१.पुरूषप्रधान संस्कृती आणि राजकीय वारस:—**

भारत देश हा हिंदू बहूल लोकसंख्या असलेला देश आहे. हिंदु धर्म परंपरेतील मनुस्मृतीसारख्या ग्रंथामध्ये आणि एकुनच पुढे चालत आलेल्या रूढी परंपरा या महीलांच्या सवातंत्र्या मारक होत्या शिक्षणाचा हक्क नाही, पुरूषसत्ताक कुटुंबपध्दती, अर्थिक राजकीय आणि सामाजिक संपत्तीचा वारस हा मुलगाच असेल, महीलांनी अर्थारजन करू नये, सार्वजनिक व्यावहारात पडू नये केवळ चूल आणि मुल हेच सांभाळावे अशी

अनेक अंध रूढी परंपरा भारतीय संस्कृतीने जोपासल्या आहेत. महीलांना राजकीय क्षेत्रात किंवा सार्वजनिक क्षेत्राात येण्यसाठी कुटुबापासूनच वाव मिळत नाही नेतृत्वाची संधी मुलीला न देता मुलाला दिली जाते. ७३ व ७४ वी घटनादुरूस्तीने महीलांना स्थानिक राजकारणात ५० टक्केपर्यंत आरक्षण दिले मात्र प्रामुख्याने ग्रामिण भागात महीला सरपंच किंवा जि.प. सदस्य जरी झाली तरी ती केवळ सहयांची मालकीन असते, निर्णण घेण्याचे काम त्या महीलेचा बाप, पती किंवा मुलगा करत असतो, दलित आदिवासी पाडयामध्ये महीला संरपंच असते परंतू अनौपचारिकपणे सर्व अधिकार खुल्या प्रर्वगातून निवडून आलेले उपसरपंच घेत असतात हे अजूनही महीला, दलित आणि आदिवासींचे नेतृत्वा स्विकारण्यास समाज तयार होत नाही. भारतीय पुरूषांनी महीलांना कधीच राजकारणात येवू दिले नाही ज्या महीला पुढे आल्या त्या प्रामुख्याने पुरूषांच्या पश्च्यात आल्या आहेत म्हणजे पुरूष नेत्याचे निधन झाल्यास व मुलगा वारस सक्षम किंवा नसल्यास किंवा मुलगा नसल्यास ती संधी पत्नीला कींवा मुलीला मीळते उदा. पंकजा मुंढे, श्रीमती वांजळे, सोनिया गांधी, मेनका गांधी तसेच ज्या नेत्यांना मूलगा नाही त्यांनी मुलींना राजकारणात पुढे केले आहे उदा. सुप्रिया सुळे, प्रितम शिंदे, रक्षा खडसे इत्यादी.

**२. चारित्र्य आणि राजकारण:—**

भारतातील महीला ही स्वताचे चारित्र्य, इज्जत यासारख्या गोष्टींना प्राणापेक्षा अधिक महत्व देणारी असते. राजकारणातील किंवा सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना अनेक टिकांना सामोरे जावे लागते, त्यांच्या चारित्र्यावर विनाकारण शिंतोडे उडविण्याचे काम पुरूष मंडळीकडून होते. महिला लोकप्रनिनिधी काम करत असतांना त्यांना अनेक प्रकारे कोंडीत पकडणे, ब्लॅकमेलींग करणे किंवा अन्य मार्गांनी दबाव टाकण्याचेही काम एक विरोधी राजकारणाचा भाग म्हणून केला जातो. स्त्रि पुरूष विषमता हीच मुळात अशा प्रश्नांना जन्म देते त्यात महीलांचे नेतृत्व दडपण्याचे प्रयत्न होतात.

**३. जात आणि महीलांचा राजकीय सहभाग:—**

जात आणि निवडणूकीया राजकारणाचा अतिशय जवळचा संबंध स्वातंत्रोत्तर कालखंडात आणि प्रामुख्याने मंडल आयोगाच्या राजकारणाने प्रत्येक जात अस्मिता बळावलेल्या दिसून येतात. राखीव जागा जेंव्हा मागास जातीच्या महीलांसाठी असतात तेंव्हा मागास जातीतील महीलांना प्रतिधित्व मिळते मात्र भारताच्या आरक्षण व्यवस्थेत महिलांना स्वतंत्र आरक्षण नाही. अनुसूचीत जाती व जमातीला आरक्षण आहे मात्र त्या जातीतील महीलांना त्याच जातीतील पुरूषसत्ताक व्यवस्था पुढे येवू देत नाही. महाराष्ट्रात मराठा ही जात राजकीय दृष्टया प्रभुत्वशील आहे, मागील काळात मराठा पुरूषांनीही आपल्याकडेच सत्ता रहावी यासाठी महीलांना राजकारणापासून दुर ठेवले. आजपर्यंत लोकसंभेवर निवडून गेलेल्या बहूतेक महिला या उच्च जातीतून निवडून गेल्याचे दिसते. कारण मागासलेल्या जातीतील स्त्रियांना स्वविकासासाठी पाहीजे तेवढा वाव मिळत नाही शिवाय सत्तेच्या किल्ल्या राजकीय दृष्टया पुढारलेल्या जातीकडेच असल्याने जेंव्हा केंव्हा महीला प्रतिनिधीत्वाची आवश्यकता आहे असे वाटते तेंव्हा ते स्वजातीतील महीला उमेदवार उभी करतात. निम्न जातीतील महीलांना कायद्याच्या तरतूदिशिवाय प्रवेश मिळत नाही. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणात समाधानकारक परिस्थीती असली तरी मात्र लोकसभेच्या राजकारणात जातीय विषमतेचा परिणाम दलित आदिवासी व मागासवर्गीय महिलांच्या प्रतिनिधीत्वावर होतो असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

**४. कुटुंब आणि राजकारण दुहेरी कसरत:—**

महिलांना राजकारणातून मागे खेचनारा आणखी एक घटक म्हणजे त्यांची असणारी कौटुंबिक जबाबदारी होय. महीला कितीही प्रगत झाली तरी भारतीय संस्कृती घर आणि संसार यात गुरफटून टाकते पति, मुले, सासू

सासरे, नातेवाईक या सर्वांच्या इच्छा सांभाळत तीला राजकारण आणि समाजकारणात प्रभावी कार्य करावे लागते मात्र घरामध्ये होणारा त्रास टिका आणि तंटे हे टाळण्यासाठी महीला सार्वजनिक व राजकीय जिवनात जाण्यास फार इच्छूक नसतात. पुरूषांना ज्याप्रमाणे राजकारण करण्यासाठी घरातून पुर्ण सूट मिळते तशी सूट क्वचितच महीलांना मिळते त्यामुळे त्यांना घर आणि राजकारण हे दोन्ही सांभाळण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते हे वास्तव आहे.

**५. निवडणूका, पैसा आणि महिला:–**

भारतीय निवडणूक प्रक्रिया अचूक, पारदर्शक, निकोप आणि नैतिक निकषावर होण्यासाठी सर्वात मोठा अडथळा म्हणजे निवडणूक काळात पैशाचा होणारा बेकायदेशीर वापर, गुंडगीरी, यासोबतच मतदारांना दाखवली जाणारे अनेक प्रलोभने होय. बहूतेक महीला या अर्थिक बाबतीत परावलंबी आहेत निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या मर्यादेच्या अर्ध्यापर्यंतही त्यांना पैसा खर्च करण्याचे स्वातंज्य नसते. त्यामुळे कुटुंबप्रमुखाकडून पैसा मिळाल्याशिवाय त्य खर्च करू शकत नाहीत. कोटयावधीची गुंतवणूक स्त्रीवर करण्यास कुटूंबातील कर्ताधिर्ता सहज तयार होत नाही. हेही वास्तव समजून घेणे भाग आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणूकीत पैसा हा निकष वगळून अनेक राजकीय पक्षांनी कसलाही भेदभाव न दाखवता झगमगत्या उच्चभ्र मायानगरीतील ज्यांच्याकडे कोटयावधीची माया आहे अशा महीलांना निवडणूकीचे तिकीट दिले होते उदा. हेमा मालिनी, स्मृती इराणी, नगमा, गुल पनाग, किरण खेर, मूनमून सेन, संध्या राय, शताब्दी रॉय, जया प्रदा, राखी सावंत, नवनीत राणा इत्यादी.

**उपाययोजना/समारोप:–**

लोकशाहीचे विकेंद्रीकरण तळागाळातील आणि दुर्लक्षित घटकापर्यंत करून लोशाहीचा पाया बळकट करावयाचा असेल तर महिलांना राजकारणापासून दूरू ठेवून चालणार नाही म. गांधींच्या मते महीला या भारताची अर्धी शक्ती आहे तीला बंधनात टाकून भारत विकास करू शकणार नाही. ज्याप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महीलांना ५० टक्के आरक्षणाची तरतूद केलेली आहे त्याच प्रमाणे लोकसभा, राज्यसभा, राष्ट्रपती, प्रत्येक घटकराज्याची विधान सभा आणि विधान परिषदांमध्ये महीलांना ५० टक्के राखीव जागा देण अनिवार्य आहे. महीलांचे हे आरक्षण विविध प्रवर्गाकरिता लोकसंख्येनुसार असावे. महिलांना केवळ पन्नास टक्के आरक्षण देवून चालणार नाही कारण आपण स्थानिक स्वराज्य संस्थातील महीलांच्या आरक्षणातील अडथळे पाहतो की जरी महीला राजकीय पदावर आली तरी ती केवळ सहयांची मालक असते तिच्या वतीने निर्णय घेणार तिचा पती, मुलगा, वडील किंवा अन्य पुरूष असतो त्यामुळे स्त्रिला पुरूषंच्या राजकीय सामाजिक दडपणापासून मुक्त व्हावे लागेल तरच ती चांगल्या प्रकारे कार्य करू शकेल. महीलांचे राजकीय सक्षमीकरण करण्यासाठी तिला अर्थार्जनाचा अधिकार आणि स्वातंज्य असावे ज्यामुळे ती नवऱ्याच्या अथवा पतीच्या पैशावर अवलंबून राहणार नाही. बहूसंख्य महीला या उच्च शिक्षणापासून वंचीत राहतात खरे तर उच्च शिक्षण हे स्त्रिचे राजकीय समाजिक आणि बहुपैलू व्यक्तीमत्व तयार करयासाठी महाविद्यालयीन शिक्षण आवश्यक ठरते परंतू तिला कुटुंबातच शिक्षणापासून दूर ठेवले जाते हे वास्तव आहे. महीलांसाठी शासनाने उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून त्यासाठी अर्थिक आणि अन्य आवश्यक सवलती दिल्या पाहिजेत व समाजानेही आपली पारंपारिक मानसिकता बदलीली पाहिले स्त्रि पुरूष विषमता, स्त्रिवरील अत्याचार आणि लैंगिक शोषण, वयात येण्याच्या आणि शिक्षण पुर्ण होण्याच्या आत विवाह लावणे, वारस हक्क केवळ मुलाला देणे, महिला काहीही करू शकत नाहीत अशी पुरूषसत्ताक मानसिकता बदलण्यास महिलांनी पुरूषांना भाग पाडले पाहीजे.

**'RESEARCH JOURNEY'** *International Multidisciplinary E- Research Journal*
**Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)**
**Special Issue 42 : भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि राजकारण**
**UGC Approved No. 40705 & 44117**
**ISSN : 2348-7143**
**February 2018**

संदर्भः—

- गायकवाड सुप्रिया,२०१४, १६ वी लोकसभा निवडणूक आणि महिलांचा सहभाग, लोकसभा निवडणूक विशेषांक, विचारशलाका, लातूर
- प्रा.नागोराव कुभार, संपा, २०१४, लोकसभा निवडणूक विशेषांक, विचारशलाका, लातूर
- चिकरूर वंदना, राजकारणातील स्त्रियांची घटती संख्या, दै.लोकसत्ता, २१ जुन २०१४.

RESEARCH JOURNEY

Impact Factor – 3.452 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

## Papers Publication Expenses for Special Issues

| Sr. No. | Descriptions | Quantity | Rate |
|---|---|---|---|
| 1 | Swatidhan International Publications' & International Research Fellows Association's *(IRFA'S)* ***Research Journey - Multidisciplinary International E-Research Journal*** ***ISSN : 2348-7143*** ***Impact Factor 3.452*** ***(Online Journal only)*** | For Single Paper<br>For 10 Papers<br>For 20 Papers<br>More than 20 Papers<br>For 50 Papers<br>More than 50 Papers<br>For 100 Papers<br>More than 100 Papers | Rs. 1000/-<br>Rs. 6000/-<br>Rs. 10000/-<br>Rs. 10000+400/Paper<br>Rs. 21000/-<br>Rs. 21000+300/Paper<br>Rs. 35000/-<br>Rs. 35000+100/Paper |
| | **Online + Printed Journal** | For (50 Copies)<br>100 Pages<br>150 Pages<br>200 Pages<br>250 Pages | <br>Rs. 21, 000/-<br>Rs. 25, 000/-<br>Rs. 29, 000/-<br>Rs. 33, 000/- |
| | | | |

International Research Fellow Association IRFA

COSMOS IMPACT FACTOR

Search Journal | Search

HOME | INDEXED JOURNAL | SUGGEST JOURNAL | REQUEST IF | DOWNLOAD LOGO | REVIEWER PANEL



Category

- INDEXED JOURNAL
- SUGGEST JOURNAL
- JOURNAL IF
- REQUEST FOR IF
- DOWNLOAD LOGO
- CONTACT US

- SAMPLE CERTIFICATE
- SAMPLE EVALUATION SHEET

## Journal Detail

| | |
|---|---|
| Journal Name | RESEARCH JOURNEY |
| ISSN/EISSN | 2348-7143 |
| Country | IN |
| Frequency | Quarterly |
| Journal Discipline | General Science |
| Year of First Publication | 2014 |
| Web Site | www.researchjourney.net |
| Editor | Prof. Dhanraj Dhangar & Prof. Gajanan Wankhede |
| Indexed | Yes |
| Email | researchjourney2014@gmail.com |
| Phone No. | +91 7709752380 |

GIF

GLOBAL IMPACT FACTOR

News Updates Due to large number of application please allow us time to update your journal



Get Involved

- Home
- Evaluation Method
- Journal List
- Apply for Evaluation/Free Service
- Journal Search

Recently Added Journals

| Research Journey | |
|---|---|
| ISSN | 2348-7143 |
| Country | India |
| Frequency | Querterly |
| Year publication | 2014-2015 |
| Website | researchjourney.net |
| Global Impact and Quality Factor | |
| 2014 | 0.565 |
| 2015 | 0.676 |

## Research Journey

**SJIF 2016:** Under evaluation

Area: Multidisciplinary

Evaluated version: online

Previous evaluation SJIF

2015: Not indexed
2014: 3.009
2013: Not indexed
2012: Not indexed

**The journal is indexed in:**

SJIFactor.com - SJIF Scientific Journal Impact Factor

**Basic information**

| | |
|---|---|
| Main title | Research Journey |
| Other title [English] | Research Journey |
| Abbreviated title | |
| ISSN | 2348-7143 (E) |
| URL | http://WWW.RESEARCHJOURNEY.NET |
| Country | India |
| Journal's character | Scientific |
| Frequency | Quarterly |
| License | Free for educational use |
| Texts availability | Free |

**Contact Details**

| | |
|---|---|
| Editor-in-chief | Prof. Dhanraj Dhangar<br>M.G.V.'S ARTS & COMMERCE COLLEGE, YEOLA, DI<br>India |
| Publisher | MRS. SWATI SONAWANE |